त्रिमुर्ती शिक्षण संस्थेचे
श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला
व कै.डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान
महाविद्यालय,साक्री जि.धुळे ४२४३०४

Trimurti Shikshan Sanstha,Sakri
Smt. Vimalbai Uttamrao Patil Arts
& Late Dr. Bhaskar Sadashiv Desale
Science College, Sakri Dist. Dhule 434304

नॅक प्रमाणित

• Email : vimalbaipatilcollege@gmail.com
• Web Site : www.vupabsdscsakri.co.in
• Phone : (02568) 240462
• Fax : 02568-240462

Principal
Dr. P. S. Sonawane
M.A.,Ph.D.
Email. pandharinath112@gmail.com
Mob.9404972944

## 3.3.1 Number of research papers published per teacher in the Journals notified on UGC website during the last five years.

## A.Y. 2017-18

**Responses-**

**Kindly refer to the supportive documents attached on the given link.**

| Sr. | Title of paper | Name of the author/s | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | 1960 to 1970 Ya Kalkhandatil Gramin Kadambari Swarup v Shodha. | Dr. Kailas B.Wagh | **3-8** |
| 2 | Sathottari Gramin Kadambari Madhil Samaj Jivanache Vastav Chitran | Dr.Kailas B.Wagh | **9-14** |
| 3 | Nkshalvadacha Bhartachyaa Antargat Surkshevar Prabhav | Dr. Dinesh Mali | **15-18** |
| 4 | Ruskin Bond The Matic Analysis of Select Short Stories | Prof. Nilesh Malichkar | **19-25** |
| 5 | Influence of Various Electrolytes on clouding Behavior of A Non- Ionic Surfactant Brij-30 | Prof. Anil D. Kakuste | **26-31** |
| 6 | British Kayade & Bharatiy Shikshan | Prin. P.S.Sonawane | **32-42** |
| 7 | Khandeshatil Prachin Madhyayugin v Aadhunik Kalatil krushi Vikasacha Tulnatmak Abhyas | Prin. P.S.Sonawane | **43-48** |
| 8 | Khandeshatil Aadivasichi Kala v Sanskruti | Prin. P.S.Sonawane | **49-57** |
| 9 | Prachin,madhyayugin v Peshavekalin Khandeshatil Rajakiy Paristhiti | Prin. P.S.Sonawane | **58-62** |

| | | | |
|---|---|---|---|
| 10 | 1885 to 1904 Ya Kalatil Khandeshatil Swatantryacha Chalvaliche Mulyamapan | Prin. P.S.Sonawane | **63-68** |
| 11 | Sahityachi Krushi v Gramin Vikasatil Bhumika | Dr. Vasumati Patil | **68-72** |
| 12 | Kashmir Prashn :Bharat Pakistan Sangharshyacha Kendra Bindu | Dr. Dinesh Mali | **73-76** |
| 13 | Bharat Ani Pakistan Yanchyatil Kashmir Prashnat Amerikechi Madhysthichi Bhumika | Dr. Dinesh Mali | **77-80** |
| 14 | Bhartiya Boudha Tatvadnyan Ani Parampara | Dr. Vijay Desale | **81-63** |
| 15 | A Study of Social Realism in Manju Kapur's The Immigrant' and Shashi Deshpande's A matter of Time | Dr. Jahagirdar Salunkhe | **84-87** |
| 16 | Struggles Of Women For Liberty In Manju Kapur's Home | Dr. Jahagirdar Salunkhe | **88-94** |
| 17 | Study of the geographical Perspective of flood affected settlement in Nandurbar Tehsil | Prof. Ajay Nandre | **95-102** |
| 18 | Shetkari Aatmahatya Ek Jwalant Prashn | Prof. Abhijit Bhamare | **103-106** |

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

# Vidyawarta®

## International Multilingual Research Journal

October 2017
Special Issue

Editor
**Prof.Virag S.Gawande**
**Dr.Sanjay j. Kothari**
**Dr. Dinesh W.Nichit**

**Published By**
Sant Gadge Maharaj Art's Comm,Sci Collage Walgaon
Dist. Amravati &
Aadhar Social Research Development Training Institute, Amravati.

विद्यावार्ता या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही.

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat**.

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

PRINCIPAL
T.S.S's.Smt.M.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal.Sakri Dist.Dhule

## || Index ||


1 ) effectiveness Of Inquiry Training Model For Teaching Geography / 1
*Shri. Abhijeet Appaso Dhulgude*

2) Role Of Technology In Financial Market: A Case Study Of Bombay Stock Exchange / 3
Shabab Rizvi

3) The Evaluation Of Agricultural Productivity In Yavatmal District Maharashtra State / 11
Rajesh Pandurang Meshram

4 ) Domestic Workers In India / 14
Asst Prof Kavita.Y.Kathare

5) Reluctance In The Use Of Open Source Software In Academic Libraries : A Study / 18
Mrs. Sunita Shivaji Patil.

6) Natural Disasters & Hazards In India / 23
Dr. Kundan Ajabrao Alone

7) Diasporic Sensibility In V.S. Naipaul's The Magic Seeds / 28
Mr. S.D. Rajratna

8) Application Of Modern Technology In Librry And Information Centers / 34
Dr. S. P. Nimbhorkar

9) Digitization - Issues And Problems / 37
Prof. S.J. Zod

10) Perception Of Consumers Towards Demonetization / 41
Prof.V.M.Patil

11) १९६०-७० या कालखंडातील ग्रामीण कादंबरी : स्वरुप व शोध / 44
प्रा. श्री. कैलास बुधा वाघ / डॉ. वसुमती पुंडलिकराव पाटील




T.S.S's. Smt V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule

PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

14

# १९६०-७० या कालखंडातील ग्रामीण कादंबरी : स्वरुप व शोध

प्रा. श्री. कैलास बुधा वाघ
डॉ. वसुमती पुंडलिकराव पाटील
श्रीमती विमलबाई उ.पाटील कला व
कै. डॉ. बी.एस. देसले विज्ञान महाविद्यालय, साक्री (धुळे)

==========***********========

**प्रास्ताविक :-**

ग्रामीण भागात खऱ्या अर्थाने १९६० नंतरच्या कालखंडानंतर बदल झालेला दिसून येतो. ग्रामीण भागातून सहकारसारख्या चळवळी उदयास आल्या. याशिवाय कुळकायदे, ग्रामीण विकासासाठीच्या शासकीय सोयी, सवलती, नवीन तंत्रज्ञानाचा वापर, पाणीपुरवठा, विविध योजना इ. तून शेती व गाव यामध्ये आमुलाग्र बदल होण्यास प्रारंभ झाला. यातच ग्रामीण, दलित चळवळीने भारावलेला ग्रामीण भागातील शिक्षणाने प्रेरित झालेली नवसुशिक्षितांची पिढी उदयास आली. या शिक्षित पिढीस पुर्वीच्या साहित्यातून ग्रामीण जीवनाचे जे चित्रण आले ते त्रोटक वाटू लागले. या पिढीतील खरा ग्रामीण भागात राहून तेथील जीवनाशी एकरुप असलेला कष्टकरी, शेतकरी, दलित व शोषित, संवदेनशील लेखकाने स्वःनुभवाचे वास्तव चित्रण कथा-कादंबऱ्यातून शब्दबध्द करु लागला. या कालखंडातील कादंबरीने एक नवी कात टाकली.

१९६०-७० या कालखंडात ग्रामीण कादंबरी लेखनात रा.रं. बोराडे, आनंद यादव, व्यंकटेश माडगुळकर, हमीद दलवाई, गो.नी. दांडेकर, अण्णाभाऊ साठे, शंकर पाटील, र.वा. दिघे व इतर लेखकांचे मोलाचे योगदान आहे. १९६० ते १९७० या कालखंडातील ग्रामीण कादंबरीचे स्वरुप व शोध पुढील काही निवडक कादंबऱ्याच्या आधारे करता येईल.

**धग :- उध्दव शेळके**

या कादंबरीमुळे ग्रामीण कादंबरीला अस्सल ग्रामीणत्व उपभोगायला मिळालेले आहे. 'धग' च्या कथानकात आधुनिकी करणामुळे पिडीत झालेल्या विदर्भातील एका खेड्यातील शिंपी कुटूंबाची कहाणी आलेली आहे. परंपरागत शिंप्याचा व्यवसाय करणारे कुटूंब त्यात कुटूंबासाठी सतत कष्ट करणारी 'कौतिक' या स्त्रीची कथा आहे. प्रथम कर्तृत्ववान असलेला तद्नंतर महारोगी असा नवरा, सतत गावात उनाडक्या करणारा मुलगा भीमा या सर्वाचे तंत्र बघून मनातून पूर्णपणे उध्वस्त झालेली कौतिक शेवटी वेडी होते. अशा प्रकारचे चित्रण या कादंबरीतून येते.

एकूणच आधुनिकीकरणाचा खेड्यांवर परिणाम झाला त्यातून खेडी बदलत गेली. खेड्यातील कुटूंबावर तेथील जीवनावर त्याचा कशाप्रकारे परिणाम होत गेला याचे वास्तव चित्रण 'धग' मधून येते. 'धग' ने ग्रामीण कादंबरी विश्वाला समृध्द केले. वाचकाच्या मनाला विचार करायला लावणारी ही कादंबरी आहे. यातील चित्रण फक्त एका शिंपी कुटूंबाचे रेखाटन करत नाही तर तेथील परिसराचे प्रतिनिधित्व करतांना दिसते.

**आनंदभुवन :- गो.नी. दांडेकर**

गो.नी. दांडेकरांनी 'आनंदभुवन' या कादंबरीतून काही आदर्श आणि अपेक्षा ठेवून तिची मांडणी केलेली आहे. या कादंबरीच्या स्वरुपाचा अभ्यास करता या कादंबरीतून कुष्टरोग्याची कथा मांडण्यात आलेली आहे.

कादंबरीतील महादेव मोरे नामक नायक कुष्ठरोग झालेला एका तरुणीशी हेतुपुरस्कर विवाह करतो. परिणामी त्यालाही कुष्ठरोगाची लागण होते. या रोगावर उपचार व्हावा यासाठी तो 'आनंदभुवन' नावाचे स्वतंत्र निवास स्थापन करतो. शेवटी त्यांचा कुष्ठरोग पुर्णपणे बरा होतो. अशा प्रकारे या कादंबरीचे कथानक आहे.

तत्कालीन काळात कुष्ठरोग भयानक रोग म्हणून ओळखला जात असे. परिणामी या रोग्याचे अतोनात हाल होत असे. त्यात ग्रामीण भागातील माणसांच्या मनात कुष्ठरोगाविषयी भिती होती तसेच त्या रोग्याकडे बघण्याचा दृष्टीकोनही वेगळा होता. हा दृष्टिकोन बदलावा यासाठीच या कादंबरीचे लिखाण केलेले दिसून येते.

**माकडीचा माळ :- अण्णाभाऊ साठे**

अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबऱ्या ग्रामीण भागातील अस्सल व वास्तव चित्रण रेखाटणाऱ्या आहेत. 'माकडीचा माळ' कादंबरीतून डवरी, डोंबारी, दरवेशी, माकडवाले, सापगारुडी जमातीच्या जीवनातील कथा व्यक्त केलेल्या आहेत. ही ग्रामीण भागाचे चित्रण करणारी प्रादेशिक स्वरुपाची कादंबरी आहे. माकडवाल्याची मुलगी दुर्गा आणि माकडवाल्याचा मुलगा येम्या यांच्या प्रेमकथेची कहाणी या कादंबरीतून येते. दरवर्षी माळावर पावसाळयात विविध जाती-जमातींचे



PRINCIPAL
I.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

भटके, भिकारी पालं दिऊन तळ ठोकतात. पावसाळा संपला की परत त्यांची भटकंती सुरु होते. या जमातीतील यंकू आपल्या माकडासह मुलगी दुर्गाला घेऊन आलेला असतो परंतू तेथील पर्वती डवरी नावाचा व्यक्ती यंकूला त्रास देतो त्यातून तो दुर्गाला मुंबईला विकण्याची धमकी देतो म्हणून यंकू मुलीसाठी तेथून निघुन जातो. कालांतराने यंकू आणि पर्वती डवरी यांची भेट होते परंतू पर्वती पुर्वीची दुश्मनी विसरलेला नसतो. यावेळेला दुर्गाही अठरा वर्षाची झालेली असते. त्यातच ती रुपसुंदर असते. दुर्गाला इनामदार विलासरावाच्या जाळयात अडकवण्यासाठी पर्वती अतोनात प्रयत्न करतो. दुर्गा विषयी नको त्या अफवा पसरवितो म्हणून यंकू दुर्गाचे यम्याबरोबर लावून देतो.

एके दिवशी विलासराव दुर्गाचे अपहरण करण्याचा प्रयत्न करतो. यामुळे यंकू आणि दुर्गा पळून जाण्याचा प्रयत्न करतात परंतू गल्या-बल्या आणि यमू यांच्यात चकमक होते व त्यात यंकूचा अंत होतो. त्याचे प्रेत पाहून त्याने पाळलेले माकड गंग्या आणि रंगी हे ही आपल्या प्राण सोडतात म्हणून या माळास 'माकडीचा माळ' म्हणतात. नंतर दुर्गा यम्याबरोबर नांदावयास जाते परंतू तिचे सुख पाहण्यासाठी यंकू मात्र नसतो. असे संघर्षमय चित्रण या कादंबरीतून आलेले आहे.

प्रस्तुत कादंबरी ग्रामीण तसेच प्रादेशिक भागाचे वास्तव चित्रण रेखाटणारी आहे. भटक्या जाती- जमातीतील संघर्षाबरोबरच गावातील इनामदार कशा पध्दतीने या लोकांवर अन्याय अत्याचार करतात याचेही वर्णन येथे आलेले आहे. एकंदरीत 'माकडीचा माळ' कादंबरीतून भटक्यांचा जीवनाचे वर्णन रेखाटलेले दिसून येते.

**वावटळ :- व्यंकटेश माडगूळकर**

'वावटळ' कादंबरीतून व्यंकटेश माडगूळकरांनी गांधीवधानंतर समग्र ग्रामीण भागाने जे महाकाय रुप धारण केले आणि त्यातून तत्कालीन काळात सामाजिक नेतृत्व करणाऱ्या ब्राम्हण वर्गाच्या घरादाराची, संपत्तीची जी वाताहात झाली त्याचे भयावह चित्रण येथे केलेले आहे.

'वावटळ' मधील नायक हा पुण्यामध्ये शिक्षण घेत होता. गांधीजींची हत्या झाल्यानंतर संपूर्ण भारतातील शहरांमध्ये संचारबंदी जाहीर करण्यात आली. त्याला पुणे शहरही अपवाद नव्हते. उपासमार टाळण्याच्या हेतुने कादंबरीतील नायक गावाकडील वातावरण शांत असेल या आशेने गावाकडे निघतो. तो बसने प्रवास करत असतांना बस घाटात अडविले जाते. गाडीतून ब्राम्हण प्रवाशाला खाली उतरवून जमाव त्याला मारहाण करतो. त्यामुळे नायक आणि त्याचे दोन मित्र पर्यायाने गावाकडचा प्रवास पायीच करतात. गावात येऊन बघतात तर कोणत्याच घराला घरपण राहिलेले नसते. ब्राम्हणांच्या सर्व घरांची स्मशानभूमी केलेली असते. ब्राम्हणांची सर्व कुटूंब रस्त्यावर येतात. या घटनेचा पुन्हा त्रास होऊ नये म्हणून खेडयातील ब्राम्हण कुटूंब आपली संपूर्ण संपत्ती विकून शहराची वाट धरतात.

यामुळे कादंबरीतील निवेदक शंकरचे वडील आबा आपल्या भावाकडे मुंबईला राहायला जातात. परंतू गावाशी त्यांची नाळ जोडलेली असल्याने त्यांचे मुंबईला मन लागत नाही. अखेर त्यांचा मृत्यू होतो. या धक्याने एक वर्षानंतर शंकरची आईही वारते. एवढी घटना घडून ही निवेदक गावाशी संबंध तोडत नाही. अधुन-मधून त्याचे गावाकडे जाणे-येणे सुरु असते.

एकूणच एका व्यक्तिने केलेल्या अपराधाची शिक्षा संपूर्ण जातीला कशाप्रकारे भोगावी लागते. याचे वास्तव वर्णन 'वावटळ' मधून आलेले दिसते तसेच भारतात विविध जातीचे, धर्माचे, पंथाचे लोक आहेत परंतू एखाद्या व्यक्तीकडून अशी अप्रिय घटना घडते की त्या घटनेमुळे समग्र जातीला, पंथाला, धर्मातील लोकांना दोषी ठरविले जाते. व त्यातून उभा राहतो तो जाती-जातीतील, धर्मा-धर्मांमधील संघर्ष या संघर्षात निरपराध माणसांचा नाहक बळी जातो. म्हणून कुण्या निरपराधाचा बळी न जाता यातून योग्य तो मार्ग काढावा अशा प्रकारची अपेक्षा या कादंबरीतून व्यक्त होतांना दिसते.

**टारफूला :- शंकर पाटील**

'टारफूला' कादंबरीतून शंकर पाटील यांनी गाव आणि गावातील सत्तेसाठीचा चाललेला संघर्षाचे वास्तवदर्शी चित्रण रेखाटलेले आहे.

आडगांव हे कोल्हापूर संस्थानातील गाव. या गावातील सुभानराव पाटील यांचा अचानक मृत्यु होतो ते परोपकारी व करारी असल्याने त्यांचा गावात वचक असतो. त्यांच्या मृत्युनंतर पाटलीण बाईनी आपल्याच मुलास दत्तक घ्यावे म्हणून पिढीजात वैरी असलेले केरुनाना आणि दाजीबा गायकवाड यांच्या घराण्यात स्पर्धा लागते. या काळात गावाची संपूर्ण जबाबदारी आबा कुलकर्णीवर येऊन पडते. त्यांच्या स्वभावामुळे ते गावावर छाप पाडण्यात कमी पडतात. परिणामी गावात कोणीच कोणाचे ऐकण्याच्या मनःस्थितीत नसते. यातून दहशतीस तोंड फुटते. या सत्तासंघर्षात आबा कुलकर्णीचा खुन होतो. दरम्यानच्या काळात पाटलीणबाई गाव सोडून कोल्हापूरात आपल्या भावाकडे निघुन जाते.

कोल्हापूरच्या करवीर संस्थानाकडून एके दिवशी अचानक आडगांव येथे नवीन पाटलाची



PRINCIPAL
I.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

नेमणूक होते. नवीन आलेले दादा पाटील गावावर आपला दरारा पाडण्यात यशस्वी ठरतात परंतू गावाबाहेरुन आलेल्या माणसाने गावावर सत्ता करणे हे काही माणसांना सलत असते. ह्यातच केरुनाना व गायकवाड या दोघांना सरळमार्गाने वागण्यास दादा पाटील यशस्वी होतो. परंतू नव्या पिढीला दादा पाटील सोबत केरुनाना व गायकवाडही नको असतात. दरम्यानच्या काळात केरुनानाचा खुन होतो. आबा कुलकर्ण्याच्या मुलाच्या धाकाने गायकवाडही फरार होतो. दादा पाटलाच्या घोड्याचा कान कापून ही नवी पिढी त्यालाही आव्हान देते व येथे कादंबरीचा शेवट होतो.

एकंदरीत शंकर पाटील यांनी 'टारफुला' कांदबरीतून गावातील सत्तेसाठीचा चाललेला तीन पिढ्यांचा सत्तासंघर्षाचा मोठा पटच उभारलेला आहे. ज्याप्रमाणे शेतात वाढणारा 'टारफुला' हा पिकाला वाढू देत नाही त्याचे नुकसान करतो. त्याप्रमाणे या कांदबरीतून काही व्यक्तीचित्रंण 'टारफुला' सारखी वाढलेली दिसून येतात. येथे व्यक्ती, गाव केंद्रस्थानी न घेता गावाच्या सत्तेसाठी चाललेला संघर्ष केंद्रस्थानी घेतला आहे. हा संघर्ष अव्याहतपणे चालणारा आहे. कारण काळानूसार व्यक्ती येतात, जातात परंतू सत्तासंघर्ष हा पिढ्या बदलल्या तरी गाव मात्र तेच राहते म्हणून सत्तेसाठीचा हा संघर्ष चालूच राहणार आहे.

**इंधन :- हमीद दलवाई**

'इंधन' कादंबरीतून हमीद दलवाई यांनी हिंदु-मुस्लीमांमधील तेढ, ताण-तणावामुळे समाजास भोगाव्या लागणाऱ्या दुष्परीणामांचे वास्तवपूर्ण चित्रण रेखाटलेले आहे.

'इंधन' मधील नायक हा मुस्लीम समाजातील एक तरुण आहे. या नायकास आपल्या समाजातील परंपरागत चालत आलेले बुरसट विचार, रुढी-परंपरा मान्य नसल्याकारणाने तो गाव सोडून मुंबईस जातो. मुंबईची कोंदट हवा व तेथील प्रदुषित वातावरण त्याला सहन होत नाही. प्रसंगी त्याला हृदयविकाराचा झटका येतो. त्याच्या आजारपणावर उपचार झाल्यानंतर त्याला विश्रांतीसाठी गावाकडे जाण्याचा डॉक्टर सल्ला देतात व तो गावी येतो. हा नायक ज्याप्रमाणे मुंबईमध्ये असतांना समाजप्रबोधनाचे व सामाजिक सुधारणेचे काम करत असतो तसेच काम तो गावी आल्यावरही सुरुच ठेवतो. गावात त्याला हिंदु-मुस्लीम धर्मातील वैमनस्य, बौध्द-सवर्ण संबंधातील ताण-तणाव आदि त्याच्या दृष्टीस पडते.

गावातील देवीच्या उत्सवानिमित्ताने यात्रा भरते. त्यावेळेस मिरवणुक काढली जाते. मिरवणुक मशिदी समोरुन जाते तेव्हा गावातील मुस्लीम दुसऱ्या गावांतील मुस्लिमांना मदत करण्यासाठी बोलावतात व हेच 'इंधन' जातीय दंगल पेटविण्यासाठी पुरक ठरते. यात हिंदुतील स्त्रियांवर अन्याय-अत्याचार होतात. या दंगलीने नायक अस्वस्थ होतो. अखेर पुराव्या अभावी दंगलखोर निर्दोष ठरतात. अशा अनेक प्रसंगातून जातीय-धार्मिक तेढ गावात निर्माण होते. हे सर्व बघुन नायकाची अस्वस्थता अधिकच वाढते व त्यामुळे तो मुंबईला निघुन जातो.

एकंदरीत 'इंधन' मधून नायकाची भुमिका एका समाजप्रबोधनाची आहे. स्वातंत्र्यानंतर हिंदु-मुस्लीम यांच्यात निर्माण झालेले ताणतणाव अत्यंत हळूवारपणे कादंबरीत हाताळले आहेत. येथील नायकाच्या रुपाने लेखक संदेश देतो की, गावाचे, शहराचे महत्त्व, शांतता प्रस्थापित करावयाची असेल तर जाती-जातींतील संघर्ष, उच्च-निचता, भेदाभेद, धर्मा-धर्मांमधील तेढ या समाजात विषमता निर्माण करणाऱ्या गोष्टी जाळून टाका. पुरुन टाका तसेच मानवता हाच खरा सर्वश्रेष्ठ धर्म आहे असा संदेश दिलेला दिसून येतो.

त्याचप्रमाणे र.वा.दिघे यांच्या 'कार्तिकी' या कादंबरीतून सुध्दा ग्रामीण वास्तव जीवन रेखाटलेले दिसून येते. ग्रामीण भागातून दलितांवर होणारे अन्याय अत्याचार कशाप्रकारे होतात. याचे चित्रण 'कार्तिकी' मधून आलेले आहे. तसेच 'घरगंगेच्या काठी' जोतसना देवधर लिखित कादंबरीतून ग्रामीण भागातील एकत्र कुटूंबव्यवस्था दाखविण्यात आलेली आहे. प्रस्तुत कादंबरीतून स्वतंत्र बुध्दीने विचार करण्याचा व कुटूंबातील सर्व सदस्यांस मायेने वागविणे असा विचार हृदयात घेऊन चालणाऱ्या गृहिणीची कुंठीत कथा आलेली आहे. तसेच आयुष्यभर घरावर दादागिरी करणारा माणूस आयुष्याच्या शेवटी किती लाचार आणि लुळापांगळा होतो हा संकेत येथे दिलेला आहे.

'वारणेचा वाघ' कादंबरीतून आण्णाभाऊ साठे यांनी इंग्रजी राजवटीच्या विरोधात लढणाऱ्या सत्तू या ग्रामीण तरुणाची कथा वास्तव जीवनावर चित्रित केली आहे. निधड्या छातीचा, अन्यायाविरुध्द आवाज उठविणारा, उपकाराची जाण असणारा, स्वाभिमानी आणि मानवतावादी असणाऱ्या सत्तूला स्वत:ची बहिण भाऊबिजेला बोलावून बक्षिसापोटी इंग्रजाकडे पकडून देते. अशाप्रकारचे या कादंबरीचे स्वरुप आहे. त्याचप्रमाणे 'महानंदा' कादंबरीतून जयवंत दळवी यांनी देवाला वाहिलेल्या स्त्रियांचे (भाविणींचे) चित्रण रेखाटले आहे.

**सारांश :-**

एकूण १९६० ते ७० या कालखंडातील ग्रामीण कादंबरीचे स्वरुप व शोधाचा अभ्यास करतांना जाणवते की, या दशकातील ग्रामीण



PRINCIPAL
I.S.S's Smt. V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

कादंबऱ्यांचे विशेष म्हणजे यांचे लेखन स्व:ने जे ग्रामीण जीवन भोगलेले आहे, अनुभवलेले आहे ते जसेच्या तसे वास्तवरुपाने कादंबरीतुन मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. या काळातील ग्रामीण कादंबरीत ग्रामीण बोलीतुनच तेथील जीवनशैलीचे जोमदार व वास्तवपुर्ण चित्रण झालेले आहे. ग्रामीण भागातील निसर्गाचं रसभरीत वर्णन, इनामदार, पाटील, धनिक, सावकार, सधन आणि गरीब शेतकरी, त्यांचे प्रश्न, विविध जाती-जमाती, ग्रामीण भागातील रांगडा प्रणय, खून-दरोडे, हाणामाऱ्या, सण-उत्सव व त्यातील काही परंपरा, कोर्टकचेऱ्या, व्यवहारातील ग्रामीण माणसाचा भोंगळपणा, तेथील अज्ञान, अंधश्रध्दा, शिक्षणाचा अभाव, जीवनोपयोगी वस्तूंचा अभाव महत्वाचे म्हणजे जातीभेद, धर्मभेद, त्यातून पेटणारा संघर्ष, स्त्रीवर्गाचे, शोषितांचे, भटक्यांचे चित्रण, गावातील राजकारण, दलित, सवर्ण, संघर्ष, हिंदु-मुस्लीम संघर्ष, अन्यायाविरुध्द उठविलेले आवाज, भाविणी, मुरळी, देवदासी यांचेसह या व इतर अनेक ग्रामीण जीवनाच्या अंगांना चित्रित केलेले आहे.

एकंदरीत १९६० ते ७० या काळातील ग्रामीण कादंबऱ्यांतून लेखकांनी ग्रामीण भागाचा वास्तवपूर्ण लेखन केलेले आहे. तसेच ग्रामीण कादंबरीला एक सकस व वास्तववादी साहित्य म्हणून ओळख निर्माण करुन दिली.

वरीलप्रमाणे १९६० ते ७० काळातील निवडक ग्रामीण कादंबऱ्यांद्वारे त्यांचे स्वरुप व शोधाचा अभ्यास करता येईल.

संदर्भग्रंथ :-

१) साहित्य ग्रामीण आणि दलित :- संपा. डॉ. ईश्वर नंदपुरे.

२) माकडीचा माळ :- अण्णाभाऊ साठे.

३) वावटळ :- व्यंकटेश माडगूळकर.

४) टारफूला :- शंकर पाटील.

५) इंधन :- हमीद दलवाई.

६) वारणेचा वाघ :- अण्णाभाऊ साठे.

७) कार्तिकी :- र.वा.दिघे.



T.S.S's Smt. V.U.Patil Arts & Late Dr. B.S. Desale Science College, Sakri, Tal. Sakri, Dist. Dhule

PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule

August - 2017

E-ISSN: 2321-4953

# IRFA'S UNIRESEARCH

## Multidisciplinary International E-Research Journal

Vol.- IX Issue - II

*Indexed in DRJI & Indian Citation Index Double Blind Peer Reviewed Journal*

UGC Approved List No. 63005 *Cosmos Impact Factor - 3.020 [2015]*

मराठी साहित्य संशोधन विशेषांक – भाग ४

विश्वविद्यालय अनुदान आयोग
University Grants Commission
quality higher education for all

Home About Us Organization Commission Universities Colleges Publications

UGC Approved List of Journals

You searched for: uniresearch

Total Journals : 1

Show 25 entries Search:

| Sl.No. | Title | Journal No. | Title | Publisher | ISSN | E-ISSN |
|---|---|---|---|---|---|---|
| [illegible] | [illegible] | 63005 | Uniresearch- Multidisciplinary International E-Research Journal | International Research Fellows Association | 23214953 | |

Showing 1 to 1 of 1 entries

Previous 1 Next

For Students For Faculty More

Editor:
Dr. Dhanraj T. Dhangar,
Asst. Professor, Dept. of Marathi,
M.G.V.'s Arts & Commerce College, Yeola.
Nashik [M. S.] India.
dhanrajdhangar@gmail.com
Mobile No. 7775982534

PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS

*For Details, visit us on: www.uniresearch.net.in*

'Uniresearch'- International Multidisciplinary E-Research Journal | ISSN 2321-4953 (Online)
मराठी साहित्य संशोधन विशेषांक भाग ४
Vol. 9 Issue. 2 UGC Approved List No. 63005 *Impact Factor - 3.020* | August - 2017

## EDITORIAL BOARD

Chief & Executive Editor:
Dr. Dhanraj T. Dhangar
Assistant Professor,
Dept. of Marathi,
M.G.V.'s Arts & Commerce College, Yeola,
Dist - Nashik [M.S.] India.

Associate Editors:
**Mr.Tufail Ahmed Shaikh**, King Aziz City for Science & Technology, Riyadh Kingdom Saudi Arabia.
**Dr. Anil Dongre**, Head, Dept. of Management, North Maharastra University, Jalgaon.
**Dr. Bhausaheb V. Game**, Act. Principal, MGV's Arts & Commerce College, Yeola, Nashik.
**Dr. Leena Pandhare**, HoD English, L. V. H. College, Panchavati-Nashik [M.S.] India.
**Dr. P. K. Shewale**, Vice Principal, MGV's Arts, Commerce & Science College, Harsul, Nashik.
**Dr. Rekha Gajare**, Bhusawal Arts, science & P.O. Nahata,Commerece College, Bhusawal.
**Dr. Gajanan Wankhede**, Asst. Prof. Dept. of Hindi.Baliram Patil College, Kinwat, Nanded
**Dr. B. M. Sonawane**, M.G.V.'s Arts College, Saundane, Dist - Nashik
**Prof. Atul Suryawanshi**, S.S.M.M. College, Pachora
**Prof. Vijay Shirsath**, Nanasaheb Y. N. Chavhan College, Chalisgaon
**Prof. B. P. Shewale**, MGV's Arts, Commerce & Science College, Saundane, Nashik.
**Mr. Munaf Shaikh**, North Maharashtra University, Jalgaon
**Prof. D. M. Badure**, N. S. B. Arts, Commerce & Science College, Nanded.
**Mr. Vinod Bhalerao**, J.N. V. Kangda Himachal Pradesh.

AdvisoryBoard:
**Dr. M. S. Pagare**, Director, School of Languages Studies, North Maharashtra University, Jalgaon.[M.S.]
**Dr. Marianna kosic**, Scientific-Cultural Institute, Mandala, Trieste, Italy.
**Dr. S. M. Tadkodkar**, Rtd. Professor & Head, Dept. of Marathi, Goa University.Goa,India.
**Dr. Bajarang Korde**, Professor & Head, Dept. of English, Pune University. Pune, [M.S.] India
**Dr. R. P. Singh**, Dept. of English and Modern European Languages University of Lucknow [U.P.] India
**Dr. N. V. Jayaraman**, Director-Training and Placement, SNS Technical Institutions, Coimbatore

Review Committee:
**Dr. Shailendra Lende**, Dept. of Marathi, R.T.M. Nagpur University, Nagpur
**Dr. Sayyed Zakir Ali**, HOD, Urdu & Arabic Languages, H. J. Thim College, Jalgaon
**Dr. R. R. Kazi**, North Maharashtra University, Jalgaon.
**Dr. Vandana Chaudhari**, KCE's College of Education, Jalgaon.
**Dr. Vidya Vyavhare**, HOD, Marathi, KCE's M. J. College, Jalgaon.
**Dr. Sanjay Baviskar**, HOD, Marathi, D. N. Bhole College, Bhusawal.
**Dr. KalpanaPatil**, HOD, Hindi, D. N. College, Faizpur.
**Dr. K. R. Udmale**, Rtd. HOD, Cost and Works Accounting, M.S.G. College, Malegaon Camp, Nashik,

Contact us on : uniresearch99@gmail.com / researchjourney2014@gmail.com
Mobile No. : Prof. Dhanraj T. Dhangar - (President, IRFA) + 7775982534 / 9665398258

Publishers : International Research Fellows Association (IRFA) &
Mrs. Swati Sonawane, Director, Swatidhan Publication, Nashik (Mo. 9665398258)

*The respective authors are responcible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Our review committee members have checked papers on their level best to stop furtive literature. Please send your valuable suggestions to us on uniresearch99@gmail.com*

*- Executive Editor*

PRINCIPAL
T.S.S's Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

'Uniresearch'- International Multidisciplinary E-Research Journal
मराठी साहित्य संशोधन विशेषांक भाग ४
Vol. 9 Issue. 2 UGC Approved List No. 63005 *Impact Factor - 3.020*
ISSN 2321-4953 (Online)
August - 2017

# अनुक्रमणिका


| अ.नं. | शोध निबंधाचे शीर्षक / लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| 1 | आदिवासी कामड नृत्यगीते एक अभ्यास.................... डॉ अंजली म्हस्करेन्हस | 04 |
| 2 | लोकगीतातील आई एक चिंतन....................प्रा. दीपक सूर्यवंशी | 12 |
| 3 | लोकसाहित्य व लोककला....................प्रा. तुकाराम कांबळे | 16 |
| 4 | महानुभावीय वाङ्मयातील स्वदेश व स्वभाषाभिमान....................डॉ. दिनेश पाटील | 21 |
| 5 | भारतीय संत साहित्य....................प्रा. कविता पाटील | 24 |
| 6 | संत एकनाथ समन्वय बुद्धीचे आदर्श सुधारक.................... डॉ गोपाल ढोले | 28 |
| 7 | संत एकनाथांच्या भागवतातील समतेचा विचार ....................डॉ. धनराज धनगर | 33 |
| 8 | संत साहित्य : परिवर्तनीय आकलन....................डॉ. विजया राऊत | 36 |
| 9 | संत एकनाथांचे भारुड विश्व.................... प्रा. परिणीता घडूले | 40 |
| 10 | विदर्भातील संत परंपरा .................... डॉ गजानन हेरोळे | 46 |
| 11 | भारतीय संस्कृती, इतिहास आणि संत साहित्यावरील बौद्ध धर्माचा प्रभाव............प्रा. संगीता सूर्यवंशी | 49 |
| 12 | मराठी कादंबरीतील संस्कृतीचा प्रश्न ( जागतिकीकरणाच्या संदर्भात)....................डॉ प्रभाकर देसाई व प्रा. कैलास सलादे | 61 |
| 13 | यशवंतराव चव्हाण यांचे वक्तृत्व व भाषणे .................... डॉ. तुषार चांदवडकर | 65 |
| 14 | जी.एं.च्या कथेतील प्रतिके व प्रतिमा....................डॉ अन्नपूर्णा चौधरी | 69 |
| 15 | मी तोडले तुरुंगाचे दार या काव्यसंग्रहातून अभिव्यक्त झालेली समकालीनता.........प्रा भीमराव वानोळे | 72 |
| 16 | कृषिजन संस्कृतीचे वास्तव आणि राजन गवस यांची कळप कादंबरी....................डॉ दीपक बावस्कर | 76 |
| 17 | साठोत्तरी ग्रामीण कादंबरीमधील समाज जीवनाचे वास्तव चित्रण....................प्रा कैलास वाघ व डॉ. वसुमती पाटील | 85 |
| 18 | उत्तम बंडू तुपे ह्यांच्या कादंबरीलेखनातील पृथगात्मता....................प्रशांत महाजन | 88 |
| 19 | ग्रामीण जीवनाचा अचूक वेध घेणारा कथा संग्रह 'उठावण'....................प्राचार्य डॉ. भाऊसाहेब गमे | 90 |
| 20 | साठोत्तरी मराठी स्त्रीवादी साहित्याची पार्श्वभूमी व वाटचाल....................डॉ. साहेबराव शिंदे व प्रा. मंगेश अटकोरे | 93 |
| 21 | साठोत्तरी मराठी साहित्य : आदिवासी कविता....................प्रा डॉ गणेश टाले | 97 |
| 22 | नव्वदोत्तर मराठी आदिवासी कविता....................प्रा. रेखा इंगोले | 103 |
| 23 | आदिवसिंच्या आर्थिक क्रांतीचा उदय आदिवासी अकादमीची निर्मिती....................अजीज तडवी | 109 |
| 24 | साहित्याची समीक्षा : संज्ञा, संकल्पना व स्वरूप....................प्रा. उज्वला पाटील | 115 |
| 25 | नव्वदोत्तरी मराठी आदिवासी साहित्यातील विद्रोह ....................डॉ. राजेंद्रकुमार लोणे | 119 |
| 26 | साठोत्तरी मराठी साहित्यात दलित साहित्याचे योगदान ....................प्रा. रुपाली पाटील | 126 |
| 27 | प्रसार माध्यमांचे बाजारीकरण....................डॉ. श्रीला गाढे | 130 |


PRINCIPAL
S.S's Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

'Uniresearch'- International Multidisciplinary E-Research Journal
मराठी साहित्य संशोधन विशेषांक भाग ४
Vol. 9 Issue. 2 UGC Approved List No. 63005 *Impact Factor - 3.020*
ISSN 2321-4953 (Online)
August - 2017

# साठोत्तरी ग्रामीण कादंबरीमधील समाजजीवनाचे वास्तवचित्रण

प्रा. श्री. कैलास बुधा वाघ
डॉ. वसुमती पुंडलिकराव पाटील
श्रीमती विमलबाई उ.पाटील कला व
कै. डॉ. बी.एस. देसले विज्ञान महाविद्यालय, साक्री (धुळे)
मो.नं.-9890030380 / ई-मेल- kailaswagh555@gmail.com

प्रास्ताविक :-

मराठी साहित्यामध्ये ग्रामीण, दलित, आदिवासी, स्त्रीवादी असे विविध प्रकार आहेत. साहित्यातून समाजात घडणाऱ्या वास्तव घटनांचा प्रत्यय येतो समाजाचे प्रतिबिंब साहित्यातून पडतांना दिसते. साहित्य समाजमनाचा आरसा आहे. यात विशेषतः ग्रामीण साहित्यातून ग्रामीण भागाचे तेथील समाजजीवनाचे वास्तव चित्रण रेखाटलेले दिसून येते. यात ग्रामीण कादंबरीचा मोलाचा वाटा आहे.

ग्रामीण कादंबरीवरील लेखनाचा आरंभ साधारणपणे १९ व्या शतकाच्या पुर्वार्धात झालेला दिसून येतो. खऱ्या अर्थाने ग्रामीण कादंबरी लेखनाला १९६० नंतरच सुरुवात झाली. या काळातील ग्रामीण कादंबरीने समाज परिवर्तनात मोलाची कामगिरी केली. या काळात महाराष्ट्रात ग्रामीण चळवळीने जोर धरला कारण फुले, शाहू, आंबेडकरांचा वारसा घेवून त्यांच्या विचारांनी प्रेरीत ग्रामीण भागात नवसुशिक्षीतांची एक पिढी निर्माण झाली. या पिढीने साहित्य लेखनातून ग्रामीण समाजजीवनाचे वास्तव स्वरुप रेखाटण्यास सुरुवात केली. यात ग्रामीण कादंबरीने मोलाची कामगिरी बजावली. विशेष म्हणजे स्वतःच्या ग्रामबोलीतून कादंबरी लेखन केल्याने त्यात जीवंतपणा आला. कादंबरी लेखनात प्रामुख्याने शंकर पाटील, व्यंकटेश माडगूळकर, उध्दव शेळके, द.मा. मिरासदार, आनंद यादव, रा.रं. बोराडे, बंकट पाटील, बाबा पाटील, विश्वास पाटील, दत्ता भोसले चंद्रकुमार नलगे, सदानंद देशमुख व अनेक अशा लेखकांनी ग्रामीण कादंबरीत वास्तव स्वरुपात रेखाटले.

## साठोत्तरी ग्रामीण कादंबरीतील समाजजीवनाचे वास्तवचित्रण :-

साठोत्तरी कालखंडातील ग्रामीण कादंबऱ्यातून महाराष्ट्रातील विविध प्रदेशातील खेडयातील दुष्काळ, लहरी निसर्गाचे रुप, गावातील राजकारण, जाती-जातींमधील संघर्ष, शेतकऱ्यांचे व्यापाऱ्यांकडून, सावकारांकडून होणारे शोषण, सरकारी धोरण, भ्रष्ट अधिकारी, गरीबी, उपासमार अशा विविध प्रश्नांची मांडणी केली गेली. तत्कालीन समाजजीवनाचे वास्तव चित्रण कादंबऱ्यांतून रेखाटले जाऊ लागले. पुढील कादंबऱ्यांच्या माध्यमातून समाजजीवनाचे वास्तव चित्रणाचा अभ्यास करता येईल.

उध्दव शेळके यांची 'धग' ही कादंबरी अस्सल ग्रामीण समाजजीवनाचे वास्तवचित्रण रेखाटणारी आहे. 'धग' मधून विदर्भातील एका गरीब कष्टाळू शिंपी कुटूंबाचे व त्या कुटूंबाच्या अनुषंगाने होणारे गावाचे व तेथील संस्कृतीचे चित्रण आलेले आहे. 'धग' मधून कुटूंबासाठी सतत कष्ट करणाऱ्या कौतिक या स्त्रीची कथा चित्रित होते. प्रथम कर्तृत्ववान नंतर महारोग झालेला नवरा, उनाडक्या करणारा, मुलगा या सर्वांचे तंत्र बघून भांबावून वेडी झालेल्या कौतिकच्या संदर्भात या कादंबरीचे कथानक आहे. कुटूंबासाठी कितीही कष्ट केले तरी हाती अपयशच आलेल्या कौतिकची ही कहाणी आहे. विशेष म्हणजे या कादंबरीतून व्यक्त होते ती माणसांबद्दलची आस्था येथील कुटूंबावर होणारे परिणाम यामुळे निर्माण झालेल्या समस्या दिसतात.

एकंदरीत खेडयातील समाजजीवनाचे वास्तव चित्रण 'धग' मधून रेखाटलेले आहे. त्याचप्रमाणे व्यंकटेश माडगुळकरांनी 'बनगरवाडी' कादंबरीतून ग्रामीण वास्तवाचे जवळून दर्शन घडविले आहे. ऋतुचक्राबरोबर धनगर लोकांच्या जीवनात होणारे परिवर्तन आणि त्याप्रमाणे त्या जमातीचे जगणे, गावातील माणसे त्यांची समाजव्यवस्था, खेडयाची रचना या सर्वांची शब्दचित्रणे करणारी ही कादंबरी आहे. स्वातंत्र्यानंतर गावागावातून हळूहळू शिक्षणाचा प्रसार,





PRINCIPAL
... U.Patil Arts &
Late Dr.B.S. Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

बनगरवाडीतील शाळा बंद असतांना नोकरीच्या शोधात असलेला तरुण नायक राजाराम मास्तरला या गावात पाठवून तेथील अडाणी लोकांना शिक्षणाचे महत्व पटवून देतांना त्याचा गावकऱ्यांशी येणारा संबंध व त्यातून उभी केलेली शाळा, या सर्व घटकांच्या सहाय्याने 'बनगरवाडी' चित्रित केली आहे. एकंदरीत बनगरवाडीचे प्रमुख वैशिष्टये म्हणजे माणदेशी प्रदेशाच्या माणसांची स्वभावचित्रे, या माणसांतून घडणारे अनुभव यातूनच ग्रामीण संस्कृतीची ओळख करुन देणारे मानवी जीवनाचे वैशिष्टयपुर्ण चित्रण आहे. तसेच ग्रामीण परिसरातील समाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक व शैक्षणिक पैलूंचा आढावा 'बनगरवाडी' तून लेखकाने घेतलेला आहे.

शंकर पाटलांची 'टारफुला' या कादंबरीतून ग्रामीण समाजजीवनाचे वास्तव दर्शन घडतांना दिसून येते. या कादंबरीतून लेखकांनी गावातील गुंडगिरी व त्यांचे अन्याय-अत्याचार त्यामुळे गावातील लोकांना भोगाव्या लागणाऱ्या समस्या व हया संपुर्ण घटनेमुळे पोखरलेल्या 'टारफुला' गावाचे चित्रण रेखाटले आहे. ज्या प्रमाणे पिकात वाढलेले 'टारफुला' पिकाला हानिकारक असते. त्याचप्रमाणे विनाकारण वाढलेली गावातील गुंडगिरीमुळे दहशतीमुळे संपुर्ण गांव कसे उध्दवस्त होते. याचे चित्रण दाखविण्याचा प्रयत्न 'टारफुला' तून केलेला आहे. याचप्रमाणे हमीद दलवाई यांची 'इंधन' ही कादंबरी अस्सल ग्रामीण जीवनाचे वास्तव चित्रण करणारी आहे. 'इंधन' मधून गावातील हिंदू, मुस्लिम व बौध्द या धर्मांमधील लोकांचा एकमेकांशी होणारा संघर्ष व त्यातून व्यक्त होणारी भयावह दहशत दहशतीखाली वावरणारी अल्पसंख्यांक कुटूंब यांचे वास्तव चित्रण आलेले आहे. एकुणच 'इंधन' कादंबरीतून गावातील काही माणसामध्ये जातीय व धार्मिक वैमनस्य कसे वाढत जाते व त्यातून कसा संघर्ष उभा राहतो याचे चित्रण रेखाटलेले आहे.

त्याचप्रमाणे आनंद यादव यांच्या 'गोतावळा' कादंबरीने ग्रामीण कादंबरीच्या वाटचालीत व विकासाला एक वेगळे वळण लावण्याचा प्रयत्न केलेला आहे. या कादंबरीतील नायक नारबा असुन त्याचा 'गोतावळा' त्याचे बैल, रेडा, घोडे, कोंबडा, कुत्रा, शेरडे व विहीरीतील कासव आहे. या सर्वांसोबतचे त्याचे जडलेले मैत्रीचे नाते त्या प्राण्यांप्रमाणेच आहे. हे दर्शविण्याचा यादवांनी प्रयत्न केलेला आहे. नारबाला माणसांपेक्षा हा प्राण्यांचा 'गोतावळा' अधिक जवळचा वाटतो. कारण त्याला त्यांच्याकडून त्याला निष्पाप, निरागस प्रेम मिळते. कालांतराने यांत्रिकीकरणामुळे यंत्र सामुग्रीचा शेतात प्रवेश होतो त्यातुन प्राण्यांची आवश्यकता कशी कमी होते. यंत्रामुळे कालांतराने माणसांचीही आवश्यकता कशी कमी होते हे 'गोतावळा' तून चित्रीत केले आहे.

थोडक्यात मानवी संबंधाची जपणूक करणाऱ्या नारबाची ही आत्मकथा आहे तसेच ग्रामीण समाजजीवनाचे अस्सल व वास्तवदर्शी चित्रण 'गोतावळा' तून साकार होतांना दिसते.

'गांधारी' कादंबरीतून ना.धो. महानोर यांनी 'गांधारी' गावाची कथा सांगितली आहे. दुष्ट प्रवृत्तीच्या माणसांमुळे गावाची दयनीय अवस्था होते. गाव या लोकांच्या कोंडीत सापडते त्यामुळे गावाची अवस्था वाईट होते. प्रथम उध्दवस्त झालेले गाव पुन्हा स्थिर झाल्यावरही राजकारणामुळे अस्थिर होते असे भासवून गावात विशिष्ट लोकांची चालणारी सत्ता, वर्चस्व त्यामुळे गावातील सामान्य माणसांना होणारा त्रास याचे वर्णन या कादंबरीतून आलेले आहे तसेच शंकर पाटील यांनी 'घुंगरु' आणि 'बेईमान' या कादंबरीतून ग्रामीण जीवनातील विविध घटनांचे दर्शन घडविले आहे. 'येरझार' मधून बदलत्या खेडयाची कहाणी दि.बि. जोशी यांनी रेखाटली आहे. तसेच महादेव मोरे यांची 'बळी' एकोणसावी जात, स्टॅण्ड, 'लाईन' तसेच चंद्रकुमार नलगे यांच्या 'आगिनफुल', 'गस्त' या कादंबऱ्यातून ग्रामीण समाजजीवनाचे वास्तव चित्रण रेखाटलेले आहे.

१९७५ नंतर ग्रामीण कादंबरी लेखनात बराच बदल झाला. या काळातील ग्रामीण कादंबऱ्यातून समतावादी मुल्यांच्या प्रेरणेतून ग्रामीण समाजजीवनाची सुख दुःख व्यक्त होऊ लागली, यात विश्वास पाटील यांच्या 'पांगिरा' कादंबरीतून दुष्काळाचे वास्तव चित्र रेखाटलेले आहे. कादंबरीच्या सुरुवातीला संपुर्ण गावात आनंदाचे, उत्साहाचे वातावरण असते परंतू कालांतराने दुष्काळ व गावातील राजकारण यामुळे गावाची तेथील माणसांची कशी दयनीय अवस्था होते ते कसे उध्दवस्त होत जातात हे या कादंबरीतून रेखाटलेले आहे. एकुणच पांगिरा कादंबरीतून दोन गावांच्या माणसांचे सामुदायिक आयुष्य आणि त्यातील चढ उताराचे तसेच सामुहिक जाणिवांचे वास्तव चित्रण आलेले आहे. याच



PRINCIPAL
K.S.S's.Smt.V.U.Patil Arts & Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

बरोबर 'आभाळ' या कादंबरीतून तानाजी राऊ पाटील यांनी कर्जात जन्मणाऱ्या, कर्जात जगणाऱ्या आणि कर्जातच मरणाऱ्या एका अल्पभुधारक शेतकऱ्याची कथा रेखाटलेली आहे. खेडयात जीवन जगणारा अल्पभुधारक, शेतकरी, शेतमजुरांच्या अशिक्षीतपणाचा फायदा घेऊन काही दलाल त्यांना कशा प्रकारे लुटतात याचे चित्रण रेखाटलेले दिसून येते.

सदानंद देशमुख यांची 'तहान' कादंबरी ग्रामीण समाजजीवनाचे वास्तव चित्रण करतांना दिसते 'तहान' या शिर्षकाद्वारे या कादंबरीचे कथानक लक्षात येते. पाणी टंचाईच्या पार्श्वभुमीवरील धगधगत्या ग्रामीण जीवनाचे भेदक तसेच वास्तव चित्रण 'तहान' मधून येते निसर्गाच्या अवकृपेमुळे आणि दुष्काळी परिस्थितीमुळे राघोजी शेवाळे नामक शेतकऱ्याच्या कुटूंबासोबत गावातील कुटूंब कशाप्रकारे उध्दवस्त होतात याचे वर्णन येथे येते. दुष्काळी परिस्थितीमुळे फक्त मानवी जीवनच उध्दवस्त होत नाही तर ग्रामीण भागातील शेतकऱ्याचा अविभाज्य घटक प्राणी, पशुपक्षी यांचीही कशी दयनीय अवस्था होते तसेच या पाणीटंचाईचा काही लोक कशा पध्दतीने फायदा घेतात याचेही वास्तव चित्रण 'तहान' मधून आलेले आहे तसेच रविंद्र शोभणे यांच्या 'कोंडी' या कादंबरीतून परिस्थितीमुळे अगतिक झालेल्या माणसांची 'कोंडी' कशा प्रकारे होते याचे चित्रण आलेले आहे. अशा अनेक साठोत्तरी ग्रामीण कादंबऱ्यातून तत्कालिन समाजजीवनाचे वास्तव चित्रण रेखाटलेले दिसून येते.

सारांश :-

एकुणच साठोत्तरी मराठी ग्रामीण कादंबऱ्यातून ग्रामीण भागात राहणाऱ्या माणसांचे प्रश्न, त्यांच्यातील संबंध, खेडयातील संस्कृती तेथील माणसांचे निसर्गाशी असलेले नाते शेतकरी, कष्टकरी, शेतमजुरांच्या कथा, व्यथा अडाणीपणामुळे होणारी लुबाडणूक खेडयातील राजकारण व महत्वाचे म्हणजे औद्योगिकीकरण, यांत्रिकीकरण, विज्ञान व तंत्रज्ञानाची प्रगती यामुळे ग्रामीण्ण जीवनात घडलेला बदल यांचे चित्रण कादंबरीकारांनी वास्तवपुर्ण मांडण्याचा प्रयत्न कादंबरीकारांनी केलेला दिसून येतो.

संदर्भ :-

१) धग :- उध्दव शेळके
२) बनगरवाडी :- व्यंकटेश माडगूळकर
३) टारफुला :- शंकर पाटील
४) गोतावळा :- आनंद यादव
५) पांगिरा :- विश्वास पाटील
६) तहान :- सदानंद देशमुख
७) साहित्य :- ग्रामीण आणि दलित (संपादक) डॉ. ईश्वर नंदपूरे
८) मराठी ग्रामीण कादंबरी :- डॉ. रविंद्र ठाकूर

T.S.S's. Smt V.U. Patil Arts & Late Dr.B.S. Desale Science College Sakri Dist. Dhule

Volume 7 (Special Issue 09) November 2017 ISSN-No. 2230-9578

प्रा. हिमेश माळी (साक्री)

# Journal of Research and Development

A Multidisciplinary International Level Referred Journal

COSMOS
IMPACT FACTOR
4.270

UGC Approved Journal
ज्ञान-विज्ञान विमुक्तये
UGC
No. 64768



Volume 7 (Special Issue 09) November 2017 ISSN-No. 2230-9578

PRINCIPAL
T.S.S's Smt. V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

| | Name | Title of the Paper | |
|---|---|---|---|
| | **English** | | |
| 1 | Singh Dr. Abhay Kumar | The Naxal Problem: Issues, Challenges & Diagnostic Approach | १ |
| 2 | Gosavi D. M. | Naxalite Movement in the21st Century: Problems & Solutions | १८ |
| 3 | Wagh Dr. L. P. | The Naxal Problem Understanding Issues, Challenges & Alternative Approaches | २१ |
| 4 | Kamble, Dr. Surendra | The Issues & State Policy on the Naxal Threats in Contemporary India | २५ |
| 5 | Verma Avneeshkumar | Socio - Economic Solution to Naxal Violence | २८ |
| 6 | kulkarni, Sneha | Role of Women in Maoist War in India - Naxalite & Anti Naxalite Spectrum | ३२ |
| 7 | Satish Nikam | Naxalism : Its Perception and Solutions | ३६ |
| 8 | Sunil Kumar | Naxalism - A Major Security Challenge for Indias Security | ४१ |
| | **Hindi** | | |
| 9 | पाटील एस. आर. | नक्सलवाद से भारत की आन्तरिक सुरक्षा पर प्रभाव | ४३ |
| 10 | देशमुख, प्रा. आबासाहेब एम. | भारतमे नक्षलवाद की ऐतिहासिकता और समस्या समाधान | ५० |
| 11 | खत्री डॉ. संतोष एस. | नक्सलवाद: राजनैतिक मानसिकता | ५३ |
| 12 | सिंह, अरविंद कुमार, सिंह, डॉ. अभयकुमार | नक्सलवाद: समस्या, साजिश एवं समाधान | ५६ |
| | **Marathi** | | |
| 13 | तोडकर डॉ. बी. डी. | नक्सलवादी चळवळ : कारणे आणि उपाययोजना | ५९ |
| 14 | नेरकर आर. बी. | नक्सलवादी चळवळी : प्रशासनासमोरील प्रश्नचिन्ह | ६३ |
| 15 | पाटील डॉ. के. बी. | नक्षलवादाचा वाढता प्रभाव आणि भारताची अंतर्गत सुरक्षा | ६८ |
| 16 | चक्रे किरण | भारताच्या अंतर्गत सुरक्षेसमोरील समस्या : नक्षलवाद | ७१ |
| 17 | राऊत, प्रा. रमेश | भारतातील नक्षलवादी समस्या सोडविण्यातील सं.रा.सं.चे कार्य | ७४ |
| 18 | पाटील प्रमोद आर. | नक्षलवादी चळवळ आणि भारताची अंतर्गत सुरक्षा | ७७ |
| 19 | धर्माधिकारी डॉ कविता जे. | एकविसाव्या शतकातील नक्षलवादी चळवळ: उपाययोजना | ८० |
| 20 | मोरे प्रवीण बी. | भारताच्या अंतर्गत सुरक्षेवर परिणाम करणारा घटक: नक्षलवाद | ८३ |
| 21 | पाटील एन. झेड. | नक्षलवाद: भारताच्या अंतर्गत सुरक्षेपुढील आव्हान | ८७ |
| 22 | गडदरे आनंदा बी. | नक्षलवादी चळवळ आणि भारताची अंतर्गत सुरक्षा | ९२ |
| 23 | मेघे राहुल पी. | भारताच्या सार्वभौमत्वाला आव्हान नक्षलवाद्यांचे | ९५ |
| 24 | कुळकर्णी डॉ. शरद एम. | एकविसाव्या शतकातील नक्षलवादाचे आव्हान व उपाययोजना | ९८ |
| 25 | राजपुत सुनिल एच. | २१व्या शतकातील नक्षलवादाचे आव्हान व उपाययोजना | १०१ |
| 26 | घन आनंद एल. | भारताची अंतर्गत सुरक्षा आणि नक्षलवादी चळवळ | १०४ |
| 27 | देसले डॉ. मधुकर ए. | नक्षलवादी चळवळ - कारणे, परिणाम आणि उपाययोजनांचा समाजशास्त्रीय अभ्यास | १०७ |
| 28 | नागरगोजे के. एम. | महाराष्ट्र राज्यातील अंतर्गत सुरक्षेत नक्षलवादाचा प्रभाव | ११० |
| 29 | जाधव, प्राचार्य डॉ. विजय वाय. | नक्षलवाद्यांची बंडखोरी बंडखोरी व त्यावरील उपाययोजना | ११२ |
| 30 | गावित गिरीश जे. | भारताच्या अंतर्गत सुरक्षेला धोका - नक्षलवाद | ११५ |
| 31 | निकुंभ डॉ. जी. एच. / धगधगे उपेंद्र जे. | केंद्रीय राखीव दलाचे नक्षलवाद विरोधातील योगदान | ११८ |
| 32 | माळी दिनेश डी. | नक्षलवादाचा भारताच्या अंतर्गत सुरक्षेवर प्रभाव | १२३ |
| 33 | गायकवाड डॉ. अभिषेक | नक्षलवादी चळवळ: आव्हाने व उपाययोजना | १२६ |
| 34 | गायकवाड डॉ. सुजाता | २१व्या शतकातील नक्षलवादी चळवळ - कारणे व सामाजिक, राजकीय व प्रशासनिक परिणाम : उपाययोजना | १३१ |
| 35 | पाटील प्रा. गुलाब एस. | नक्षलवाद - भारताच्या अंतर्गत सुरक्षेपुढील एक आव्हान | १३५ |


PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

Journal of Research & Development
Vol.07 (Special Issue) November 2017,(ISSN-2230-9578)
UGC Journal List No.64768,COSMOS IMPACT FACTOR-4.270

समती अन्यायाविरुध्द आवाज काढण्याची प्रक्रिया सुरु होते. परिस्थितीनुसार शस्त्र स्फोटके, दारुगोळा इत्यादींचाही उपयोग केला जातो.नक्षलवादी चळवळीमध्ये एकाच वेळी अनेक कारवाया न करता ठरावीक ध्येय, लक्ष्य डोळ्यापुढे ठेवून त्यासाठी परिणामकारक कारवाया केल्या जातात. विशेष म्हणजे नक्षलवाद्यांच्या निरनिराळ्या गटांमध्ये आणि संघटनांमध्ये मोठ्या प्रमाणात सहकार्याची भावना रुजली आहे. संघटना संघटनांमध्ये एकसूत्रीकरण आढळून येते. अलीकडेच नक्षलवादी परिस्थितीला अनुसरुन कार्य करु लागलेले आहेत. हिंसाचारामध्ये त्यांना विशेष रुची नाही. आपल्या मागण्या पूर्ण होताना त्यांनी सामाजिक बांधिलकी पूर्णपणे सोडलेली नाही.

**आंध्रप्रदेशातील चळवळ :**

अनेक कारणांमुळे भारतीय कम्युनिस्ट पक्षात (C.P.I.M.L.) फाटाफूट झाली व त्यातून अनेक गट निर्माण झाले. पण शेतकरी व मजूरवर्गाचा सशस्त्र संघर्ष हे ध्येय सर्व गटांचे समान आहे. एकेकाळी एकट्या आंध्रप्रदेशात दहा नक्षलवादी गट अस्तित्वात होते, तर बिहारमध्ये ९ गट होते. चारु मुजुमदार यांचे कट्टर शिष्य कोंडापल्ली सीतारामय्या यांनी १९८० मध्ये पीपल्स वॉर ग्रुप ची स्थापना केली व इतर नक्षलवादी गटांना निष्प्रभ करुन सोडले. आंध्रप्रदेशात त्यांनी उत्कृष्ट संघटना उभी केली होती. अनेक गनिमी पथके (guirrilla squads) पण तयार केली. त्यांना 'डालमा' असे संबोधले जात असे. या पथकांनी शत्रूचा पूर्ण 'खातमा' करणे, त्याचे तळ उद्ध्वस्त करणे, सुरक्षा सैनिकांवर दबा धरुन हल्ले करणे, राज्य सरकारच्या मालमत्तेची मोडतोड करणे, नासधूस करणे यांचा सपाटा चालवला. सन १९८४ पासून १९८८ पर्यंत २१ शिपाई, ५ हेडकॉन्स्टेबल, ५ सबइन्स्पेक्टर्स, १ डेप्युटी सुपरिंटेंडेंट यांना यमसदनी पाठवले आहे. डिसेंबर १९८७ साली पुलामेट्टा खेड्याजवळ ७ आय. एस. ए. अधिकाऱ्यांचे अपहरण करण्यात आले. तुरुंगात असलेल्या ८ नक्षलवाद्यांना सोडल्यानंतरच त्यांची सुटका करण्यात आली. त्यांनी जमीनदार, सावकार, सरकारी अधिकारी यांच्यात जबर दहशत निर्माण केली आणि आंध्र प्रदेशातील त्यांचे वर्चस्व असलेल्या भागात मजुरांना न्याय व योग्य मजुरी देणे भाग पाडले. व्याजाचे दरदेखील योग्य प्रमाणात आकारले जात आहेत की नाही हे बघितले. काही भागात कमीत कमी श्रमाचा मोबदला देण्याकरता व योग्य किमती आकारल्या जाव्यात याकरता, जनता न्यायालये (people's court) स्थापन करण्यात आली. अशा प्रकारे राज्य सरकारच्या अधिकाऱ्यांना व जमीनदारांना वठणीवर आणण्यात आले.

**बिहार :**

बिहार राज्य म्हणजे एकेकाळचे सम्राट अशोकचे साम्राज्य! याच प्रदेशात गौतम बुध्द निर्वाणाप्रत पोहोचले. मानवी संस्कृतीचा पाळणा असलेले हे राज्य एकविसाव्या शतकात प्राण कासावीस झाल्यासारखे कालक्रमणा करत आहे. याचे कारण गरिबी, साक्षरता, भ्रष्टाचार आणि नैतिक अध:पतन! या जंगलराज्यात कायद्याचे राज्य जवळ-जवळ संपुष्टात आले आहे. उच्चवर्णीयांच्या छळाला, जबरदस्तीला तोंड देण्यासाठी नक्षलवादी चळवळ जन्मास आली आहे. गेले तीन दशके बिहार राज्य हे जातीय संघर्षाचे आगर बनले आहे. आपले वर्चस्व कायम राखण्याकरता उच्चवर्णीयांनी स्वत:च्या खाजगी सेना उभारल्या आहेत. राज्यात शासनयंत्रणा ठप्प झाल्यामुळे बिहारच्या अनेक भागात समांतर अशी व्यवस्था, यंत्रणा निर्माण झाली आहे. राज्याच्या नियंत्रणाखाली असलेल्या शिक्षणसंस्थांचा बोजवारा उडाल्यामुळे हजारो सामान्य, दिखाऊ शिक्षणसंस्था स्थापन झाल्या आहेत. सरकारी आरोग्यसेवेतील डॉक्टरांना खाजगी प्रॅक्टिस परवानगी दिल्यामुळे डॉक्टर मंडळींनी प्रचंड कमाई केली आहे. सरकारी पाणीपुरवठा, रोगराईचे माहेरघर बनला आहे; कारण दूषित पाणी पुरवठ्यामुळे हजारो माणसे पावसाळ्यात आजारी पडत आहेत. पोलीसखात्याबद्दल असंख्य तक्रारी आहेत. पोलीस खाते सर्वसामान्य माणसाला संरक्षण आणि सुरक्षा देऊ शकत नाही. देशातील सर्वात जास्त मनुष्यहत्या, अपहरणे, खंडणी वसुली, कस्टडीतील मृत्यू बिहारमध्ये आढळून येतात, अनेक प्रकरणात, पोलिसांचे, दादा लोक, मवाली, सशस्त्र गुंड यांचेबरोबर साटेलोटे असते. या सर्व कारणांमुळे बिहारमध्ये खाजगी सेनांचे प्राबल्य निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीमुळे, सामान्य जनता, दलित वर्ग, शेतकरी व शोषित वर्ग यांना पण आपापल्या खाजगी सेना उभ्या कराव्या लागल्या आहेत. एवढेच नव्हे, तर गनिमी काव्याची पथके पण येथे उभारली गेली आहेत. नक्षलवादाचा अभ्यास करताना या काव्याची गोष्ट लक्षात घेतल्या पाहिजेत.



Journal of Research & Development
Vol.07 (Special Issue) November 2017,(ISSN-2230-9578)
UGC Journal List No.64768,COSMOS IMPACT FACTOR-4.270

**महाराष्ट्र :**

महाराष्ट्र आदिवासींची संख्या ९% आहे. आज ही संख्या सुमारे एक कोटी आहे. आदिवासींच्या विकासाची जबाबदारी राज्य सरकारवर आहे. राज्यातील ६३६,००० आदिवासी कुटुंबापैकी ५७८,१३६ कुटुंब दारिद्र्यात जगत असून ८३% भूमिहीन आहेत. आदिवासी विकासाच्या शासनाच्या अनेक योजना आहेत पण त्यांच्या स्थितीत सुधारणा होत नाही. अर्थसंकल्पातील ५ टक्केही रक्कम खर्च होत नाही. १९९३-९४ मध्ये सुकथनकर समिती स्थापन करण्यात आली. परंतु १७ वर्षांनंतर अद्यापही शासनाने त्यासाठी निधीची तरतूद अर्थसंकल्पात केलेली नाही. याउलट या १७ वर्षांमध्ये ८,२३९ कोटी रुपये अन्य कामांसाठी वळविण्यात आले आहेत. ही महाराष्ट्रातील परिस्थिती असून इतर राज्यांमध्ये यापेक्षा वेगळी स्थिती नाही.

महाराष्ट्रात आदिवासींच्या योजनांचा पैसा कृष्णा खोरे विकास महामंडळाकडे वळविण्यात आला होता याबरोबरच मंजूर असलेला पैसाही योग्य रितीने खर्च केला जात नाही. आदिवासी योजनांच्या नावावर मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होतो आहे. मोठ्याच संख्येने आदिवासी आज बेरोजगार व भूमीहिन आहेत. जुन्या ओलिताखालील जमिनी आदिवासींच्या नावावर करण्याचा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय आहे. परंतु शासन त्यांचा मालकीहक्क नाकारत आहे, दुसरीकडे ओरिसा, छत्तीसगड, झारखंड राज्यातील माओवाद्यांनी त्यांच्या प्रभावाखालील हजारो एकर जमिन आदिवासींना कसण्यासाठी उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामुळे साहजिकच त्यांचा पाठिंबा माओवाद्यांना मिळतो आहे.

**संदर्भ :-**

१) प्रा. ए. पी. चौधरी, सौ. अर्चना चौधरी - 'भारताची अंतर्गत सुरक्षा' - प्रशांत पब्लीकेशन्स, जळगांव
२) डॉ. देवेंद्र विसपुते, डॉ. कविता धर्माधिकारी, डॉ. अरुण वळी - 'भारताची अंतर्गत सुरक्षा' - प्रशांत पब्लीकेशन्स, जळगांव
३) प्रा. म. न. उदगावकर - 'एकविसाव्या शतकातील दहशतवाद' - डायमंड पब्लिकेशन्स
४) ब्रिगेडियर हेमंत महाजन - 'नक्षलवादाचे आव्हान चीनचे भारताशी छुपे युध्द' - नचिकेत प्रकाशन, नागपूर
५) डॉ. परशुराम गुप्त - 'नक्सल विद्रोह समस्या एवं समाधान' - प्रकाश बुक डेपो, बरेली
६) बी. एन. अरोरा, नन्द किशोर, अभयकुमार सिंह - 'दक्षिण एशिया में सुरक्षा चुनौतियां के नए आयाम' मोहित पब्लिकेशन्स - नई दिल्ली.

-*-*-*-

T.S.S's Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule

PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

२) छत्तीसगढ मधील सुकमा आणि दंतेवाडा या दोन जिल्हयात मोठया प्रमाणावर जवान मृत्युमुखी पडतांना दिसतात. म्हणुन यासंदर्भात विशेष रणनीती आखणे गरजेचे वाटते.

३) कें.रा.पो.दलाच्या जवानांकडे असलेली शस्त्रे अत्याधुनिक असावीत. व त्यांना शस्त्रास्त्रा विषयीचे प्रशिक्षण त्यांना देण्यात यावे

४) दिवसागणिक या दलावर होणाऱ्या हल्ल्यांचे स्वरुप हे भीषण होतांना दिसते. या सर्वात गुप्तवार्ता विभागाचे अपयश दिसुन येते.या विभागास कार्यक्षम बनविणे गरजेचे आहे.

५) स्टॅण्डर्ड ऑपरेटिंग प्रोसिजरची अमंलबलावणी होताना दिसत नाही. रोड ओपनिंग पार्टी ही रस्ता सुरक्षित करतांना दिलेल्या आदर्श मानकांकडे दुर्लक्ष करतात. जवानांनी छोटया-छोटया तुकडया करुन आपल्याला दिलेले कार्य करणे अपेक्षित आहे. जेणेकरुन त्यांच्यावर हल्ला झाल्यास त्यात कमीत- कमी मनुष्यहानी होईल मात्र याकडे दुर्लक्ष करुन जवान मोठया संख्येने एकत्र फिरल्याने जास्त मनुष्यहानी घडुन येते.

६) मोठया प्रमाणावर होणारी मनुष्यहानी ही रोड ओपनिंग पार्टीच्या संदर्भात होतांना दिसते म्हणुन या कार्यात UAV म्हणजे ड्रोनच्या माध्यमातुन मदत घेतल्यास त्याचा फायदा होईल.

७) नव्याने निर्माण होत असलेले आर्टिफिशियल इंटेलिजन्स च्या क्षेत्राचा यासाठी उपयोग केल्यास जमेची बाजू ठरु शकेल.

८) मुख्यालयापासुन दुर पर्यंत गस्तीसाठी जाणाऱ्या जवानांच्या तुकडयांचा ठाव-ठिकाणा घेण्यासाठी Global Positioning System (G.P.S.) चा उपयोग फायदेशीर ठरु शकेल.

९) जवानांवर हल्ला झाल्यास जखमींना दवाखान्यात नेण्यासाठी अतिरिक्त कुमक पाठविण्यासाठी हेलिकॉप्टर चा उपयोग महत्वाचा ठरतो.

***

## संदर्भ सूची

१) Red Corridor to be redrawn, vijaita Singh, Dated, २४/०७/२०१६www.thehindu.com/news/national/
२) Mha.nic.in/hindi/armedforces.
३) Crpf.nic.in/history-crpf-hi.htm
४) Crpf.nic,in/role-of-crpf.htm
५) Crpf.nic.in/RAFSector.htm
६) Crpf.nic.in/mahila-battalions htm
७) Crpf.nic.in/cobra-sector.htm
८) The Heart of India is Under attack, Arundhati Roy, ३०/१०/२००९ www.theguarding.com
९) Centre's-anti-naxal Plan to be implemented soon-CRPF, ९/१०/२००९ www.thehindu.com/news/national
१०) Gree Hunt:The anatomy of an Operation-Aman sethi, ०६/०२/२०१० www.thehindu.com
११) The worst maoist attack's in the last १० years, २५/०४/२०१७ www.thehindu.com
१२) Naxal attack's: Timeline of major incidents since, २५/०४/२०१७ Indianexpress.com/article/india/naxal-attacks-
१३) Indianexpress.com/article/india/heart-attacks.suicide-kill-more-crpf-jawans-than-naxal-operation-४६१०४७३/
१४) P. I. B. Govt. of India. Ministry of Home Afairs.०८/०५/२०१७ Pib.nic.in/newsite/Printrelease-aspx?relid=१६१६२५





# ३२. नक्षलवादाचा भारताच्या अंतर्गत सुरक्षेवर प्रभाव

प्रा. दिनेश दयाराम माळ
वि. उ. पाटील कला, व देसले विज्ञान महाविद्यालय, साक्री जि. धुळे

**प्रस्तावना :**

भारतात 'नक्षलवाद' हा 'माओवाद' म्हणून ओळखला जातो. 'नक्षलवाद' एक प्रकारचा कट्टर साम्यवाद आहे. साम्यवादी आहे. साम्यवादी विचारसरणीनुसार सर्व मालमत्ता, संपत्ती ही राष्ट्रीय मालमत्ता, संपत्ती आहे राष्ट्रातील मालमत्तेवर कोणत्याही एका पक्षाचा शक्तीचा अधिकार नसून ती सर्वांची मालमत्ता असल्याने या ठिकाणी सर्व व्यक्ती समान आहेत. त्यातूनच सुमारे ३० वर्षापूर्वी नक्षलबारी येथे संथाळ आणि अन्य आदिवासी टोळ्यांनी उठाव केला, बंड उभारले. त्या आधी मार्क्सीस्ट साम्यवादी पक्षाच्या नक्षलबारी शाखेने मध्यवर्ती पक्षाला डावलून जो सशस्त्र उठाव केला तो उठाव म्हणजे नक्षलवादी चळवळीची सुरुवात होय. गेल्या ३० वर्षांच्या नक्षलवादी कार्यवाहींचा विचार केला तर स्पष्ट होते की त्यांच्या लढ्याच्या स्वरुपात, वर्गपध्दतीमध्ये आणि ध्येयधोरणामध्ये बराचसा लक्षणीय बदल झालेला आहे. सध्यातरी नक्षवादींनी आंतरराष्ट्रीय कल्पना सोडून दिलेल्या आहेत. स्थानिक राष्ट्रीय क्रांतीचे त्यांना अपेक्षित आहे.नक्षलवादी आपल्या आजूबाजूच्या लोकासाठी लूटमार करतात. त्या चळवळीमध्ये समावलेल्या बहुतेक सर्व जमाती दारिद्र्याने घेरलेल्या आहेत. बहुतांशी आदिवासी, क्षेत्रात, भागात या नक्षलवादी चळवळीचा प्रसार झालेला आहे.

बिहारमध्ये नक्षलवाद्यांनी विस्तृत क्षेत्रात आपला लढा सुरु केलेला आहे. मध्येप्रदेश, महाराष्ट्र, आंध्रप्रदेश आणि ओरिसातही नक्षलवादी चळवळी संक्रीय आहेत. मध्यप्रदेशातील बस्तर जिल्ह्यात आदिवासी जमातीच्या हितसंबंधेचे रक्षण करण्याचे कार्य नक्षवादी चळवळीतून सुरु आहे. आदिवासींच्या जमीनी हडप करणारे जमीनदार शेतकरी, सावकार, कंत्राटदार आणि भ्रष्ट सरकारी अधिकारी या सर्वांच्या विरुध्द नक्षलवाद्यांचा लढा सुरु आहे. बिहारमध्ये हरिजन-गिरीजन आणि मागासलेल्या जमातींच्या बतीने नक्षलवाद्यांनी शस्त्र उचललेली आहेत. त्या चळवळीमध्ये विनोद मिश्राचे नेतृत्व उल्लेखनीय आहे.

- **मातृभाषेतून शिक्षणाचे माध्यम :-** मुंबई ईलाख्यात मातृभाषा हेच शिक्षणाचे माध्यम असावे असे एलफिन्स्टनचे धोरण होते. म्हणून नव्या शिक्षणाचा लाभ अगदी सामान्य शेतकऱ्यांला सुध्दा व्हावा व आपल्या व्यवसायात त्याला उपयोगी पडावे असे त्यांना वाटत होते. १८४३ मध्ये मुंबई हायकोर्टचे जज्ज सर इरस्किन पेरी हे शिक्षण समितीचे अध्यक्ष होते. त्यांनी इंग्रजी माध्यमाची बाजू उचलून धरुन महाराष्ट्राने देखील बंगालचे अनुकरण करावे असे विचार मांडले होते. तेव्हा कर्नल जेर्व्हिस आणि मंडळाच्या तीन इतर सभासदांनी त्याला विरोध करुन मातृभाषा हेच माध्यम असावे असा आग्रह धरला होता. यात जगन्नाथ शंकरशेठ व त्यांचे इतर सहकारी यांचे फार मोलाचे योगदान होते. म्हणून मातृभाषेचे माध्यम जवळपास सर्व शाळांपर्यंत पोहचण्यास मदत झाली होती.[२२] रयतेला शिक्षण देणे हे आपले कर्तव्य आहे. त्यासाठी उत्तम दर्जाचे शिक्षणखाते निर्माण केले पाहिजे असे एलफिन्स्टनला वाटत होते. त्याचबरोबर मुंबई प्रांताची स्थानिक भाषा मराठी असल्यामुळे व्यवहारात व प्रशासनात सुलभता यावी म्हणून इंग्रज अधिकाऱ्यांना मराठी भाषा चांगल्याप्रकारे समजणे आवश्यक होते. या दोन्ही भाषांपैकी किमान एकाभाषेचे ज्ञान महसुली अधिकाऱ्यांला असणे आवश्यक आहे असे कंपनी सरकारला वाटत होते.[२३] एलफिन्स्टनच्या विचाराने असे लक्षात येते की जर भारतात इंग्रजी सत्ता रुजवायची असेल तर स्थानिक भाषांना प्राधान्य देणे महत्त्वाचे आहे याची जाणीव त्याला होती.[२४] शाळांच्या अभ्यासक्रमात इंग्रजी भाषेचे शिक्षण कोणत्या इयत्तेपासून सुरु करावे या विषयी ब्रिटिश सरकारच्या प्रशासनामध्ये एक वाक्यता आढळत नाही. त्यामुळे इंग्रजीमध्ये प्रावीण्य मिळविता आले नाही तर विद्यार्थी शिक्षण अर्धवट सोडून देत असत.[२५] म्हणून स्थानिक भाषेत शिक्षण द्यावे असे एलफिन्स्टनला वाटत होते.



PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal. Dist.Dhule

• **स्थानिक भाषेतून पुस्तकांची निर्मिती :-** कर्नल जेर्व्हिस, जगन्नाथ शंकरशेठ यांनी म्हटले की, ज्या भाषा लोकांना अवगत आहेत त्यात विद्या शिकवावी म्हणजे सोपे होईल. इंग्लिश शिकणे कठिण, इंग्लिश भाषा शिकवून अगदी थोड्यांची सुधारणा होईल, परंतु जर स्थानिक भाषेत पुस्तके तयार करुन विद्या शिकविली तर मोठ्याप्रमाणात सुधारणा होईल.[२६] शिक्षण कोणत्या भाषेत असावे असा वाद निर्माण झाला होता. १८४८ मध्ये कंपनी सरकारने मराठी, गुजराथी व इंग्लिश यांची परीक्षा घेतली होती. जे स्थानिक भाषेत अभ्यास करतील त्यांना लवकर ज्ञान होईल म्हणून स्थानिक भाषेत विद्याभ्यास करावा. व जे उच्च विद्या इंग्रजी भाषेतून शिकण्यास इच्छित आहेत त्यांना सरकारने मदत करावी. शिक्षण मंडळाने इंग्रजी शिक्षणासाठी पुष्कळ खर्च केला होता, परंतु मराठी व गुजराथी यांच्यासाठी कमी खर्च केल्याचे आढळते. म्हणून हेच जर उलट केले तर अधिक फायदा होईल. कारण स्थानिक भाषेत शिक्षण दिले तर लोकांमध्ये सुधारणा होईल असे कंपनी सरकारला वाटू लागले होते.[२७] मराठी, गुजराथी भाषक शिक्षक व पंतोजी यांना चांगल्यारीतीने तयार करुन त्यांना चांगला पगार दिला तर त्यांचा शाळांच्या कामकाजात उत्तम उपयोग होईल. व नवीन स्थानिक भाषेत पुस्तके तयार करण्यासाठी त्यांची मदत मिळेल.[२८] थोडक्यात कंपनी सरकारच्या काळात स्थानिक भाषेतून शिक्षण द्यावे यासाठी झटणारे काही इंग्रज अधिकारी होते. याचा फायदा खानदेशातील लोकांनी घेतला. व बऱ्याच ठिकाणी शाळा सुरु केल्या होत्या.

शाळांमध्ये शिकणारे विद्यार्थी, त्यांची संख्या यांची माहिती मिळविण्यासाठी बोर्ड ऑफ एज्युकेशनने १८४७ मध्ये स्थानिक शाळांची माहिती गोळा केली होती. त्या माहिती प्रमाणे स्थानिक शाळा आणि विद्यार्थी संख्या वाढलेली होती असे आढळून आले.[२९]

• **सर रस्किन पेरीचा नवा दृष्टीकोण :-** १८४३ मध्ये सर रस्किन पेरी यांच्या विचारसरणीमुळे शिक्षण क्षेत्रात नवा दृष्टिकोण निर्माण झाला. मराठी भाषेतून शिक्षण देण्याची एलफिन्स्टनची योजना टाकून देण्यात यावी व इंग्रजी शिक्षण काही निवडक लोकांना देण्यात यावे आणि असे पाश्चात्य शिक्षण घेतलेल्या भारतीयांनी आपल्या देशबांधवांना शिकवावे असा पेरीचा शिक्षणाविषयी नवा विचार होता.[३०]

• **लॉर्ड डलहौसीच्या काळातील शिक्षणविषयक बदल :-** १८१८ मध्ये पेशवाईचा शेवट झाला आणि महाराष्ट्रातील पेशव्यांच्या प्रदेशावर कंपनी सरकारची सत्ता प्रस्थापित झाली. पेशवाईच्या काळात सर्वसामान्य जनतेसाठी सार्वजनिक शिक्षण दिले जात नव्हते. परंतू कंपनी सरकारची सत्ता स्थापन झाल्यानंतर शिक्षणासाठी आर्थिक तरतूद केलेली होती. त्यासाठी दक्षिणा फंडाची स्थापना करण्यात आली होती. शिक्षणात एकसूत्रता असावी व शिक्षण क्षेत्रात प्रगती व्हावी म्हणून प्रशासकीय व्यवस्था करण्यात आली होती. त्यासाठी संचालक, तपासनीस व त्यांना मदत करणारे इतर कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली होती.

१८१३ च्या चार्टर ॲक्टनुसार कंपनी सरकारने दरवर्षी एकलक्ष रुपये खर्चाची तरतूद केली होती. १८१५ मध्ये बॉम्बे एज्युकेशन सोसायटीची स्थापना करुन हिंदी लोकांच्या शिक्षणासाठी प्रयत्न केला. व १८२२ मध्ये बॉम्बे नेटिव स्कूल आणि स्कूल सोसायटीची स्थापना करुन अनेक पुस्तकांची मराठी व गुजराथी भाषेत भाषांतरे केली होती. एलफिन्स्टनने शाळा सुरु करण्यात व पुस्तके छापण्यासाठी पुढाकार घेऊन शिक्षणक्षेत्रात प्रगती करण्यासाठी प्रयत्न केला होता. एलफिन्स्टन नंतर माल्कमने एलफिन्स्टनचे धोरण उचलून धरले होते. त्यानंतर मेकॉलेने भारतीयांना पाश्चात्य ज्ञान व्हावे म्हणून प्रयत्न केले होते. तर बेंटिंकने १८३५ मध्ये आपले शिक्षण विषयक धोरण जाहीर केले होते. १८४० मध्ये बोर्ड ऑफ एज्युकेशनची स्थापना करण्यात आली होती. व मुंबई इलाख्यातील शिक्षणाची पध्दतशीर व्यवस्था लावण्यात आली होती. त्यासाठी मुंबई ईलाख्याचे दोन भागात विभाजन करण्यात आले होते. १८४३ मध्ये सर रस्किन पेरीच्या शिक्षणक्षेत्रात नव विचारांचा उपयोग होताना दिसून येतो.

• **दक्षिणा फंडाची स्थापना :-** ईस्ट इंडिया कंपनी सरकारने १८४८ मध्ये दक्षिणा फंडाची स्थापना केली होती. या फंडातून जमा झालेल्या रक्कमेतून उत्कृष्ट पुस्तकांना बक्षिसे व उत्कृष्ट काम करणाऱ्या शिक्षण संस्थांना मानधन दिले जात होते.[३१] याचा परिणाम खाजगी शिक्षण संस्थांचे जाळे पसरले होते. एवढेच नव्हे तर शिक्षणक्षेत्रात खाजगी शिक्षण संस्थांच्या संख्येत वाढ झाली होती.

कंपनी सरकारची सत्ता प्रस्थापित झाल्यावर एलफिन्स्टनने स्थानिक लोकांच्या शिक्षणासाठी एक योजना तयार केली होती. पुढे ईस्ट इंडिया कंपनी सरकारने १८५३ च्या प्रसिध्द चार्टर ॲक्टनुसार

PRINCIPAL
I.S.S's Smt. V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri Tal. Sakri Dist.Dhule

१८५५ मध्ये डायरेक्टर ऑफ इन्स्ट्रक्शन हे पद निर्माण केले. व मुंबई ईलाख्यासाठी शिक्षणावर देखरेख करण्यासाठी एक खास यंत्रणा उभारली. व पहिला डायरेक्टर म्हणून एर्किसन पेरी याची नियुक्ती केली.[३२]

• **व्हर्नाक्यूलर शाळा स्थापने विषयी पुनर्आढावा :-** व्हर्नाक्यूलर शाळा स्थापनेविषयी कंपनी सरकारच्या धोरणात बदल झालेला आढळून येतो. च्शाळा ज्या तत्वावर स्थापन करण्यात आल्या होत्या. त्या शाळांचा सर्व खर्चाचा भार सोसने आणि ज्या गावाची लोकसंख्या द्दोन हजारापेक्षा कमी आहे तेथे अशा शाळा स्थापन होण्यापासून रोखणे.छ ह्या तत्त्वांशी सहमत होऊन विविध जिल्ह्यांमध्ये शाळा सुरु झाल्या होत्या. यासाठी लोकांचे व बोर्ड व्यवस्थापकांचे लेखी घेतली गेली. सुरुवातीला काही वर्षांत अशा प्रकारच्या शाळा मोठ्याप्रमाणात स्थापन करण्यात आल्या, परंतु नंतर ह्या शाळांचा खर्च अनुदानापेक्षा जास्त वाढल्यामुळे शासनाने अशा शाळा सुरु न करण्याचा आदेश दिला. अपवाद फक्त स्वतःचा खर्च स्वतः करणाऱ्या शाळांना सोडून दिले होते.[३३]

१८५२ ते १८५४ च्या दरम्यान कमी प्रमाणात नवीन शाळा सुरु झाल्या होत्या. वाढीव अनुदानानंतर ह्या सर्व शाळांचा पुनर्आढावा घेणे आवश्यक झाले होते. व मंडळाने ह्या शाळांची तपासणी केली असता या शाळांचा सर्व खर्च शासनाने करावा अशी शिफारस केली होती. त्याचबरोबर ज्या खेड्यांची लोकसंख्या दोन हजारापेक्षा कमी आहे त्यांना फक्त ह्या एकाच कारणासाठी शिक्षणापासून वंचित करणे योग्य नव्हते. म्हणून त्यांनी आपला निर्णय बदलेला होता.[३४] १८२१ मध्ये थॉमस मन्रोला एलफिन्स्टनने पत्र पाठविले होते. व त्यात राज्यकारभाराविषयी विचार कळविले होते. तशाच आशयाचे विचार १८५४ मध्ये एलफिन्स्टनने कोलब्रूकला लिहिलेल्या पत्रात व्यक्त करताना म्हटले होते की, "आपलं राज्य हिंदुस्थानात चिरकाल राहील असं स्वप्नातही आणू नये. नेटिव लोक आपलं राज्य चालवायला पूर्ण समर्थ होऊन ते आपलं स्वतःचं हित साधतील याकडे आपलं आतापासून लक्ष लागलं पाहिजे. शेवटी मागे राहणारा लौकिक आणि कर्तव्य केल्याच समाधान हेच आपलं बक्षीस समजलं पाहिजे."[३५] एलफिन्स्टनचे विचार लक्षात घेता असे कळते की, भारतात आपली सत्ता जास्त काळ टिकणार नाही. याची खात्री असून देखील आपण केलेले कार्य हे चिरकाल टिकेल असे कार्य करावे ही त्याची इच्छा दिसते व पुढे भविष्यात त्याची इच्छा पूर्ण झालेली दिसून येते.

खेड्यांमध्ये जर शाळा सुरु करावयाच्या असतील तर तेथील लोकांनी शिक्षकांचा अर्धा पगार व शाळेसाठी इमारत आणि पुस्तके उपलब्ध करुन द्यावेत. असे केले तर मंडळही शिक्षकांसाठी कमीत-कमी १० रुपये व जास्तीत-जास्त ४० रुपये शिक्षकांच्या पगाराचे नियोजन करेल.[३६] यावरुन ग्रामीण भागातील शिक्षणासाठी अनुदानापेक्षा जास्त खर्च झाल्यामुळे गावातील लोकांनी देखील शिक्षणाच्या कार्यात मोलाचे सहकार्य करावे. जेणेकरुन शिक्षणाची जाणीव त्यांनाही होईल व शिक्षणाचे महत्त्व कळेल.

• **शाळांवर देखरेख करणारी प्रशासन व्यवस्था :-** शाळांवर देखरेख करण्यासाठी कंपनी सरकारने जी प्रशासन व्यवस्था तयार केली होती ती सदोषपूर्ण व अपुरी आहे असे महात्मा फुले यांनी मत व्यक्त केले होते. ते म्हणतात "उपशिक्षण तपासनीस शाळेला वर्षातून एकदा भेट देतो. त्या भेटीपासून विशेष फायदा होत नाही. ग्रामीण भागातील शाळांची तपासणी वर्षातून निदान चार वेळा किंवा त्यापेक्षा अधिक वेळा झाली पाहिजे. शाळेच्या तपासणीविषयी शिक्षकांना पूर्वसूचना न देता शाळांना अचानक भेटी देणे ही गोष्ट उपयुक्त ठरेल. त्यासाठी जिल्ह्यातील किंवा खेड्यातील अधिकाऱ्यांवर अवलंबून राहून चालणार नाही. त्यांना अनेक प्रकारची कामे असतात. शाळांना भेट देण्यास त्यांना सवड येत नाही. त्यांनी केलेली शाळेची तपासणी ही बहुधा उथळ आणि अपूर्ण असते. युरोपियन अधिकाऱ्यांचे देखरेख अधून मधून आवश्यक आहे त्यामुळे शिक्षकांवर नियंत्रण राहण्यास साह्य होईल."[३७] महात्मा फुले यांनी तत्कालीन परिस्थितीत शिक्षण व्यवस्थेत सुधारणा होण्यासाठी मांडलेले विचार बऱ्याच अंशी उपयुक्त ठरले होते. त्यांनी सुचविलेल्या सूचनेचा अवलंब झ ालेला आढळतो.

१८५५ मध्ये डायरेक्टर ऑफ इन्स्ट्रक्शन हे पद निर्माण करण्यात आले होते. मुंबई ईलाख्याच्या शिक्षणावर देखरेख ठेवण्यासाठी पहिला डायरेक्टर म्हणून एर्किसन पेरी यांची नियुक्ती करण्यात आली होती. त्यांनी शिक्षण प्रसारासाठी व देखरेखीसाठी यंत्रणा उभी केली होती. उपशिक्षण निरीक्षकाचे पद निर्माण करुन शाळा तपासणीचे काम त्यांच्याकडे सोपविले होते. पुढे नगरपालिका अस्तित्वात

PRINCIPAL
T.S.S's.Smt.P.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

Journal of Research & Development
Vol.07 (Special Issue) November 2017,(ISSN-2230-9578)
UGC Journal List No.64768,COSMOS IMPACT FACTOR-4.270

करावा. इंग्रजी मधून देशी परिभाषा तयार करावी आणि मध्यस्थ्यांच्या हस्ते जनतेला क्रमाक्रमाने योजनेच्या मातृभाषेतून ज्ञान द्यावे असा सल्ला मेकॉलेने दिला होता.[४६] या पुढील टप्पा लॉर्ड हॅरिसच्या विचारात आढळतो.

१८८० मध्ये पुणे येथे न्यू इंग्लिश स्कूलड ची स्थापना झाली. आणि महाराष्ट्रात राष्ट्रीय शिक्षणास प्रारंभ झाला.[४७] लॉर्ड रिपन हा उदारमतवादी गर्व्हनर-जनरल होता. त्यांनी ८ फेब्रुवारी १८८२ रोजी भारतात पहिल्या शिक्षण आयोगाची स्थापना केली होती. या आयोगाच्या अध्यक्षपदी विल्यम हंटर यांची नेमणूक करण्यात आली होती.[४८] विल्यम हंटर यांनी संपूर्ण भारतात फिरुन शिक्षणाची पडताळणी केली. अनेक शिक्षण तज्ज्ञांशी चर्चा करुन शिक्षणात कोणत्या सुधारणा करता येतील या विषयी एक सविस्तर अहवाल ब्रिटिश सरकारला सादर केला होता.

- **हंटर कमिशन :-** वुडने शिक्षणाविषयी सुचविलेल्या शिफारशी व त्यानुसार राबविले गेलेले शिक्षणाचे धोरण या विषयी १८८२ मध्ये लॉर्ड रिपन यांनी हंटर यांच्या अध्यक्षेतेखाली एक कमिशन नेमले होते. व या कमिशनला शिक्षणाविषयी शिफारस करण्याचे सूचित केले होते. त्यानुसार हंटर कमिशनने शिक्षणाविषयी शिफारशी ब्रिटिश सरकारला सादर केल्या होत्या. हंटर आयोगाने शिक्षण क्षेत्रात प्रगती व्हावी या दृष्टीने काही सूचना वजा शिफारशी केलेल्या होत्या.

- खाजगी शिक्षणसंस्थांना सरकारने उत्तेजन द्यावे, व त्यांना अनुदान द्यावे.
- प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थांवर सोपवावी, परंतु
त्यावर सरकारचे नियत्रंण व देखरेख असावे.
- लोकशिक्षणाकडे अधिक काळजीपूर्वक लक्ष द्यावे.
- शिक्षणावरील सरकारी नियत्रंण शिथिल करावे. प्रांतिक सरकाराने आपल्या

उत्पन्नापैकी काही ठरावीक हिस्सा प्रतिवर्षी शिक्षणासाठी राखून ठेवावा.[४९] अशा विविध शिफारशी या हंटर आयोगाने सुचविलेल्या होत्या.

हंटर कमिशनच्या शिफारशीमुळे ब्रिटिश राजवटीत भारतात शिक्षणाचा प्रचार व प्रसार होण्यास मदत झाली होती. शिक्षणाची जबाबदारी सरकारची आहे. त्यामुळे शिक्षणक्षेत्रात महत्त्वाच्या सुधारणा, शिक्षण क्षेत्रातील उच्चवर्णियांची मक्तेदारी संपुष्टात येणे, शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली झाली, भारतीय समाजात आधुनिक विचाराला गती निर्माण होण्यास हंटर कमिशनच्या शिफारशी मुळे सुधारकांची नवी पिढी उदयास येण्यास व त्यातून राष्ट्रीय जागृती होण्यास चालना मिळाली.[५०]

१८५४ च्या वुडच्या खलित्यात ज्या शिफारशी होत्या त्यास कितपत यश आलेले आहे, त्याची पडताळणी करण्यासाठी १८८२ मध्ये हंटर कमिशन नेमण्यात आले होते. विद्यार्थ्यांच्या शारीरिक व बौध्दिक या दोन्हीही गुणांचा विकास होईल, असा शिक्षणक्रम तयार करावा व प्राथमिक शिक्षणाला जास्त उत्तेजन देऊन मुसलमानांना शिक्षण देण्यासाठी खास प्रयत्न केले जावेत असेही सूचित करण्यात आले होते. त्याचबरोबर हंटर आयोगाच्या सूचना पाळल्या जातात की नाही, त्यादृष्टीने शैक्षणिक विकास होतो किंवा नाही हे पाहणेसाठी दरवर्षी आढावा घेतला जावा अशीही शिफारस होती. म्हणून हा आयोग देशाच्या शिक्षण पध्दतीत महत्त्वाचा मानला जातो. एवढेच नव्हेतर शिक्षणव्यवस्थेला औपचारिक रुप आले होते.[५१] १८८२ च्या हंटर कमिशननंतर माध्यमिक शिक्षणात मॅट्रिक्यूलेशन व स्कूललिव्हींग सर्टिफिकेट अशा दोन मुख्य परीक्षा ठेवण्यात आल्या होत्या. माध्यमिक शिक्षणक्रमात साहित्यिक अभ्यासक्रमाला अधिक महत्त्व येऊ लागले होते. काही ठिकाणी तांत्रिक विद्यालयेही सुरु करण्यात आले होते. माध्यमिक शिक्षणाचे इंग्रजी भाषा हे माध्यम ठेवण्यात आले होते.[५२] १८५४ पासून १८८२ पर्यंत माध्यमिक शिक्षणाचा बराच विकास झालेला आढळून येतो. शिक्षणाचा उद्देश, अभ्यासक्रम, भाषा समस्या, परीक्षा, प्रशासन इत्यादी बाबतीत अनेक दोष निर्माण झाले असले तरी शिक्षण क्षेत्रात विविध उपाय योजनांद्वारे प्रगती होताना दिसते. हे नाकारता येणार नाही.

लॉर्ड रिपन यांनी शहरी व ग्रामीण भागातील स्थानिक लोकांना शिक्षणाचा अधिकार दिला होता. प्राथमिक शिक्षण हे स्थानिक मंडळाकडे सोपविण्यात आले होते. नगरपरिषदा, जिल्हा स्थानिक मंडळ यांना त्यांच्या भागातील प्राथमिक शाळांच्या प्रशासनाची जबाबदारी सोपविण्यात आली होती, परंतु प्रत्यक्षात शाळांची पाहणी व शिफारस करण्याचे काम पर्यवेक्षक या अधिकाऱ्यांमार्फत केले जात होते. त्याचबरोबर

PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

Journal of Research & Development
Vol.07 (Special Issue) November 2017,(ISSN-2230-9578)
UGC Journal List No.64768,COSMOS IMPACT FACTOR-4.270

जिल्हा स्थानिक मंडळाला शाळेची स्थान निश्चिती व फी विषयी निर्णय घेण्याचा अधिकार देण्यात आला होता, परंतु शिक्षकांच्या नेमणुका व बदल्या या सारखे प्रशासकीय हक्क शिक्षणविभागाकडे ठेवण्यात आले होते. त्याचबरोबर नगरपरिषदांना त्यांच्या भागातील प्राथमिक शाळांवर नियत्रंण ठेवण्याचा अधिकार देण्यात आला होता.[५३] थोडक्यात लॉर्ड रिपन यांच्या काळात शहरी भागाबरोबरच ग्रामीण भागातील शिक्षणाकडे लक्ष दिलेले दिसून येते. एवढेच नव्हेतर स्थानिक मंडळांनाही विश्वासात घेऊन त्यांच्यामार्फत शिक्षणाचे कार्य केले जांत होते. असा प्रयत्न खानदेशातही झालेला होता.

- **राष्ट्रीय शिक्षण कल्पनेचा विकास :-** राष्ट्रीय भावनेने प्रेरित झालेल्या संस्था चालकांना व शिक्षकांना मार्ग काढता येईल आणि विद्यार्थ्यांच्या मनावर राष्ट्रीय भावनेला पोषक संस्कार घडवून आणता येतील. या श्रध्देने खाजगी शिक्षणसंस्था उभे करुन लोकशिक्षण लोकांच्या हाती घेण्याचा उपक्रम चिपळूणकर, टिळक व आगरकरांनी केलेला होता. त्यांच्या या उपक्रमाने महाराष्ट्रात राष्ट्रीय शिक्षणास प्रारंभ झाला असे म्हणता येईल. वाढत्या लोकजागृती बरोबर राष्ट्रीय शिक्षणाच्या कल्पनेचाही विकास होत गेला. केवळ लोकांनी चालविलेले एवढेच नव्हे, तर राष्ट्रीय अस्मितेची प्रत्यक्ष जोपासना करणारे शिक्षण असा विचार प्रभावी होऊ लागला.[५४] खाजगी शिक्षणसंस्थांना शाळा चालविण्यासाठी देऊन त्याच्यातून राष्ट्रीय शिक्षणाचा उगम झाला होता. त्याचा उपयोग स्वातंत्र्य चळवळीत झाला. या कल्पनेतूनच राष्ट्रीय शिक्षणास चालना मिळाली होती.

१८७१ मध्ये प्रांतिक सरकारकडे शिक्षणाची जबाबदारी सोपविण्यात आली होती. व प्रांताला केंद्राकडून शिक्षणासाठी जी मदत मिळत होती ती बंद झाली होती. म्हणून १८८४-८५ मध्ये प्रांतिय सरकारने असे ठरविले होते की, प्रांतातील नगरपरिषदा ह्या त्यांच्या उत्पन्नाच्या २/३ एवढा पैसा नगरपरिषदांच्या शाळांवर खर्च करतील. या मागील कल्पना अशी होती की, स्थानिक कराच्या माध्यमातून जो निधी मिळतो तो ग्रामीण भागातील प्राथमिक शाळा सुरु करण्यासाठी देण्यात यावा.[५५] जनतेकडून कराच्या रुपाने मिळणारा निधीचा विनियोग ग्रामीण भागातील शिक्षणावर केला तर ग्रामीण भागात शिक्षण संस्था वाढतील व विद्यार्थ्यांचे शिक्षण घेण्याचे प्रमाणही वाढेल. कारण की ग्रामीण भागात निरक्षरता असल्यामुळे अंधश्रध्दा जास्त प्रमाणात दिसते. या अंधश्रध्देमुळे खानदेशात काही स्त्रिया सती गेल्याचे दिसून येते. म्हणून शाळा सुरु करणे आवश्यक वाटत होते.

इंग्रजी भाषेमुळे भारतीय समाजात आधुनिक विचार रुजू लागले होते. इंग्रजी भाषेतून शिक्षण घेतलेल्या तरुणांना आपल्या समाजातील भ्रष्ट आचारविचार व दुष्ट चालीरीती, अनिष्ट रुढीपरंपरा यांच्यातील ढोंगीपणा याची जाणीव होऊ लागली होती. आधुनिक शिक्षणाच्या प्रसारामुळे समाजसुधारणेच्या चळवळीचा पाया मजबूत होण्यास मदत झाली.[५६]

१८९९ मध्ये लॉर्ड कर्झनची भारताच्या गर्व्हनरपदी नियुक्ती झाली होती. त्यांने पूर्वीच्या धोरणानूसारच शैक्षणिक कार्य प्रांतिक सरकारकडे दिले होते. प्रांतिक सरकारांना खाजगी व शासकीय संस्थावर नियत्रंण ठेवण्याचे निर्देश दिले होते.[५७] त्याने शिक्षणाला उत्तेजन देण्याचा आपल्या परीने प्रयत्न केला होता. तसेच शिक्षणाची पुनर्रचना करुन शेती शिक्षणाला प्रारंभ केला होता. १८९९ मध्ये (एस.टी.सी.) सेकंडरी टिचर्स सर्टिफिकेट एक्झामिनेशन हा कोर्स सुरु केला होता. त्यामार्फत माध्यमिक शिक्षकांना प्रशिक्षण देण्यासाठी कार्यक्रम तयार केला होता. थोडक्यात लॉर्ड कर्झनच्या काळात शिक्षणाची प्रगती झालेली दिसून येते.

भारतात इंग्रजी शिक्षणाचा प्रसार झाला होता. त्यामुळे इंग्रजी शिक्षणाने देशाच्या विविध प्रांतातील भारतीय लोकांचा संपर्क वाढला होता व इंग्रजी भाषा ही संपर्क भाषा बनली होती. निरनिराळया प्रांतातील विविध भाषा बोलणाऱ्या लोकांना परस्परांशी इंग्रजी भाषेमुळे सहज संबंध साधता येऊ लागला होता. त्यातून राष्ट्रीय विचारांना चालना मिळाली होती. म्हणून भारतात एकोणिसाव्या शतकात राष्ट्रवादाचा उदय होण्यास इंग्रजी भाषा व इंग्रजी शिक्षण यांचा हातभार लागला होता.[५८] पाश्चात्य शिक्षणाचा प्रवेश भारतात झाला आणि इतर क्षेत्रांप्रमाणे शिक्षणातही आमूलाग्र बदल झाला होता. भारतात पाच हजार वर्षांपासून चालत आलेली शिक्षण पध्दती मोडीस निघाली आणि शिक्षणाचे संस्थात्मिकरण, सार्वत्रिकीकरण घडून आले. सुरुवातीला ही नवीन शिक्षण पध्दती पचनी पडण्यास त्रास झाला,[५९] परंतु नंतर तिने मात्र वेग घेतलेला दिसतो. आजही तीच आधुनिक शिक्षण पध्दती वापरली जात आहे हे विशेष आहे.

PRINCIPAL
TSS's Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College,
Sakri, Dist.Dhule PIN-424304

- संदर्भ साधने


| | | |
|---|---|---|
| १) | तळवलकर गोविंद | "संत्तातर १९४७", पृ.क्र. २० |
| २) | जोशी पं.महादेवशास्त्री | "भारतीय संस्कृतिकोश", खंड-९, पृ.क्र. २६८ |
| ३) | तळवलकर गोविंद | पूर्वोक्त पृ.क्र.२१ |
| ४) | सरदार गंगाधर बाळकृष्ण | "महाराष्ट्र-जीवन परंपरा प्रगती आणि समस्या", खंड दुसरा, पृ.क्र.२३ |
| ५) | तळवलकर गोविंद | पूर्वोक्त पृ.क्र. २२ |
| ६) | पाटील व्ही.बी. | "एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रामधील समाजसुधारणेचा इतिहास" पृ.क्र.८४ |
| ७) | Parulekar R.V. (Edited by) | A source book of history of education in the bombay province part I, P.N.ii |
| ८) | Parulekar R.V. | उपरोक्त पृ.क्र.११ |
| ९) | "ज्ञानोदय" | पुस्तक क्र.८, अंक १८, मुंबई, १५ सप्टेंबर १८४९ पृ.क्र.३३८ |
| १०) | पाटील व्ही.बी. | पूर्वोक्त पृ.क्र. ८८ |
| ११) | फडके यशवंत दिनकर | "विसाव्या शतकातील महाराष्ट्र १९०१-१९१४" खंड-१, पृ.क्रं.३२ |
| १२) | घोडके ह.म. | "महाराष्ट्रगाथा", पृ.क्र.४४ |
| १३) | आण्णासो गरुड/सावंत बी.बी. | "महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास", पृ.क्र.३३ |
| १४) | पाटील एम.व्ही | "कंपनी सरकारकालीन खानदेश", पृ.क्र.१९७ |
| १५) | पाटील एम.व्ही | उपरोक्त पृ.क्र.१९७ |
| १६) | जोशी पं.महादेवशास्त्री | पूर्वोक्त पृ.क्र.३७६ |
| १७) | वैद्य अरविंद | "जागतिक शिक्षणाचा सामाजिक इतिहास",पृ.क्र. ७२ |
| १८) | सरदार गंगाधर बाळकृष्ण | पूर्वोक्त पृ.क्र. २३ |
| १९) | पाटील व्ही.बी. | पूर्वोक्त पृ.क्र. ८७ |
| २०) | घोडके ह.म. | "महाराष्ट्रगाथा" भाग-२, पृ.क्र.२१३ |
| २१) | सरदार गंगाधर बाळकृष्ण | पूर्वोक्त पृ.क्र. २४ |
| २२) | कुलकर्णी अ.रा | "कंपनी सरकार" (ईस्ट इंडिया कंपनी) पृ.क्र.१७३-१७४ |
| २३) | ओक प्रमोद | "एलफिनस्टन", पृ.क्र.२०३ |
| २४) | "ज्ञानोदय" | पुस्तक क्र. ९, अंक २२, मुंबई, १५ नोव्हेंबर १८५० पृ.क्र.४०० |
| २५) | घोडके ह.म. | "महाराष्ट्रगाथा" भाग २- पूर्वोक्त पृ.क्र.२१५ |
| २६) | "ज्ञानोदय" | पूर्वोक्त पृ.क्र. ४०० |
| २७) | घोडके ह.म. | "महाराष्ट्रगाथा" भाग २- पूर्वोक्त पृ.क्र.२१५ |
| २८) | "ज्ञानोदय" | पूर्वोक्त पृ.क्र. ४०० |
| २९) | Khanolkar V.P. | Indigenous Elementary education in the Bombay Presidency in १८५५ thereabout Directory by Indian institute of education, P.N. XIV |
| ३०) | मोरे दिनेश | "आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास १८१८-१९६०" पृ.क्र.२८५ |
| ३१) | भारतीय इतिहास आणि संस्कृती - वर्ष १९, पुस्तक ७४, जूलै/सप्टेंबर १९८२, पृ.क्र.४८ | |
| ३२) | जी. डी. जळगाव | मुंबई १९९४, पृ.क्र.६५१ |
| ३३) | Khanolkar V. P. | पूर्वोक्त P.N. XVI |
| ३४) | Khanolkar V. P. | उपरोक्त P.N. XVI |
| ३५) | ओक प्रमोद | पूर्वोक्त पृ.क्र.१३६ |
| ३६) | Khanolkar V. P. | पूर्वोक्त P.N. XVII |
| ३७) | नरके हरी | "महात्मा फुले साहित्य आणि चळवळ", पृ.क्र.६९-७० |
| ३८) | जी. डी. जळगाव | पूर्वोक्त पृ.क्र. ६५२ |
| ३९) | Khanolkar V. P. | पूर्वोक्त P.N. XX |


PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

| | | |
|---|---|---|
| ४०) | पाटील व्ही.बी. | पूर्वोक्त पृ.क्र.८९ |
| ४१) | Kamat A.R. | Progress of education in rural Maharashtra, P.N.९ |
| ४२) | Khanolkar V. P. | पूर्वोक्त P.N. XVII |
| ४३) | सरदार गंगाधर बाळकृष्ण | पूर्वोक्त पृ.क्र. २७ |
| ४४) | पाटील लीला | पूर्वोक्त पृ.क्र.१२१ |
| ४५) | पाटील लीला | उपरोक्त पृ.क्र.१२१ |
| ४६) | नरके हरी | पूर्वोक्त पृ.क्र.१०३ |
| ४७) | सहस्त्रबुध्दे पुरुषोत्तम गणेश | "महाराष्ट्र संस्कृती", पृ.क्र. ७३२ |
| ४८) | वैद्य अरविंद | पूर्वोक्त पृ.क्र.७६ |
| ४९) | पाटील व्ही.बी. | पूर्वोक्त पृ.क्र.९० |
| ५०) | आण्णासो गरुड / सावंत बी. वी. | पूर्वोक्त पृ.क्र.३४ |
| ५१) | घोडके ह.म. | "महाराष्ट्रगाथा" भाग २- पूर्वोक्त पृ.क्र.२१८ |
| ५२) | जोशी पं.महादेवशास्त्री | पूर्वोक्त पृ.क्र. ३७६ |
| ५३) | Kamat A.R. | पूर्वोक्त पृ.क्र. १० |
| ५४) | सरदार गंगाधर बाळकृष्ण | पूर्वोक्त पृ.क्र. ५३ |
| ५५) | Kamat A.R. | पूर्वोक्त पृ.क्र. १० |
| ५६) | पाटील व्हि.बी. | पूर्वोक्त पृ.क्र. ९२ |
| ५७) | Kamat A.R. | पूर्वोक्त पृ.क्र. ११ |
| ५८) | पाटील व्हि.बी. | पूर्वोक्त पृ.क्र. ९२ |
| ५९) | घोडके ह.म. | "महाराष्ट्रगाथा" भाग २- पूर्वोक्त पृ.क्र.२२२ |

TSS's Smt.V.U.Patil Arts and Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Dist.Dhule

PRINCIPAL
TSS's Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College,
Sakri, Dist.Dhule PIN-424304

Volume 8 (Special Issue 04)
January, 2018

ISSN-2230-9578

# Journal of Research and Development

A Multidisciplinary International Level Refereed Journal

COSMOS
IMPACT FACTOR
4.270

## UGC Journal list No. 64768



## Editor : Dr. R. V. Bhole

PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule

'Ravichandram' Survey No-101/1, Plot No- 23, Mundada Nagar,
Jalgaon(M.S.) 425102
Email – info@jrdrb.com Visit – www.jrdrvb.com

# Journal of Research and Development

A Multidisciplinary International Level Refereed Journal

COSMOS IMPACT FACTOR 4.270

UGC Journal list No. 64768


## National Conference

On

***Recent Trends in Agriculture and Rural Development in India,***


**Volume 8**

**Special Issue-4 (Humanities), January 2017**

**ISSN-2230-9578**



**Special Issue Editor**

Dr. Ahire Suresh Chintaman , Dept. of Geography

**Editor**

Dr. R. V. Bhole

**Editorial Board**

**Prin. Dr. B. D. Borse,** Uttamrao Patil College, Dahiwel Tal. Sakri, Dist. Dhule
**Dr. S. R. Patil,** Arts and Science College Dondaicha, Tal. Chopada Dist. Jalgaon
**Prof. S. J. Bhadane,** Dept. of Chemistry, Uttamrao Patil Arts and Science College, Dahiwel.
**Prof. Dr. Suvarna T. Shinde,** S.N.D.T. College of Women, Dhule. 424002.
**Prof. I. U. Shaikh,** Dept. of English, Uttamrao Patil Arts and Science College, Dahiwel.
**Dr. R. D. Patil,** Vasantrao Naik Arts & Science College, Shahada
**Dr. Avinash Y. Badagujar,** Arts and Science College, Varangaon



'Ravichandram' Survey No-101/1, Plot No-23, Mundada Nagar, Jalgaon (M. S.) 425102

Email-info@jrdrvb.com Visit-www.jrdrvb.com



TSS's Smt.V.U.Patil Arts and Late Dr.B.S. Desale Science College ★ Sakri, Dist.Dhule

PRINCIPAL
TSS's Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College,
Sakri, Dist. Dhule PIN-424304

Journal of Research & Development
Vol. 08 (Special Issue 04) January 2018, (ISSN-2230-9578)
UGC Journal List No. 64768, COSMOS IMPACT FACTOR- 4.270

# खानदेशातील प्राचिन, मध्ययुगीन व आधुनिक काळातील कृषी विकासाचा तुलनात्मक अभ्यास

**डॉ.पी.एस.सोनवणे, प्राचार्य,** श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व ,कै.डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालय, साक्री

दक्षिण भारताच्या इतिहासात खानदेश सुभ्याला नेहमीच महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. दक्षिणेकडे जे सहा सुभे होते त्या पैकी खानेदशाचा सुभा हा एक होता. हा सुभा अत्यंत समृद्ध सुभा म्हणुन मानला जात असे एवढेच नव्हे तर दक्षिण भारताच्या राजकारणात त्याला अत्यंत महत्व प्राप्त झाले होते.

ऐतिहासिक व सांस्कृतिक दृष्ट्या जोडणाऱ्या वैशिष्ट्यपुर्ण भुभागाने भारताचे उत्तर भारत व दक्षिण भारत असे दोन भाग पडतात हा वैशिष्ट्यपुर्ण भुभाग म्हणुन खानदेश ओळखला जातो म्हणुनच या भुभागाला प्राचिन काळापासुनच महत्व प्राप्त झाले आहे. उत्तर भारत व दक्षिण भारत अशा या दोन्ही विशाल भुभागांना जोडणारे प्राचिन महामार्ग खानदेशाच्या भुमीतुनच जात होते थेट रामायण, महाभारत, काळापासुन या खानदेशाचा उल्लेख आढळतो.

या प्रदेशाला खानदेश हे नाव कसे पडले किंवा खानदेश या शब्दाची उत्पत्ती कशी झाली या विषयी संशोधकांमध्ये एकमत आढळत नाही. वेगवेगळ्या संशोधकांनी वेगवेगळी मते मांडलेली दिसुन येतात. मात्र वर्तमानातील जळगाव, धुळे, नंदुरबार या जिल्ह्यांच्या भौगोलिक प्रदेशाला खानदेश असे म्हटले जाते.

- **प्राचिन खानदेश :-**

अतिशय प्राचिन काळातील अवशेष खानदेशात आपणास आजही पहावयास मिळतात, खानदेशाला ताम्रपावणकालीन संस्कृतिची व्यापक बैठक लाभली आहे. मोहेंजोदाडो आणि हडप्पातील सिंधु विस्थापितांनी खानेदशाच्या भिन्न प्रदेशात २३ ठिकाणी वसाहती निर्माण करण्याचा प्रयत्न केला.[१]

प्राचिन काळातील खानदेशाचा इतिहासचा प्रारंभ अशिरगड व तोरणमाळ या डोंगरी किल्ल्यांच्या संदर्भापासुन सुरु होतो. महाभारमाध्ये युवानश्व हा तोरणमाळचा प्रमुख राजा होता. या राजाने पांडवांशी संघर्ष केला होता. याच काळात अशिरगडावर अस्वत्थाम्याची पुजा आर्चा होत होती. आजही हिंदु लोक अश्वत्थामाची पुजा करतात.

टॉलेमी या ग्रीक भुगोल शास्त्रज्ञाने तोरणमाळचा उल्लेख त्यांच्या ग्रंथात 'पिआतुरा' असा केला आहे. खानदेशाला महाभारत काळामध्ये 'खांडवणभुमी' असे म्हटले जात असे. तसेच खानदेशाला पुर्वी सेऊणदेश या नावानेही ओळखले जात असे. यादव घराण्याचा राजा सेऊनचंद्र याने खानदेशावर राज्य केले. त्याच्या नावाने या प्रदेशाची सर्वत्र ख्याती होती.[२]

- **मध्ययुगीन खानदेश :-**

साधारणपणे १३ व्या शतकाच्या उत्तरार्धापासुन खानदेशाच्या मध्ययुगीन इतिहासाचा प्रारंभ झाल्याचे मानले जाते अल्लाउद्दीन खिलजीने सन १२९४ मध्ये देवगीरीच्या रामदेव यादवांचा पाराभव केला तेव्हा खानदेश यादवांच्या ताब्यात होता. सन १३१८ मध्ये देवगीरीचा राजा शंकरदेवाचा खिलजीकडुन पराभव झाला व तेथुन मुसलमान राजवटीचे युग खानदेशात सुरु झाले असे म्हटले जाते.[३]

पुढे खानदेशात फारुकी घराण्याची राजवट सुरु झाली मलीक फारुखीने दिल्लीची सत्ता जुगारुन त्याने खानेदश या स्वतंत्र राज्याची स्थापना केली व थाळनेर येथे खानेदशाची राजधानी स्थापन केली.[४] सन १६०१ मध्ये अकबराने अशिरगडावर स्वारी करुन खानदेश सुभा जिंकुन घेतला व त्याने आपल्या साम्राज्यात विलीन केला. अकबराने खानदेश जिंकल्याप्रित्यर्थ आपला मुलगा दानिएल यास खानदेशाचा सुभेदार म्हणुन नेमले व आपल्या पुत्राच्या कामगिरीच्या सन्मानार्थ अकबराने खानदेशाचे दानदेश असे नविन नाव दिले. मात्र हे नाव फार काळ टिकले नाही व पुन्हा खानदेश असे नाव पुढे आले.[५]

- **आधुनिक काळ :-**

खानदेशाचे दोन भाग होते पुर्व खानदेश व पश्चिम खानदेश धुळे हे पश्चिम खानदेशचे प्रमुख केंद्र होते. जुलै १९९८ मध्ये धुळे जिल्ह्याचे विभाजन होऊन नंदुरबार जिल्ह्याची निर्मीती झाली. आज खानदेश मध्ये जळगाव, धुळे व नंदुरबार या तीन जिल्ह्यांचा समावेश होतो. या तीन्ही जिल्ह्यांमध्ये कृषी हा प्रमुख व्यवसाय आहे. प्राचिन, मध्ययुगीन, आधुनिक काळात कृषी संदर्भात विविध उपाययोजना केलेल्या दिसुन येतात.

PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

Journal of Research & Development
Vol. 08 (Special Issue 04) January 2018, (ISSN-2230-9578)
UGC Journal List No. 64768, COSMOS IMPACT FACTOR- 4.270

- **प्राचिन काळातील कृषी विकासासाठी केलेल्या उपाययोजना :-**

सिंधु संस्कृतिपासुन शेती व्यवसाय केला जातो. सिंधु संस्कृतितील परिस्थिती शेतीला अनुकुल होती. त्यामुळे सिंधु संस्कृती शेतीवरच पोसली गेली. कृषी व्यवसाय हा त्यांच्या अनेक व्यवसायांपैकी एक महत्वाचा व्यवसाय होता. सिंधु नदीच्या गाळामुळे सुपिक झालेली जमीन मुबलक प्रमाणात होती. सिंधु संस्कृतितील लोकांची उपजिवीकेचे साधन म्हणुजे शेती होय. ऋग्वेद काळात आर्य जेव्हा भारतात आले तेव्हा त्यांचा प्रमुख व्यवसाय पशुपालन हा होता. पशुपालनाच्या खालोखाल शेती आर्यांचा महत्वाचा व्यवसाय होता. प्रत्येकाच्या मालकीची वेगळी शेती होती. शेत जमीन नांगरणेसाठी लाकडी नांगरांचा वापर करीत असुन शेतीला पाणीपुरवठा विहीरी व कालव्याद्वारे केला जात असे. ऋग्वेद काळाप्रमाणेच उत्तर वैदीक काळातही शेती हा प्रमुख व्यवसाय होता. वैदीक काळापेक्षा या काळात अधिक लोकसंख्या वाढल्याने शेती करण्याच्या पद्धतीत सुधारणा झाली. पुर्वीचे बोजड नांगर जाऊन आता सुटसुटीत व हलक्या नांगरांचा उपयोग करण्यात येवु लागला. शेतीचे उत्पन्न वाढावे म्हणुन जणावरांच्या खत्तांचा वापर करु लागले. म्हणुन उत्पन्न वाढले. व आर्थिक परिस्थिती सुधारली.

मौर्योत्तर काळात भारतातील संपन्नतेचे प्रमुख कारण शेती हे होते. खेड्यातील लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती हा होता. राज्यातील बहुसंख्य लोक शेती करीत असल्यामुळे राजाला जमीन महसुलाची उत्पन्न सर्वात जास्त मिळ असे. त्यामुळे महसुलाच्या दृष्टीकोनातुन का होई ना, राजे लोकांचे लक्ष सतत शेती कडे असे. उत्तम बी बीयानांचा पुरवठा करणे, शेतीला विहीरी, कालवे, पाटबंधारे, तळी यांच्यामार्फत पाणी उपलब्ध करुन देने. याकडे सरकारचे लक्ष असे. शेतीतुन निघणाऱ्या मालास बाजारपेठेत भाव चांगला असल्याने शेतकरी सुखी होतात. त्यामुळे शेतकऱ्यांचेही शेतीकडे लक्ष असे.

अशा प्रकारे प्राचिन काळात सिंधु संस्कृतीपासुन ते गुप्त काळापर्यंत शेती व्यवसायाकडे सतत लक्ष दिल्या गेल्यामुळे आर्थिक परिस्थिती सुधारली दिसुन येते. या काळात एकही आत्महत्या सारखा प्रकार झालेला दिसुन येत नाही.

- **मध्ययुगीन काळातील कृषी विकासासाठी केलेल्या उपाययोजना :-**

आठराव्या व एकोणाविसाव्या शतकात आर्थिक जिवन हे मौजे भोवती केंद्रीत झाले होते. तेथील प्रमुख व्यवसाय कृषी हा होता. पेशवे काळात खानदेश मधील आर्थिक जिवन हे प्रामुख्याने कृषीप्रदान होते. कृषी व्यवसायाला रयतेच्या जिवनात इतके महत्वाचे स्थान होते की, शेतीचा उल्लेख 'काळी आई' म्हणुन करतांना दिसला.

खानदेशातील शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती मराठा सरकारच्या कारकीर्दीत कशी होती. याचा आपण जेव्हा विचार करतो. तेव्हा आपणांस पावसाचा लहरीपणा, सुरक्षितेचा अभाव, कर्ज मिळण्याबाबत येणाऱ्या अडचणी कर्जावरील व्याज, शेतीवरील महसुल कर, पिकांवरील रोग व इतर अशा अनेक अडचणी होत्या. की ज्यामुळे शेतकऱ्यांची अवस्था फारशी चांगली नव्हती परंतु त्यातल्या त्यात इ.स.१७९८ पर्यंत खानदेशमधील शेती व्यवसाय हा ठिक होता.[५] पेशवे अहिल्याबाई होळकर, नाना फडणीस आणि महादशी शिंदे यांच्या कर्तुत्वामुळे खानदेश मधील कृषी व्यवसायाला उर्जितअवस्था प्राप्त झाली होती. परंतु बाजीराव दुसरा यांच्या काळापासुन कृषी व्यवसायाला ग्रहण लागले होते. हे ग्रहण ग्र राज्य संपुष्टात येईपर्यंत तसेच होते. कृषी व्यवसाय हा कौटुंबीक व्यवसाय मानला जात असे. कुटुंबातील सर्व व्यक्ती शेतात काम करुन अधिकाधिक उत्पन्न मिळविण्याचा प्रयत्न करीत असत. शेती करत असतांना मजुरांचा तुटवडा भासत असत. दुसरी अडचणी जनावरांची होती. कारण परकीय आक्रमणामुळे जनावरांची लुट केली जात असे. त्यामुळे शेतकऱ्यांचे कृषीजीवन उद्धस्त होत असे.[७] अशा वेळी पेशवे आपल्या अधिकाऱ्यांना आज्ञा देवुन शेतीची जी साधने नष्ट झाली असतील. ती शेतकऱ्यांना विकत घेता यावीत म्हणुन कमी व्याजाने किंवा व्याजाशिवाय कर्ज देण्याचे आदेश दिले होते.[८]

शेतीला उत्कृष्ठ बी-बियाणांची आजच्या प्रमाणेच त्या काळातही गरज होती. शेतीसाठी भांडवलाची गरज असते. तेव्हा सावकारांकडुन व्याजाने पैसे घेवुन शेती करत असत. शेतीतुन आलेले सर्व उत्पन्न त्याची कर्ज फेडण्यातच संपुन जात असत. तसेच शेतक-यांपुढील आणखी एक अडचण म्हणजे लहरी पाऊस. शेतकऱ्यांना शेतीसाठी पावसावर अवलंबुन रहावे लागत असे. पाऊस हा लहरी प्रमाणे असल्यामुळे शेतक-यांना सर्व संकटांना तोंड द्यावे लागत असे.[९]

जेव्हा युद्ध होत असे तेव्हा शेतकऱ्यांची पिके नष्ट होत होती व शेतीचे नुकसान होत असत. युद्धाच्या वेळी आपल्या राज्यातील पिके नष्ठ होऊ नयेत आणि त्याची झळ शेतक-यांना लागु नये म्हणुन पेशवे काळजी घेत असत. वरील सर्व अडचणींना सामोरे जाण्यासाठी सरकारने बऱ्यापैकी उपाययोजना केल्याचे दिसुन येते.

दुष्काळ ही नैसर्गिक आपत्ती होती आणि जास्त व कमी पाऊस झाला तर शेतकऱ्याचे आर्थिक जीवन विस्कळीत होणार याची मराठा सरकारला चांगली जाणीव होती. म्हणुनच रयतेचे हाल होऊ नयेत, रयतेला त्रास होऊ नये, रयतेने



PRINCIPAL
TSS's Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College,
Sakri, Dist.Dhule PIN-424304

आपल्या प्रदेशातुन शक्यतोवर दुसऱ्या प्रदेशात स्थलांतर करु नये यासाठी मराठा सरकार दक्ष असे. दुष्काळ पडला म्हणजे पहिला प्रश्न उपजिवीकेचा असतो म्हणुन सरकार प्रथम अधिकाऱ्यांना त्यांच्याजवळ मागील वर्षी शिल्लक असलेल्या पुरवठा मधुन रयतेला धान्य देण्याची आज्ञा करीत असत.[१०] आज मात्र आपणांस दुष्काळामुळे मोठ्या प्रमाणात स्थलांतर झ झालेले दिसुन येते.

ब्रिटीशांच्या काळात काही उपाययोजना केलेल्या दिसुन येतात. खानदेशात वेळोवेळी दुष्काळासारख्या उद्भवणाऱ्या भयानक अशा आपत्तीस तोंड देण्यसाठी कायम स्वरुपी उपाययोजना आखलेल्या दिसुन येतात. त्यानुसार विहीरी खोदण्यास उत्तेजन देणे, तलाव बांधणे, पांझरा व गिरणा या सारख्या नद्यांवर बंधारे व धरणे बांधणे कालवे खोदणे, त्यासाठी स्वतंत्र पाटबंधारे खात्याची निर्मिती करणे, दुष्काळ संहिता तयार करणे, दुष्काळ आयोग नेमणे, शेतकऱ्यांची कर्जातुन सुटका करण्याचे प्रयत्न करणे, सातीच्या रोगांवर नियंत्रण ठेवण्यासाठी कायदे करणे, इत्यादीसारख्या दुष्काळावर मात करणाऱ्या कायमस्वरुपी उपाययोजनांचा अवलंब केल्याचे अप्रकाशीत ऐतिहासिक कागदपत्रातुन पहावयास मिळतात.

कंपनी सरकारच्या काळात खानदेशातील पाटबंधारे, पाट व पाटचारांच्या निर्मितीस व दुरुस्तीस उत्तेजन दिल्यामुळे इ.स. १८३०-३१ पर्यंत खानदेशातील शेतीच्या लागडवीखाली क्षेत्रात व बागायती क्षेत्रात वाढ झालेली दिसुन येते. डनलॉपच्या मतानुसार या काळात खानदेशातील लोक इतर भागातील लोकांपेक्षा सुखी होते.[११] मात्र इ.स.१८४५-४६ मध्ये अनियमित पावसामुळे खानदेशात दुष्काळी स्थिती निर्माण झाली होती. तेव्हा ब्रिटीश सरकारचने खानदेशात बंधारे व कालवे काढुन शेत जमीनीच्या जलसिंचनात वाढ करण्यासाठी प्रयत्न केल्याचे दिसुन येते.

ब्रिटीश सरकारने शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणा कमी व्हावा व सावकार वर्गाकडुन होणारी पिळवणुक थांबावी यासाठी सन १८८२ मध्ये 'शेती सुधार कायदा' व सन १८८४ मध्ये 'शेतकरी कर्ज कायदा' पारित केला होता. शेती सुधारणा कायदानुसार खानदेश मधील शेतकऱ्यांना शेतीच्या मशागतेसाठी, विहीरी व तळी बांधण्यासाठी शेतीला पाणीपुरवठाच्या सोयीसाठी तसेच पुरांच्या व महापुरांच्या काळात तगाई कर्जाची वाटप केले जात असे.[१२]

अशा प्रकारे ब्रिटीश सरकारने दुष्काळावर कायम स्वरुपी मात करण्यासाठी उपाययोजना म्हणुन सावकारीवर नियंत्रण प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला आहे. शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणा दुर करण्यासाठी कायदे केले. सावकारांवर नियंत्रण आणण्याचा व शेतकऱ्यांना कमी व्याज दराने कर्ज उपलब्ध करुन देण्याचे प्रयत्न केले. त्यामुळे शेतकऱ्यांचे सावकार वर्गाकडुन होणाऱ्या आर्थिक शोषणास काही अंश पायबंद बसला व दुष्काळी स्थितीवर मात करण्यासाठी मदत झाली.

- **आधुनिक काळातील कृषी विकासासाठी केलेल्या उपाययोजना :-**

भारताच्या महासत्ता म्हणुन जागतीक पातळीवर उदय केवळ ग्रामिण दारिद्र्य आणि ग्रामविकासावर प्रभावीपणे तोडगा काढल्यानंतरच होऊ शकतो. म्हणुनच सरकारने ग्रामिण भागातील जीवनमान सुधारण्याला प्राधाण्य दिलेले दिसुन येते. समावेशी ग्रामिण विकासाच्या माध्यमातुन शाश्वत मनुष्यविकास शक्य आहे. ग्रामिण दारिद्र्याचे अनेक पैलु आहेत व दारिद्र्य नष्ट करावयाचे असेल तर कृषीय विकासावर भर देणे आवश्यक आहे. त्यासाठी सरकार नवनवीन योजना राबवितांना दिसते.[१३]

स्वातंत्र्योत्तर अगदी पहिल्या शरकारच्या काळापासुन अस्थित्वात आलेल्या कृषी मंत्रालयाने देशातील कृषी क्षेत्राच्या विकासात मोलाची कामगीरी बजावली आहे. कृषी उत्पादनाची वाढ, त्या संबंधीचे संशोधन व विकास कार्य तसेच देशाच्या अन्नधान्याच्या गरजांची योग्य आपुर्ती करण्याच्या दृष्टीने कृषी मंत्रालयाने वेळोवेळी योग्य धोरणात्मक निर्णय घेवुन त्यांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केलेला दिसुन येतो.[१४]

भारतात हवामानानुसार शेतीच्या प्रकारात प्रचंड विविधता आढळते. तसेच देशातील विविध राज्यात कृषी संबधी धोरणातही एक संघता आढळत नाही. परिणामी पिक उत्पादनाचा दर, शेतीशी संबधीत पायाभुत सोयी सुविधा व संस्थात्मक संरचना इ.मध्येही तफावत दिसुन येते. भारतातीतल विविध राज्यात लहान मोठ्या प्रमाणात शेती केली जाते. या प्रकारच्या शेतीवरील खर्च जास्त असुन त्यामानाने त्यातुन मिळणारे उत्पन्न व उत्पादन हे दोनही फार कमी असते. अशा प्रकारच्या शेतीमुळे अर्थव्यवस्थेला बळकटी न मिळता उलट एकुणच अर्थव्यवस्थेवर प्रचंड ताण पडतो.

एकीकडे कृषी क्षेत्रात हरीत क्रातीसारख्या क्रांतीकारी संशोधनेवर प्रचंड उलाढाल होण्यास सुरुवात झाली. दुसरीकडे प्राथमिक स्तरावरील शेतकरी वर्गाची परिस्थिती मात्र हलाकीचीच आहे. कारण शेतकऱ्यांना त्यांच्या शेतातुन

PRINCIPAL
I.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

मिळणारे उत्पन्न, त्यांना लागणाऱ्या खर्चाच्या पुढे अगदीच तुटपुंज आहे. तसेच देशाच्या अर्थव्यवस्थेतील अनिश्चिते फटकाही शेतकऱ्यांना सोसावा लागतो.

स्वातंत्र्योत्तर काळात शासनाच्या रोख प्रामुख्याने शेती उत्पादनात वाढ होण्यावर होता. शेतकऱ्यांची हालाकी परिस्थिती व त्यांना शेतीतुन मिळणारे तुटपुंजी उत्पन्न या सर्व बाबी पुर्वी दुर्लक्षीत झाल्या. मात्र गेल्या काही वर्षात शेतकऱ्यांच आत्महत्येच्या संख्येतुन झालेली वाढ या विषयी शेतकऱ्यांच्या जीवन मानासंदर्भात अनेक अहवाल प्रसिद्ध झाले. उपाययोजनाही करण्यात आल्या. परंतु आत्महत्येचे प्रमाणा काही कमी झालेले दिसुन येत नाही. जर सरकारद्वारे शेतकऱ्यां हमीभाव दिला तर शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होईल व त्यांचे आणि देशाचे अर्थव्यवस्था सुधारण्यास मदत होईल. शे उत्पादनाची खरेदी केली गेल्यास बाजार नियंत्रणा, मागणी व पिकांचा भाव या तिन्ही बाबतीत शेतकऱ्यांना लाभ मिळु शकर शेतमालाच्या जास्तीच्या पुरवठ्यालाही अत्यंत कमी बाजारमुल्य मिळत असल्यामुळे जागतील बाजारातील स्पर्धात्म परिस्थिती या घटकांमुळेही शेतकऱ्यांना परिणामांना सामोरे जावे लागतील.[१५] गेली अनेक वर्ष देशाच्या कृषी व्यवस्थेच विकासासातील प्रमुख घटक जसे चांगल्या दर्जाचे बी-बियाणे, खते व किटक नाशके, खरेदीसाठी सरकारद्वारा सवलत क दरात इंधन व उर्जेची उपलब्धता, सिंचनासाठी सवलतीत कर्ज योजना व सरकारद्वारा कमी भावात मोठ्या प्रमाणाती अन्नधान्याची खरेदी इत्यादीमुळे शेती उत्पादन प्रक्रियेला मदत मिळु शकेल.

प्राचिन, मध्ययुगीन व आधुनिक काळात कृषी व्यवसाय बाबतीत जर विचार केला तर आधुनिक काळात तं ानात विकास होऊनही शेतकरी हा कर्जबाजारी झालेला दिसुन येतो. शासनाने विविध योजनांद्वारे शेतकऱ्यांना मदत करण्या प्रयत्न केला असला तरी त्यांची राबण्याची पद्धत सदोषपुर्ण अशी असल्यामुळे आत्महत्यासारख्या प्रकाराला कायमस्वरु शासन आळा घालु शकले नाही.

- **संदर्भ :-**

१) सुनिल चं. अमृतकर- खानदेशातील वृत्तपत्रांचा इतिहास आणि वृत्तपत्राच्या माध्यमातुन झालेले प्रबोधन पृ. क्र. १
२) टी.टी.महाजन- खानदेशचा राजकीय व सांस्कृतिक इतिहास, पृ.क्र. १२.
३) डी.एम.तोरगल- गॅझेटर ऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी, वॅलु. ३, खानदेश जिल्हा पृक्र. २४२
४) गो.स.सरदेसाई- हिंदुस्तानचा आर्वाचन इतिहास, पृ.क्र. ३०५
५) डॉ.एस.ज.पाटील- ब्रिटीशकालीन खानदेश आणि दुष्काळ, पृ.क्र. ३१
६) डे.क.का.भा १७४ पत्र क्र. ३३६, एलफींस्टन रिपोर्ट पृ.क्र. ३
७) उपरोक्त
८) खरे वा.वा.- नाना फडणविसाचे चरित्र, पृ.क्र. २४१
९) डॉ.जी.बी.शाह- मध्ययुगीन खानदेशृ पृ.क्र. १०३
१०) वाड पे.डा. भा. ६ पृ क्र. २५१
११) कि.का.चौधरी- महाराष्ट्राचे गॅझेटर जळगाव जिल्हा पृ.क्र. ४९८
१२) बी.जी.कुंठे- गॅझेटर ऑफ इंडीया पृ.क्र. ८
१३) अमरजीत सिन्हा -उपजिविकेच्या साधनांद्वारे जीवनमानात सुधारणा पृ.क्र. ३८
१४) निलबत्ता घोष- शेतकऱ्यांचा सर्वांगीन विकास, वास्तव, उद्दीष्टे- विश्लेषण पृ.क्र. ४२
१५) उपरोक्त पृ.क्र. ४४
१६) उपरोक्त पृ.क्र. ४६

TSS's Smt. V.U.Patil Arts and Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Dist.Dhule

PRINCIPAL
TSS's Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College,
Sakri, Dist.Dhule PIN-424304

Volume 8 (Special Issue 06) Feb. 2018 ISSN-No. 2230-9578

# Journal of Research and Development

A Multidisciplinary International Level Referred Journal

COSMOS IMPACT FACTOR 4.270

UGC Approved Journal

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

UGC

No. 64768



Editor - Dr. R. V. Bhole

PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Dist.Dhule

# Journal of Research and Development

**Volume 8 Issue 6 Feb. 2018 ISSN-No. 2230-9578**

**Editor:**
**Dr. R. V. Bhole**

**Special Issue Editor:**
**Dr. W. B. Shrisath**
PES's, Karm. A. M. Patil Arts,
Comm. & Kai. Annasaheb N. K. Patil
Science Sr. College Pimpalner,
Tal. Sakri, Dist. Dhule (MS)

| Sr. No. | Editorial Board | Sr. No. | Special Issue Editorial Board |
|---|---|---|---|
| 1 | **Prof. Andrew Cherepanov** Detroit,Michigan USA | 1 | **Prof. Dr. B. C. More** Pimpalner (MS) |
| 2 | **Prof. Nguyen Kim Anh** Hanoi- Vietnam | 2 | **Dr. S. S. Patole** Sakri (MS) |
| 3 | **Prof. Dr. R. K. Narkhede** Nanded (MS) | 3 | **Dr. R. K. Petare** Pimpalner (MS) |
| 4 | **Principal Dr. J. B. Anjane** Ainpur (MS) | 4 | **Prof. Dr. A. B. Sawant** Malegaon (MS) |
| 5 | **Prof. B. P. Mishra** Aizawal- Mizoram | 5 | **Dr. S. C. Ahire** Dahiwel (MS) |
| 6 | **Principal Dr. L. N. Verma** Raipur (CG) | 6 | **Prof. K. D. Kadam** Pimpalner (MS) |
| 7 | **Prof. R. J. Verma** Bhavnagar (Gujrat) | 7 | **Prof. S. K. Kakad** Pimpalner (MS) |
| 8 | **Dr. C. V. Rajeshwari** Pottikonda (A.P.) | 8 | **Prof. S. P. Khodake** Pimpalner (MS) |
| 9 | **Dr. S. B. Gaikwad** Miraj (MS) | 9 | **Dr. S. V. Ahire** Pune (MS) |
| 10 | **Dr. D. D. Sharma** Shimla (H.P.) | | |
| 11 | **Dr. Venu Triwedi** Indore (M.P.) | | |
| 12 | **Dr. Chitra Ramanan** Navi Mumbai (MS) | | |
| 13 | **Dr. Kaveri Dabholkar** Bilaspur (CG) | | |
| 14 | **Dr. Subhash P. Jadhav** Washim (MS) | | |

TSS's Smt.V.U.Patil Arts and Late Dr.B.S.Desale Science College Sakri, Dist.Dhule

PRINCIPAL
TSS's Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College,
Sakri, Dist.Dhule PIN-424304

JRD Vol. 08(Special Issue 06) Feb.2018, (ISSN-2230-9578) UGC Jr. List No. 64768, COSMOS I.F. 4.270

# खानदेशातील आदीवासींची कला व संस्कृति

पी.एस.सोनवणे

श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै.डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालय

**प्रस्तावना :** आदिवासी समाज म्हणजे 'अतिप्राचीन समाज' किंवा 'अतिशय अप्रगत व गौण समाज' असे समीकरण करणे चुकीचे आहे. मानवशास्त्रज्ञांनी वैज्ञानिक पध्दतीने आदिवासी समाजाच्या व्याख्या करुन आदिम समाज विषयीचे चुकीचे ग्रह तर दूर केलेत पण त्याचबरोबर आदिवासी कोणाला म्हणावे याही प्रश्नांचे उत्तर दिले आहे. यासाठी विविध मानवशास्त्रज्ञांनी व अभ्यासकांनी आदिम समाजाच्या विविध व्याख्या केलेल्या आहेत.

१. **गिलीन :-** गिलीन यांच्या मते, "एका विशिष्ट भूप्रदेशात राहणारा, समान बोलीभाषा व समान सांस्कृतिक जिवन जगणारा पण अक्षर ओळख नसलेल्या स्थानिक गटांच्या समुच्चयाला 'आदिवासी समाज' असे म्हणतात."

२. **डब्ल्यू. जे. पेरी :-** यांनी आदिवासी समाजाचे कमीत कमी वैशिष्टये सांगितलेली आहेत. ते म्हणतात, "समान बोलीभाषा बोलणाऱ्या व एकाच समान भू-प्रदेशावर वास्तव्य करणाऱ्या समुहाला 'आदिम समाज' असे म्हणतात."

३. **डॉ. रिव्हर्स :-** यांच्या मते, "ज्या समुहातील सदस्य एक समान बोलीभाषा बोलतात, युध्द वैगरे सारख्या उदिष्टापुर्तीकरीता एक होऊन झ टतात अशा सरळ व साध्या सामाजिक समुहाला 'आदिवासी समाज' असे म्हणतात."

४. **मदन व मुजूमदार :-** यांच्या मते, "समान भाषा व समान संस्कृति असणाऱ्या व आर्थिकदृष्टीने परस्पर संबंधीत असणाऱ्या ग्रामीण समुदायाच्या समुच्चयाचा उल्लेख 'आदिवासी समाज' म्हणून केला जातो."

५. **इम्पीरियल गॅझेट :-** इम्पीरियल गॅझेटमध्ये आदिवासींची व्याख्या पुढील प्रमाणे केली आहे, "समान बोलीभाषा बोलणाऱ्या, एकाच भू-भागात राहणाऱ्या सुरुवातीला अंतर्विवाही असण्याची शक्यता असलेला पण सर्वसामान्यपणे अंतर्विवाह नसलेल्या व समान नाव धारण करणाऱ्या समुच्चयाला 'आदिवासी समाज' असे म्हणतात."[१]

महाराष्ट्रात आदिवासी लोक ज्या भागात राहतात त्या भागांचे भौगोलिकदृष्टया तीन भाग केले जातात.

१. **सह्याद्री विभाग :-** या विभागात महादेवकोळी, वारली, कोकणा, ठाकर, कातकरी, मल्हारकोळी, या जमातींची वस्ती आढळते. महाराष्ट्रातील एकूण आदिवासी लोकसंख्येत हे प्रमाण ३८% आहे.

२. **सातपुडा विभाग :-** या विभागात सातपुडा पर्वताच्या रांगांमध्ये भिल्ल, कोकणा, कोकणी, गावीत, दुबळा, कोरकू, धानका, तडवी व पावरा या जमाती राहतात. या विभागात धुळे, नंदुरबार, जळगाव, औरंगाबाद व अमरावती या जिल्हयांचा समावेश होतो. १९७१ च्या या विभागातील आदिवासींची लोकसंख्या अंदाजे १० लाख म्हणजे एकूण लोकसंख्येच्या ३३% होती.

३. **गोंडवन विभाग :-** या विभागात विदर्भातील डोंगराळ आणि जंगलमय प्रदेशाचा समावेश होतो. चंद्रपुर, भंडारा, गडचिरोली, यवतमाळ व नागपुर या जिल्हयांचा समावेश होतो. या जिल्हयात गोंड, माडिया-गोंड, वारली, कोकणा, कातकरी, ठाकर, गावीत, मल्हारकोळी, कोलाम, कोरकू या आदिवासी जमाती या भागात आढळून येतात. हया प्रमुख अनुसूचित जमातींची लोकसंख्या महाराष्ट्रातील एकूण आदिवासी लोकसंख्येच्या ८०% आहे.[२]

१) **खानदेशातील कोकणी जमात :-** 'कोकणी,' 'कुकणी' ही कोकणा जमातीची समानार्थक नावे आहेत. कोकणा जमात ही राज्यातील स्थायिक जमात असून दिसण्यात हे लोक ठाणे जिल्हयातील 'वारली' जमातीच्या लोकांसारखे दिसतात. 'कोकणा' ही महाराष्ट्र राज्यातील एक प्रमुख जमात असून १९८१ च्या जनगणनेनूसार लोकसंख्या ३,५२,९३२ इतकी होती. ही जमात प्रामुख्याने ठाणे (४१४७६),



T.S.S's. Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S. Desale Science College Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule

PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule

नाशिक (२२१९४०), नंदुरबार, धुळे (८६५१४), जिल्हयात पसरलेली आहे.[३] 'कोकणा' हा शब्द कोकण (पश्चिमेकडील समुद्र किनारपट्टी) या शब्दापासून आला आहे असे सांगीतले जाते. हे क्षेत्र कोकणा जमातीचे मुळ वस्तीस्थान असून ते समुद्रकिनारा आणि सह्याद्री पर्वत यामधील पट्यात वसलेले आहे. एन्थोवेन यांच्या मते, प्रसिध्द दुर्गादेवीच्या दुष्काळात कोकणा जमातीचे लोक देशोधडीला लागले. व १३९६ ते १४०८ या काळात ते उत्तरेकडे सरकरले. जव्हार संस्थानच्या राजवटीत गंभीरगडच्या रखवालीचे काम या जमातीच्या लोकांकडे होते.[४]

अ) **पोशाख आणि दागिने** :- कोकणी लोक मध्यम उंचीचे व काळ्या सावळ्या रंगाचे आहेत. यांची ज्या भागात वस्ती आहे तेथील बहुसंख्येने असलेल्या समाजाच्या सामाजिक आणि सांस्कृतिक चालीरितीचे संस्कार या जमातीवर झालेले दिसतो. पुरुष आखूड नेसणीचे धोतर, बंडी व फेटा परिधान करतात. तर स्त्रिया नऊवारी लुगडे नेसतात. अंगात चोळी व डोक्यावर फडकी घेतात. नेसूचे लुगडे व डोक्यावरील फडकी यातील रंगसंगतीबद्दल कोकणा स्त्रिया चोखदळ असतात. आता पुर्वीसारखे कमरेभोवती घट्ट लुगडे नेसण्याऐवजी सैलसर लुगडे व ड़ोक्यावरुन पदर घेणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण वाढलेले दिसते. कोकणा स्त्रियांच्या अंगावर पितळ-रुपा बरोबर सोन्या-चांदीचे दागिने दिसतात. दागिण्यांमध्ये प्रामुख्याने नथ, पावलीहार, साखळया, पागखे (कानात), गाठी, हार, वजरटिक, येळा, बांगडया, डोरले, फुले, झुलकी व अनेक प्रकारच्या मण्यांच्या माळांचा समावेश झालेला दिसतो. जुन्या पध्दतीची बाळलेणी, सटवाई, मनगटया हया कोकणी जमातीत पाहावयास मिळतात. पुरुषांमध्ये मात्र दागिण्याबद्दल फारशी आवड दिसत नाही. त्यांना फक्त लाल रंगाच्या फेटयाची आवड दिसून येते.[५]

ब) **वेशभुषा** :- मानवाची वेशभुषा राहत असलेल्या पर्यावरणानुसार अनुसरुन असते. पावरा लोकांची वेशभुषा ही त्यांच्या डोंगरदऱ्या तसेच जंगल पर्यावरणास अनुसरुन अशी आहे. सर्वसाधारणपणे पावरा लोक पुरुष धोतर वापरतात, ते गुडग्यापर्यंत असते. डोक्यावर टोपी किंवा पगडी व अंगात सदरा परिधान करतात. व स्त्रिया नऊवारी साडी वापरतात आणि दागदागिणे परिधान करतात. आताच्या मुला-मुलींचा पोशाख हा आधुनिक प्रकारचा असतो.[६]

क) **दागदागिणे** :-

- **स्त्रियांचे दागिणे** :- पावरा स्त्री दागदागिणे वापरण्याबाबत अधिक दक्ष असते. घरातील शुभकार्याप्रसंगी, सणासुदीला, विवाहप्रसंगी, यात्रेनिमित्त, बाहेरगावाला जातांना ती अंगावर जास्तीत जास्त दागिणे परिधान करते. पावरा स्त्रियांचे सर्व दागिणे हे चांदीचे असतात. तिच्या दागदागिण्याचे विविध प्रकार आढळतात.

**दंडावर** :- वावा-बाटया, (वेल्या), हवाला, वाहुत (बाजुबंद)

**मनगटावर** - वावा, सिलवा-सिलवा, गोखरा-गुखरा, वेल्यासारखे दागिणे असतात. कानात कानगेटला (रिंगा) किडया रिडु असतात.

**गळयात** - आहडी, हाकुल (खाली), टावली (चांदीच्या रुपयांना डागून बनविलेला हार) तसेच रंगीबेरंगी मण्याची पोत असते.

**पायात** :- पिंजण्या (पैजण), तुडा (तोडे), बाला (पायातील वाळा), वाकला सावड.

**पायाच्या व हाताच्या बोटात** :- चांदीची अंगुठी, मुंदी असते. पायाच्या बोटात किळया (मासोळया) असतात. नाकात पासला-पांसला (फुली, नाथणी) वापरतात.

- **पुरुषांचे दागिणे** :- पुरुषांच्या दंडावर बाहटान वावा (कडे) असते. मनगटावर वावा असतात. कानात चौकडी असते. हातात अंगठया असतात. पुरुष जास्त प्रमाणात दागिणे वापरण्यास टाळतात.[७]

२) **खानदेशातील पावरा लोकांचे वाद्य** :-

सातपुडयाच्या जंगलमय पर्यावरणात राहणाऱ्या पावरा लोकांमध्ये संगीत आणि नृत्य हि विरंगुळयाची मुख्य साधने आहेत. सण उत्सव प्रसंगी गाणी म्हणत ढोलाच्या तालावर ते धुंद होऊन नाचतात. त्या नृत्याप्रसंगी निरनिराळया वाद्यांचा वापर केला जातो. पावरा लोकांच्या



TSS's Smt.V.U.Patil Arts and Late Dr.B.S.Desale Science College, Sakri, Dist.Dhule
PRINCIPAL
TSS's Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College,
Sakri, Dist.Dhule PIN-424304

वाद्याची पावरी भाषेतील नावे वैशिष्टयपूर्ण अशी आहेत ते पूढील प्रमाणे.

१) डुल:- मोठया आकाराच्या अवाढय ढोल
२) मांदल:- लहान ढोल
३) डुल्या:- मृंदुगासारखे वाद्य
४) थावी:- थाळी वाद्य
५) पिपऱ्या:- पिपाणी
६) तुतड्या:- ताशासारखे वाद्य
७) रोणयो:- किंगरी सारखे वाद्य
८) गागु:- तोडाने वाजवयाचे वाद्य
९) पावी:- बासूरी
१०) डाकवा:- डमरूच्या आकाराचे मोठे वाद्य

मोठा अवाढव्य ढोल होळीच्या सणास, इंदल उत्सव प्रसंगी वाजवतात व या सर्व वाद्यांच्या तालावर पावरा लोक हात धरून नृत्य करतात.[८]

**३) खानदेशातील पावरा समाजातील विवाह पध्दती :-** खानदेशात वस्ती केलेल्या पावरा समाजात विवाह करणे अत्यावश्यक मानले जाते. जर विवाह केला नाही तर स्वर्गवासी झालेले वाडवडिल स्वर्गात शापीत जीवन जगतात. त्याशिवाय अविवाहित व्यक्ती मेली तर तिला स्वर्गात प्रवेश नरातो अशी पावरा लोकांची भावना आहे. ज्याचा विवाह होत नसेल त्याचात काहीतरी दोष आहे असे समजले जाते. अशा अविवाहित व्यक्तीस धार्मिक समारंभातही भाग घेता येत नाही. म्हणून पावरा लोकात विवाह ही अत्यावश्यक बाब समजली जाते.[९]

**अ) पावरा समाजातील विवाह संबंधातील सामाजिक रुढी :-** पावरा लोकात विवाहसंबंधीचे काही नीतीनियम आहेत. उदा. मामाच्या मुलीशी लग्न करीत नाहीत. कारण मामाचे आईच्या रक्ताशी नातेसंबंध असतात म्हणून मामाची मुलगी बहिण मानली जाते. इतकेच नव्हे, तर पूर्वीच्या काळी मामाच्या पाड्यातील मुलींशीही विवाह केला जात नसे. कारण त्या गावातील मुली अप्रत्यक्षपणे आईच्या रक्तसंबंधाशी जोडल्या जातात. त्याशिवाय आत्याच्या मुलांशी किंवा मुलींशी विवाह होत नसतो. कारण वडील आणि आत्या एकाच रक्ताचे असतात. परंतू अलीकडे बदलत्या काळाचा परिणाम म्हणा तसेच आदिवासींच्या वाढत्या लोकसंख्येचा दबाव म्हणा संबंधित गावातील वरील बंधने सैल झाली आहेत. आता फक्त मामाच्या किंवा आत्याच्या घरातील मुला-मुलींशी लग्न करणे निषिध मानले जाते. वरील बंधने सैल झालेली असली तरी एकाच कुळातील मुला-मुलींचे लग्न संबंध होत नाहीत. म्हणून वधू वर हे वेगवेगळया कुळातील असले पाहिजेत तरच पावरा समाजातील मुला-मुलीचे संबंध जुळतात.[१०]

**ब) पावरा समाजात विवाहाच्या वेगवेगळया पध्दती :-** भारतीय समाज संस्कृतित लग्न म्हणजे पवित्र बंधन मानले जाते. पावरा समाजात अंतरजातीय विवाहास मान्यता नसते. पावरा समाजात विवाह एक पवित्र बंधन मानले जाते. विवाहाच्या पध्दती खालील प्रमाणे.

- **पारंपारिक विवाह किंवा समाज मान्यता विवाह :-** वर वधूच्या व त्यांच्या कुटूंबियांच्या एकमेकांच्या पसंतीने होणाऱ्या विवाहास पारंपारिक किंवा समाजमान्य विवाह असे म्हणतात. हा विवाह रुढी परंपरेनुसार साजरा केला जातो. त्यासाठी सर्व समाज, नातलग एकत्र येतात. व त्यांच्यासंमतीने विवाह होतो.
- **जबरी विवाह :-** या विवाह पध्दतीत मुलीस पळवून नेवून विवाह केला जातो. या जबरीने ओढून नेणे म्हणजे मुलीस पळवून नेणे असा त्याचा अर्थ होतो. 'लीन नाहालू वियाव' असे म्हणतात. एखादा गृहस्थ स्वत:साठी मुलगी पळवून आणतो किंवा मुलासाठी मुलगी पळवून आणतो.
- **घरघुशी विवाह :-** या विवाहात मुलीला मुलगा पसंत असेल आणि तिचे आई-वडिल त्या लग्नास विरोध करीत असतील किंवा मुलीचा बाप जास्त देज मागत असेल तर मुलगी सरळ तिच्या पसंतीचा तरुणाच्या घरात राहायला जाते. अशा प्रसंगी त्या तरुणीस त्या तरुणाच्या घरातील लोकांचा त्रासही सहन करावा लागतो. अशा पध्दतीच्या विवाहास घरघुशी विवाह असे म्हणतात.
- **प्रेम विवाह :-** या विवाह प्रकारात तरुण-तरुणीचे एकमेकावर प्रेम असेल आणि त्यांच्या विवाहास विरोध असेल तर ते सरळ पळून जातात. काही



T.S.S's. Smt. V.U. Patil Arts & Late Dr. B.S. Desale Science College Sakri, Tal. Sakri, Dist. Dhule
PRINCIPAL
T.S.S's. Smt. V.U. Patil Arts & Late Dr. B.S. Desale Science College Sakri, Tal Sakri, Dist. Dhule

दिवसानंतर त्यांच्या आई-वडिलांचा विरोध कमी होतो. जात पंचायत बसवून त्यांचा विवाहास मान्यता मिळते. या प्रसंगीही मुलीच्या बापास हुंडा (देज) दयावा लागतो. परंतू हुंडा मुलीच्या बापाच्या इच्छाप्रमाणे मिळत नाही. तसेच त्यास जात पंचायतीचा खर्च दयावा लागतो. पावरा समाजात असे प्रेम विवाह बाजारहाट, सण, यात्रा आदि प्रसंगी मोठयाप्रमाणावर होतात. अशा विवाहांना प्रेम विवाह असे म्हणतात.[११]

- **बहुपत्नीकत्व पध्दत :-** पावरा लोकात बहुपत्नीत्वाची पध्दत प्रचलित आहे. दुर्गम दऱ्याखोऱ्यातील भागात तर ही प्रथा प्रकर्षाने जाणवते. जमिनजुमला बाळगुण असलेल्या तसेच चांगली आर्थिकस्थिती असलेल्या पावरा लोकांकडे दोन तीन बायका आढळून येतात. स्वत:कडे जास्तीत जास्त बायका असणे हा पावरा समाजात प्रतिष्ठेचे लक्षण समजले जाते. आपली प्रतिष्ठा दाखविण्यासाठी असे मालदार लोक दोन तीन बायका सहज करतात. परंतू सर्वसामान्य आर्थिकस्थितीतील पावरा माणसाला एक बायको असते. सहाजिकच सातपुडयाच्या परिसरात सर्वदूर पसरलेल्या पावरा लोकात एकपत्नी प्रथा मोठया प्रमाणात आढळून येते.[१२]
- **खानदेशातील आदीवासींचे सांस्कृतिक जिवन :-**

भिल्लांच्या उतपत्तीविषयी भागवतपुराण, अग्निपुराण, महाभारत, शिवपुराण, रामायण इत्यादी वाड:मयात त्यांचा उल्लेख आढळतो. भिल्ल हा शब्द बिल्लू या शब्दापासून आला आहे असे सांगितले जाते.[१३] भिल्लांचे प्रामुख्याने दोन उपविभाग आहेत त्यांना "हगा" आणि "हगवाडिया" असे म्हणतात. त्याचबरोबर भिल्लामध्ये गोत्र पध्दती असून त्यांचे २७ ते ३६ गोत्र असल्याचे आढळते. भिल्ल लोकांमध्ये लग्नपुर्व व लग्नबाहय संबंध प्रचलीत आहेत. पत्नीच्या मृत्युनंतर भिल्लपुरूष त्याच्या मयत पत्नीच्या लहान बहिणीशी लग्न करतात. सातपुडयातील भिल्लांची पारंपारिक लग्नपध्दती मनोरंजक आहे. भिल्ल समाजात नवरा मुलगा मुलीला यात्रेत किंवा बाजारात पहातो व लग्नाची मागणी घातलो. मागणी प्रमाणे लग्न जमले नाहीतर मुलगा मुलीला तिच्या संमतीने पळवून नेतो व लग्न करतो.

वसावे, वसावा, वळवी, पाडवी हया भिल्लांच्या अलग पोट जमाती नाहीत. भिल्ल जमातीतील ही महत्वाची कुळे आहेत भिल्ल प्रदेशात (पहाडात) राहणारे पाडवी,वरच्या भागात राहणारे वळवी आणि वसाहतीत किंवा गावे करून राहिले ते वसावा (वसावे) व मुळ समाजापासून तुटलेले दुर झालेले ते तडवी अशी त्यांची स्थानपरत्वे कुळ आढळतात. तडवी भिल्ल अक्कलकुवा तालुक्यात आहेत त्यांना 'ढाणका तडवी' असेही म्हणतात. हे तडवी भिल्ल हिंदु धर्मिय आहेत कच्चे धान्ये खाणारे म्हणून त्यांना 'ढाणका भिल्ल' म्हणण्याची प्रथा पडली असवी.तर रावेर,चोपडा,यावल तालुक्यातील तडवी भिल्ल हे मुस्लीम धर्मिय आहेत. त्यांची बोलीभाषाही वेगळी आहे. त्याचा विवाह सोहळा सुर्योदयापूर्वी किंवा सुर्यास्तानंतर पार पडतो. हे लोक निसर्ग पुजक आहेत त्यांच्यात पारंपारिक पंचायत असून सर्व प्रकारचे सामाजिक व कौटूंबिक तंटे त्या पंचयती मार्फत सोडविले जातात. आदिवासी समाजात मुल जन्मल्यानंतर मुलाच्या तोंडात दारूचा थेंब टाकला नाहीतर मुल नशिबवान निघणार नाही असा त्यांचा समज आहे. त्याचबरोबर मृत्यूपावलेल्या माणसाच्या तोंडातही दारूचा थेंब टाकला जातो. थोडक्यात आदिवासींच्या जिवनात दारूला खुप महत्व आहे असे दिसून येते. सातपुडयातील होळी उत्सव हा आगळयावेगळया पध्दतीने साजरा केला जातो. होळी विषयी वैशिष्टयपूर्ण अशी कथा सांगितली जाते. पोरबादेव व त्याची पत्नी यांना गांडीदिवाळी, होळी, आखात्री, पाटी, चौदोह, विदन व गेर अशा सात मुली होत्या त्यापैकी होळी ही एक होती. तिच्या नावाने हा सण मोठया उत्सहाने साजरा केला जातो. होळी ही पहाडी भागातील मुलगी व बहिण असते त्यामुळे पहाडी भागात होळीला आईचा व बहिणीचा मान दिला जातो. तर सपाटीवरील भागाची ती पत्नी असल्याने या भागातील होळी उत्सवात हास्य व मस्करी दिसून येते. त्याचबरोबर होळीचा सण साजरा करतांना होळीच्या भोंगऱ्या, मेलादा,सोल



TSS's Smt.V.U.Patil Arts and Late Dr.B.S.Desale Science College Sakri, Dist.Dhule
PRINCIPAL
TSS's Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College, Sakri, Dist.Dhule PIN-424304

व सासल या तिच्या मुलांचीही आठवण केली जाते व त्यानिमित्ताने उत्सव साजरा केला जातो. निसर्ग व पर्यावरण सोबतच्या आदिवासी बांधवांची नात्याची कृतज्ञता व्यक्त करणारा, समूहशक्तीचा आगळावेगळा अविष्कार, ऋणानुंबंध सिध्द करणारा, हजारो वर्षाच्या संस्कृतीचा समृध्द वारसा जपणारा सातपुडयाच्या दुर्गम भागातील काठी संस्थानच्या मानाचा होलिकोत्सव अगदी जोमाने उत्साहपूर्ण वातावरणात स्वयंशिस्तीने व मनोभावे श्रध्देने पार पाडला जातो. होळी हा सण भिल्ल लोक पाच दिवस साजरे करतात. भिल्ल आदिवासी ढोलाच्या तालावर धुंदपणे नाचतात. या नृत्यसमुहात सामील झालेले लोक बावा, बुध्या आणि काली या नावानी ओळखले जातात. त्याचबरोबर गोसई नृत्यही साजरे केले जाते हे नृत्य देखील होळीचे नृत्य आहे तसेच डिंडण नृत्य हे धार्मिक नृत्य साजरे केले जाते भिल्ल पावरा लोक ज्या परिसरात राहातात त्या परिसरात काही गावात गुलाल्या बाजार व भोंगऱ्या बाजार भरविला जातो. होळी नंतर पाचव्या दिवसापासून रंगपंचमीचा कार्यक्रम केला जातो. या होळीच्या कार्यक्रमासाठी विशेष गाणे म्हटले जातात व त्यासाठी विशेष वादयांचा उपयोग केला जातो. होळी नृत्याबरोबरच गाव दिवाळी व गांडीदिवाळी साजरी करातात. यात रात्रभर आदिवासी पारंपारिक पध्दतीने नाटक करतात व सकाळी देवी-देवतांच्या नावाने बकरा, कोबंडी बळी देतात. प्रत्येक गावात वेगवेगळया दिवशी ही दिवाळी साजरी होते. तसेच 'ईदलपूजा' व 'देवखळे' हे धार्मिक नाचही साजरे केले जातात. त्यात तारजा, गौरी, दंडार, रोडाली, रेलो ही सर्व धार्मिक नृत्य साजरी करतात. अतिदुर्गम डोगरदऱ्याच्या कुशीत डोगऱ्या देवाचा उत्सव मोठया उत्साहाने साजरा करतात. निसर्गशी अतूट नाते सांगणारा आदिवासींचा अनेक उत्सवांपैकी एक उत्सव म्हणजे डोगऱ्या देवाचा उत्सव होय. आदिवासींच्या धार्मिक रुढी हया निसर्ग आणि प्राणीपूजेतून निर्माण झालेल्या दिसतात. निसर्गातील गुढ, अनाकलनीय ते सर्व पुजनीय मानतात. त्याच्या देवता म्हणजे बडापेन, डोंगरदेव, वनदेव, वाघदेव, गावदेव, कणसरी, धरतारी नारनदेव इत्यादी. त्याचबरोबर आदिवासी आपल्या पुर्वजांना व पितरांना देव मानातात. भुतपिशाच्च देखील त्यांना देवा सारखीच वाटतात. आदिवासींची गावदिवाळीचा उत्सव आगळयावेगळया पध्दतीने साजरी होतो. दिवाळीच्या निमित्ताने सोंगाडया पार्टीचा कार्यक्रम करण्यात येतो. त्याचबरोबर आदिवासींचे कुलदैवत आदिशक्ती देवमोगरा (याहामोगी) मातेच्या यात्रोत्सवाला सुरवात होते. याहामोगी देवीच्या यात्रेला धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक दृष्टया अत्यंत महत्वाचे स्थान आहे.

आदिवासी जमातीत विवाह पध्दती वेगवेगळे आहेत. काही आदिवासी जमातीत बहुपत्नीकत्व, प्रौढ विवाह, विधवा विवाह मान्य आहेत. याला काही जमाती अपवाद आहेत. परंतू चालीरितीनुसार व परंपरेने बहुपत्नीकत्वाची आणि प्रौढ विवाहाची पध्दती रुढ आहे. विवाहाच्या वेळी मद्याची रेलचेल असते व नृत्यागायनाचा कार्यक्रम साजरा केला जातो. भिल्ल लोकांमध्ये एकपत्नीकत्व व बहुपत्नीकत्व या प्रथा जरी प्रचलीत असल्यातरी बायकांना मात्र अनेक पुरुषांशी विवाह करण्यास मनाई आहे. आदिवासी समाजात हठागमन किंवा आगांतुक विवाह, सहपलयन विवाह, झगडा पध्दत विवाह, समाज मान्यता विवाह व वधुमुल्य विवाह अशा विविध प्रकारचे विवाह पध्दती प्रचलीत आहेत. या विवाह प्रसंगी आदिवासी बोलीभाषेमध्ये वेगवेगळया पध्दतीच्या व वैशिष्टयपुर्ण अशी नाचगाणे, लोकगीते, वऱ्हाडी नृत्य सादर केले जातात. पावरा समाजात विवाह एक पवित्र कार्य मानले जाते. त्यांच्यात पारंपारीक विवाह किंवा समाज मान्यता विवाह, जबरी विवाह, घरघुशी विवाह, प्रेम विवाह, बहुपत्नीकत्व विवाह अशा विविध प्रकारच्या विवाह पध्दती प्रचलीत आहे. धानका जमातीत विवाह हे शक्यतोवर सुर्योदयापुर्वी किंवा सुर्यास्तानंतर होतात. पौष, फाल्गुन व पावसाळयातील महिना सोडून विवाह सोहळा केला जातो. या जमातीत विधवा विवाह प्रचलित



T.S.S's. Smt. V. U. Patil Arts & Late Dr. B.S. Desale Science College Sakri, Tal. Sakri, Dist. Dhule

PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

आहेत. विधवा विवाह स्त्रीच्या मर्जीनुसार किंवा मयत नवऱ्याच्या लहान भावाबरोबर होतो. परंतू त्याची सक्ती केली जात नाही. त्याचबरोबर विवाहीत स्त्रीला किंवा पुरुषाला केव्हाही घटस्फोट मिळविता येतो. तसेच गामीत (गावीत), मावची, तडवी भिल्ल यांच्या विवाहाच्या पध्दती रुढी परंपरेनुसार केल्या जातात. आदिवासींचे विवाह भगत (पुरोहित) द्वारे केले जातात. विवाह प्रसंगी जेवणाबरोबर मद्यपान केले जाते. थोडक्यात आदिवासी जीवनात मद्याला (दारुला) व भगताला अतिशय महत्व दिसून येते.

कोणत्याही समाजाची सुधारणा व्हावयाची असेल तर त्यासाठी प्रथम शिक्षणाचा प्रसार इ ाला पाहिजे हा अगदी सामान्य सिध्दात आहे. ज्या समाजाची सुधारणा करावयाची आहे त्या समाजाला जो पर्यंत केल्या जाणाऱ्या सुधारणेचे महत्व पटत नाही तो पर्यंत त्या सुधारणा बाहेरुन लादल्यासारख्या होतात व अल्पकाळच टिकतात. म्हणून सर्वप्रथम आदिवासींच्या सुधारणेसाठी शिक्षणाचा प्रसार वाढला पाहिजे. केवळ त्यामुळेच त्यांची दृष्टी व्यापक व प्रगत बनेल. आणि सभोवतालच्या समाजाचे ज्ञान होऊन त्यांच्यात स्पर्धा आणि महत्वाकांक्षा निर्माण होऊन आदिवासींच्या प्रगतीला निश्चित गती मिळेल हे होण्यासाठी प्रथम त्यांच्यात शिक्षणाची गोडी आणि लालसा निर्माण होणे निकडीचे आहे हे तत्वतः मान्य करुन मागासलेल्या वर्गाच्या उन्नतीसाठी शासनाने तऱ्हेतऱ्हेचे प्रयत्न केले आहेत व करीत आहेत. मानवी समाजात समाजपरिवर्तन आणि सबलीकरणाचे साधन म्हणून शिक्षणास नेहमीच मान्यता मिळालेली आहे.



आदिवासींचे होळी नृत्यातील बुध्या बावा व काली



आदिवासींचे होळी नृत्यातील बुध्या बावा व काली



आदिवासींच्या नृत्यातील वाद्ये


संदर्भ :-

१) डॉ. गारे गोविंद — महाराष्ट्रातील आदिवासी जमाती, प्रकाशक-अनिरुध्द अनंत कुलकर्णी, प्रकाशन- कॉन्टिनेन्टल पूणे, द्वितीय आवृत्ती २००२, पृ.क्र.१-२

२) चौरे के. बी. — नंदुरबार तालुक्यातील कोकणी जमातीचा सामाजिक आणि आर्थिक अभ्यास १९८७-८८,पृ.क्र.८

३) डॉ. गारे गोविंद — पूर्वोक्त पृ.क्र.१११

४) डॉ. गारे गोविंद — उपरोक्त पृ.क्र.१११

५) डॉ. गारे गोविंद — उपरोक्त पृ.क्र.११२

६) खन्ना बी.डी. — धडगाव तालुक्यातील पावरा समाज, २००३-०४, पृ.क्र.२१

७) खन्ना बी.डी. — उपरोक्त पृ.क्र.२२

८) खन्ना बी.डी. — धडगाव तालुक्यातील पावरा समाज, २००३-०४, पृ.क्र.२९


TSS's Smt.V.U.Patil Arts and Late Dr.B.S. Desale Science College Sakri, Dist.Dhule



PRINCIPAL,
TSS's S... Arts &
Late Dr.B.S... ence College,
Sakri, D... PIN-424304

९) खन्ना बी.डी. धडगाव तालुक्यातील पावरा समाज, २००३-०४, पृ.क्र.१९-२०

१०) प्रा. पाटील डी.जी. खानदेशातील आदिवासी पावरा, (पहा) खानदेशचा सांस्कृतिक इतिहास, खंड दोन (संपा) डॉ. शहा मु.ब. प्रकाशक-का.स. वाणी, मराठी प्रगत अध्ययन संस्था धुळे, जानेवारी २००४, पृ.क्र.१५

११) प्रा. पाटील डी.जी. पूर्वोक्त पृ.क्र.१५

१२) प्रा. पाटील डी.जी. उपरोक्त पृ.क्र.१६

१३) डॉ. गारे गोविंद महाराष्ट्रातील आदिवासी जमाती पूर्वोक्त पृ.क्र.६३


PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.De[illegible] Science College
Sakri, Tal [illegible], Dist.Dhule

Impact Factor – 6.261 Special Issue - 76 Dec. 2018 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal

# HISTORY OF KHANDESH



■ GUEST EDITOR ■

Dr. Vijay Y. Jadhav

■ EXECUTIVE EDITOR ■

Prof. Satish M. Borse

■ CHIEF EDITOR ■

Mr. Dhanraj T. Dhangar

This Journal is indexed in :

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- Universal Impact Factor (UIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

RESEARCH JOURNEY
MULTIDISCIPLINARY ONLINE RESEARCH JOURNAL

PRINCIPAL
I.S.S.'s Smt. ... Patil Arts &
Late Dr. ... S. Desale Science College
Sakri, Dist. Dhule

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

'RESEARCH JOURNEY' *International Multidisciplinary E- Research Journal*
ISSN : 2348-7143
Dec. 2018
**Impact Factor** - (SJIF) – 6.261
**Special Issue 76 :** History of Khandesh

# MULTIDISCIPLINARY ONE DAY NATIONAL LEVEL CONFERENCE

ON

# HISTORY OF KHANDESH

18TH DECEMBER 2018

EDITORIAL BOARD
*( only for this issue )*

GUEST EDITOR
**Dr. Vijay Y. Jadhav**
Principal, Late. A. P. S. Wadile Arts College, Thalner.

EXECUT IVE EDITOR
**Prof. Satish M. Borse**
Dept. of History , Late. A. P. S. Wadile Arts College, Thalner.

CHIEF EDITOR
**Mr. Dhanraj T. Dhangar**
MGV'S Arts, Sci & Comm College, Yeola, Dist. Nashik.

VENUE

**Annapurnadevi Vidya Prasarak Sanstha Sanchalit**
**Late. Annasaheb P. S. Wadile Arts College**
Thalner, Tal. Shirpur, Dist. Dhule - 425 421.

Sakri, Dist.Dhule
PRINCIPAL
TSS's Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College,
Sakri, Dist.Dhule PIN-424304

'RESEARCH JOURNEY' *International Multidisciplinary E- Research Journal* | ISSN 2348-
**Impact Factor - (SJIF) – 6.261** | Dec. 2018
**Special Issue 76 :** History of Khandesh

# प्राचिन, मध्ययुगीन व पेशवेकालीन खानदेशातील राजकिय परिस्थिती

प्राचार्य डॉ. पी.एस. सोनवणे
श्रीमती विमलबाई उत्तमराव कला व कै. डॉ. भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालय,
साक्री, जि. धुळे.

**प्राचीन खानदेश**

खानदेशमध्ये तापीच्या परिसरात प्रागऐतिहासिक काळात वसाहती होत्या. ही गोष्ट प्रकाशे येथे झालेल्या उत्खनावरुन सिद्ध झाली अ महाभारतात तोरणमाळचा राजा युवानाश्व याचा उल्लेख आहे. त्याने पांडवांचा पक्ष स्वीकारलेला होता. युवानाश्व राजाचे स्वतंत्र राज्य ह ऐतिहासिकदृष्ट्या तोरणमाळचा प्रदेश प्राचीन असून या प्रदेशात अधिक संशोधन होण्याची आवश्यकता आहे. मौर्यकाळात खानदेशभागा सम्राट अशोकाच्या सत्तेचा विस्तार झाला होता. हे देवटेक येथील शिलालेखावरुन स्पष्ट होते. सम्राट अशोकाच्या निधनानंतर दक्षिणेक सातवाहनांनी खानदेश प्रदेशावर वर्चस्व प्रस्थापित केले. नाशिक लेण्यातील एका शिलालेखावरुन सातवाहन सम्राट दुसरा याची सत्ता इ.स. दुसऱ्या शतकात खानदेशावर होती हे स्पष्ट होते.१ इ.स. च्या पाचव्या शतकापासून खानदेशभागावर अभिरांची सत्ता प्रस्थापित झालेली दि येते. नाशिक येथील लेण्यातील शिलालेखावरुन विरसेन अभिराची सत्ता नाशिक व खानदेशभागावर होती असे दिसून येते. सुमारे दोन श अभिरांची सत्ता खानदेशवर असावी असे दिसते. अभिर राजे खानदेशात गौळीराजे म्हणून ओळखले जातात. अभिर या शब्दाचे रुपांतर अ असे असून आजही अहिर, शिंपी, सुतार इत्यादी जाती आहेत. अभिरांचा महाभारतामध्ये उल्लेख सापडतो.२ खानदेशच्या इतर भ राष्ट्रकुटांची राजवट प्रदीर्घ काळ होती. खानदेशात अनेक ठिकाणी राष्ट्रकुटांचे ताम्रपट सापडलेले आहेत.३ राष्ट्रकुटांनंतर खानदेशवर यादव सत्ता प्रस्थापित झाली. खानदेशात यादवकालीन हेमांडपंथी मंदिरे अनेक ठिकाणी आहेत. मेथी, बळसाणे, चांगदेव, झोडगे इत्यादी ठिक उत्कृष्ट हेमांडपंथी मंदिरे बांधलेले आहेत. बळसाणे येथील मंदिरे यादवकालीन स्थापत्य कलेचा उत्कृष्ट नमुना आहे. १३१२ पर्यंत खानदे यादवांची सत्ता होती.४ मुसलमानी राजवटीपूर्वी प्राचीन काळात खानदेशवर मौर्य, शुंग, सातवाहन, अभिर, राष्ट्रकुट, बदामीचे चालु शिलाहार, देवगिरीचे यादव इत्यादींची सत्ता होती.५ प्राचीन काळातील खानदेशच्या इतिहासाचा प्रारंभ आसिरगड व तोरणमाळ या ड किल्ल्याच्या संदर्भापासून सुरु होतो. टॉलेमी या ग्रीक भूगोल शास्त्रज्ञाने तोरणमाळचा उल्लेख त्याच्या ग्रंथात घतिआतुराङ या नावाने के दिसून येतो. खानदेशला महाभारतकाळात खांडववनभूमी म्हणून संबोधले जात असे. ही भूमी श्रीकृष्णाची भूमी म्हणूनही ओळखली जात ह म्हणून या प्रदेशात श्रीकृष्णाची भक्ती करणारे असंख्य लोक वास्तव्य करुन होते.६

**मध्ययुगीन खानदेश**

१२९६ मध्ये अल्लाउद्दीन खिलजीचा सेनापती मलिक काफूरने खानदेशवर स्वारी केली. तेव्हापासून अठराव्या शतकापर्यंत हा मुसलमानी वर्चस्वाखाली राहिला. तुघलक राजवटीच्या अमदानीत फिरोज तुघलकाने खानदेशचा कारभार फारुकीराजा मलिक नासिर याच्याकडे सोपविला होता. थाळनेर हे त्याचे केंद्र होते. फारुकी घराण्याची राजवट खानदेशवर जवळपास २०० वर्षे होती. त्यांनी स्वतं कारभार सांभाळला. फारुकी घराण्याचा राजा मलिक नासिरखान व त्यांचे वंशज यांना घ्खानङ ही पदवी होती. या घराण्यातील नासिरखान नावावरुन या प्रदेशला घ्खानदेशङ या नावाने संबोधले जाऊ लागले.७ मध्ययुगीन काळात खानदेशात फारुकी घराण्यातील शासकांचे होते. ६ जानेवारी १६०१ मध्ये अकबराने खानदेशातील आसिरगड हा महत्वाचा किल्ला जिंकून घेतला व तेव्हापासून खानदेश म साम्राज्यात समाविष्ट करण्यात आला. आणि त्यावर मोगल राजपुत्र दानियलची नेमणूक करण्यात आली. त्यामुळे खानदेशचे स्वतंत्र अ संपुष्टात आले.८ सतराव्या शतकातील एक प्रवासी इटालीचा कैहेरी भारतात १६९५ पासून प्रवास करीत होता. मोगलांच्या कारभाराबद्द म्हणतो की, राज्यांच्या सचिवांना आपल्या प्रांताची तपशीलवार माहिती आपल्या राजाला देण्यासाठी आठवड्याचे वेगवेगळे दिवस दिलेले होते. त्यात खानदेश अथवा बऱ्हाणपूरसाठी शनिवार आणि दख्खनसाठी रविवार अशी विभागणी केली होती.९ मोगल का दख्खनचे सहा सुभे अथवा प्रांत बनविण्यात आले होते. १)खानदेश २)वऱ्हाड ३)औरंगाबाद ४)बिदर ५)विजापूर ६)हैद्राबाद इत्याद खानदेश सुभ्यात १)असिर २)बागलाण ३)विजागड ४)हंडिया ५)नंदुरबार ६)जालना या जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला होत असिरगडाच्या वेढ्या प्रसंगी भडगावच्या रामजीपंताने महत्त्वपूर्ण कामगिरी केल्याने त्याला अकबराने नशिराबाद, एरंडोल, जामनेर, व आणि भडगाव ही गावे जहागिरी म्हणून दिलीत. रामजीने या भागाची भरभराट केली व भडगावलाच आपले ठाणे ठेवले. त्याच्या निधन त्याची पत्नी लाडकूबाई हिने कारभार चालविला. तिने ३०० दरोडेखोरांना ठार केल्याचा उल्लेख आढळतो. याचकाळात अबुल फइल काळ खानदेशचा सुभेदार होता.११ महाराष्ट्रात [illegible] स्थापन केलेले राज्य पेशवे काळात साम्राज्यात रुपांतर झाले. १७५२ मध्ये ख सुभ्याचा बहुतांशी भाग त्यांनी आपल्या साम्राज्याला जोडला होता. त्यानंतर उर्वरित भाग १७६० मध्ये आपल्या ताब्यात आणला होता.



PRINCIPAL
I.S.S's Smt. V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

ISSN : 2348-7143
Dec. 2018

खानदेशचा भाग मराठा साम्राज्य अस्ताला जाईपर्यंत मराठ्यांचा ताब्यात होता.१२

**पेशवेकालीन खानदेश**

सन १६९७-९८ मध्ये नंदुरबार परगण्यावर मराठ्यांनी स्वारी केली. थाळनेरचा मोगल सुभेदार हुसेन अलीखान याचा पराभव करुन नंदुरबार शहर मराठ्यांनी लुटले. मराठ्यांचे चाळीस हजार सैन्य खानदेश परिसरात पसरले होते. खानदेशच्या प्रदेशातूनच मराठ्यांच्या फौजा माळव्यावर आक्रमण करीत. तसेच उत्तरेतून खानदेशमार्गे मोगल तळावर येणारा खजिना मराठ्यांनी अनेकदा लुटल्याची नोंद आढळते. बुर्‍हाणपूर ते अजिंठा या मार्गावरही धुमश्चक्री होत असे. १६८० ते १७०७ या काळात खानेदशवर मोगलांचे बारा सुभेदार होऊन गेलेत. कोणालाही मराठ्यांचा पूर्णपणे बंदोबस्त करणे शक्य झाले नाही.१३ पेशवा बाळाजी विश्वनाथ यांनी सैय्यद बंधूंना मदत केल्यामुळे दख्खनमधील सहा सुभ्यांची चौथाई वसूल करण्याचा हक्क प्राप्त केला होता. परंतु निजाम उल-मुल्कने मराठ्यांना विरोध केल्यामुळे मराठा-निजाम यांच्यात संघर्ष  झाला. नानासाहेब पेशव्यांच्या कारकीर्दीत निजामाशी १७५२ मध्ये घ्भालकीचा तहङ झाला. या तहान्वये मराठ्यांना गाळणा, संगमनेर आणि खानेदशचा बराच भाग निजामाकडून मिळाला. व १७६० पर्यंत संपूर्ण खानदेश मराठ्यांनी मिळविला.१४ १७६३ मध्ये निजामाने माधवराव पेशव्याला दिलेल्या उर्वरित खानदेशातील सावदा हे गाव त्याने आपला मामा रास्ते यांना जहागिरी म्हणून दिले. १८१८ मध्ये इंग्रजांची सत्ता प्रस्थापित होईपर्यंत सावदा व तेथील गढी रास्ते घराण्याच्या मालकीचीच होती.१५ खानदेशातील मराठा सत्तेच्या काळात जहागीरदारांच्या गढ्या उभारल्या गेल्या. त्यात कदमबांडे, बारगळ, भोईटे, पवार हे मराठे सरदार खानदेशात गढ्या बांधून राहत होते.१६ खानदेशात मध्ययुगीन काळापासून अनेक वतनदार होते. तोरखेडे येथील कदमबांडे, शिंदखेडा येथील राऊळ, सावद्याचे देशपांडे, रावेरचे देशमुख, जळगावचे भोईटे तर नंदुरबार, बऱ्हाणपूर, पेठ, सुरगाणा इत्यादी ठिकाणीही वतनदार होते. या वतनदारांप्रमाणेच नगरदेवळा येथील पवार हेही वतनदार होते. ते खानदेशातील इतर वतनदारांपेक्षा शिवकाळापासूनचे वतनदार होते.१७ खानदेशात देशमुखांचे वतन मोगल काळापासून सुरु झाले. राजा अलीखान फारुकी यांच्या कारकीर्दीत सुभे खानदेशातील कोणत्याही परगण्यात देशमुखीचे वतन नव्हते. जेव्हा खानदेशात मोगलांचा अंमल सुरु झाला तेव्हापासून खानदेशातील परगण्यांवर देशमुखांची नेमणूक झाली असा उल्लेख हिजरीसन १०७९ (१६६८-६९) च्या पत्रात आढळतो. राजा अलीखान फारुकी हा १५७६ ते १५९७ या काळात खानदेशात सत्तेवर होता.१८ खानदेशात जे वतनदार होते त्यात कानगो हेही होते. कानगोचे वतन हे खानदेशातील वैशिष्ट्यपूर्ण वतन होते. कारण मराठा साम्राज्याचा इतर भागात कुठेच असे वतन अस्तित्वात नव्हते. ते केवळ खानदेशमध्ये अस्तित्वात होते. अर्थात हे वतन मराठा सरकारने खास बाब म्हणून निर्माण केले नव्हते. तर हे वतन मध्ययुगीन काळातील खानदेशला मिळालेल्या वतनांमध्ये मोगलांचा एक वारसाच होता.१९ पेशव्यांचा काळ हा प्राचीन वतनदारांना आश्रय देण्याचा होता. राजाने पूर्वी जे वतने दिली आहेत. ती पेशव्यांनी काढून टाकण्यापेक्षा ती जतन करण्याची व ती पुढे चालविण्याची राज्यसरकारची इच्छा होती हे स्पष्ट दिसते. या इच्छेमुळेच मराठा साम्राज्यात कानगोचे वैशिष्ट्यपूर्ण वतन टिकून राहिले. अन्यथा निजामाच्या पाडावा बरोबरच ते नष्ट झाले असते.२० पेशव्यांच्या ताब्यात खानदेश ५८ वर्षे होता. या काळात प्रशासन व्यवस्थेत त्यांनी फारसा बदल केला नाही. पूर्वीची जी पद्धत होती तीच पुढे चालू ठेवली. ग्रामजीवन आणि सुभा प्रशासनात त्यांनी हस्तक्षेप केला नाही.२१ १६६४ मध्ये मोगलांनी खानदेश सुभा निर्माण केला आणि तोडरमलची प्रशासन पद्धती खानदेशात सुरु केली. मोगलांशी सामना करण्याचे अव्यवहारी धोरण मराठी राज्याचा संस्थापक छत्रपती शिवाजी राजाने पत्करले नाही. याउलट सुरतेच्या मार्गात येणाऱ्या या समृद्ध व संपन्न सुभ्यांचे संपत्तीहरण केले.२२ ३ जून १८१८ रोजी दुसऱ्या बाजीरावाने धुळकोट येथे इंग्रजांपुढे शरणागती पत्करली. आणि मराठ्यांचे राज्य ब्रिटिशांच्या स्वाधीन केले. या घटने बरोबरच मराठेशाही संपली आणि ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता प्रस्थापित झाली.२३

**संदर्भ सूची :**

१. देशपांडे प्र.न., च्प्राचीन खानदेशछ, पहा- खानदेश इतिहास, जळगाव १९९७ पूर्वोक्त पृ.क्र.३५
२. देशपांडे प्र.न., उपरोक्त पृ.क्र.३६
३. देशपांडे प्र.न., उपरोक्त पृ.क्र.३६
४. देशपांडे प्र.न., उपरोक्त पृ.क्र.३७
५. कुलकर्णी अ.रा., च्मध्ययुगीन महाराष्ट्रछ, पूर्वोक्त पृ.क्र.२३६
६. पाटील एम.व्ही., पूर्वोक्त पृ.क्र.२६-२७
७. पांडे मधुकर, पूर्वोक्त पृ.क्र.
८. भवरे एन.जी., च्प्राचीन खानदेशछ, पहा- खानदेश इतिहास, जळगाव -१९९७ पूर्वोक्त पृ.क्र.६३.
९. भवरे एन.जी., उपरोक्त पृ.क्र.६४
१०. भवरे एन.जी., उपरोक्त पृ.क्र.६४
११. जी. डी. जळगाव, पूर्वोक्त पृ.क्र.९०

Late Dr.B.S.Desale Science College Sakri, Dist.Dhule
PRINCIPAL
TSS's Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College, Sakri, Dist.Dhule PIN-424304

ISS
23
De
20

१२. शहा जी.बी., च्पेशवेकालीन खानदेशछ, पहा– खानदेश इतिहास, जळगाव १९९७, पूर्वोक्त पृ.क्र.६९
१३. पांडे मधुकर, पूर्वोक्त पृ.क्र.८
१४. महाजन टी.टी., च्खानदेशचा राजकीय इतिहासछ, खानेदश इतिहास, उपरोक्त पृ.क्र.१३८ आणि जी.डी. जळगाव पृ.क्र.१०१
१५. डी.जी. जळगाव, पूर्वोक्त पृ.क्र.१०२
१६. पाटील एस.ए., च्खानदेशच्या इतिहासाच्या साधनांचा शोधछ, निबंध संग्रह - ३, धुळे १९९८-९९, पूर्वोक्त पृ.क्र.१३
१७. पाटील अलका, च्नगरदेवळेकर पवारांच्या गढीचा एक अभ्यासछ, पहा– निबंध संग्रह-३, १९९८-९९ उपरोक्त पृ.क्र.४९
१८. नेहेते उज्वला जनार्दन, च्खानदेशातील सामाजिक जीवनछ (एरंडोल - परगण्याचा कागदपत्रांच्या आधारे), निबंध संग्रह-
पृ.क्र.११४
१९. शहा जी.बी., च्मराठा साम्राज्यातील कानगो वतनछ, पहा– डॉ.देशपांडे प्र.न.(संपा) खानदेश इतिहास परिषद - शोध-निबंध
१९९३/९४ पृ.क्र.१४
२०. शहा जी.बी., उपरोक्त पृ.क्र.१५
२१. शहा जी.बी., च्पेशवेकालीन खानदेशछ पूर्वोक्त पृ.क्र. ८०
२२. कुलकर्णी अ.रा., च्मध्ययुगीन महाराष्ट्रछ, पूर्वोक्त पृ.क्र. २३८
२३. सौ.देशपांडे विजया प्र., च्शेवटच्या पेशव्याचे शेवटचे दिवसछ, पहा निबंध संग्रह, १९९३/९४ पूर्वोक्त पृ.क्र.११८.

T.S.S's. Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S. Desale Science College Sakri, Tal. Sakri, Dist. Dhule

PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal. Sakri, Dist.Dhule

ISSN: 2249-894X Impact Factor : 5.7631(UIF)
Volume - 8 | Issue - 6 | March - 2019
REVIEW OF RESEARCH
International Online Multidisciplinary Journal
UGC APPROVED
Journal No.: 48514

# 1885 ते 1904 या काळातील खानदेशातील स्वातंत्र्य चळवळीचे मुल्यमापन



प्राचार्य डॉ. पी.एस.सोनवणे

श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै.डॉ.भास्कर सदाशीव देसले विज्ञान महाविद्यालय साक्री ता.साक्री जि.धुळे.

प्राचार्य डॉ. पी.एस.सोनवणे

प्रस्तावना : 1885 ते 1904 या काळात खानदेशाती... लक्षात येते

Editor - In - Chief - Ashok Vakkaldevi

PRINCIPAL
I.S.S.'s Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

International Online Multidisciplinary Journal
REVIEW OF RESEARCH
ISSN NO: 2249-894X

Review of Research (ROR) Journal is an Online International Multidisciplinary Research Journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the Editorial Board. Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## OUR CHIEF EDITORS

India



Ashok Yakkaldevi

Iran



Bijan Goodarzi

Bucharest



Ecaterina

Sri-lanka



Kamani Perera

## Associate Editors



Dr. T. Manichander



Sanjeev Kumar Mishra

## Associated and Indexed, India

- MENDALEY
- GOOGLE SCHOLAR
- CITULIKE
- ENDNOTE
- ZOTERO
- DRJI

TSS's Smt.V.U.Patil Arts and Late Dr.B.S.Desale Science College Sakri, Dist.Dhule

PRINCIPAL
TSS's Smt.V.U.Pat[illegible] Arts &
Late Dr.B.S.Desale Sci[illegible] College,
Sakri, Dist.Dhule PIN-424304

REVIEW OF RESEARCH

IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X

VOLUME - 8 | ISSUE - 6 | MARCH - 2019

# "१८८५ ते १९०४ या काळातील खानदेशातील स्वातंत्र्य चळवळीचे मुल्यमापन"

प्राचार्य डॉ. पी.एस.सोनवणे
श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै.डॉ.भास्कर सदाशीव देसले विज्ञान
महाविद्यालय साक्री ता.साक्री जि.धुळे.

- **राजकीय नेतृत्व :-**



[illegible] ते १९०४ या काळात खानदेशातील स्वातंत्र चळवळीचे नेवृत्व हे [illegible] हाती होते हे लक्षात येते. वकील वर्गाच्या नावाकडे ओझरता दृष्टिक्ष [illegible] व वकीली व्यवसायात ब्राम्हणवर्गाचेच वर्चस्व होते. खानदेशसारख्या [illegible] व थंड असलेल्या जिल्ह्यात वकीलवर्गाने प्रामुख्याने ब्राम्हणवर्गाने [illegible] जागृतीसाठी केलेले प्रयत्न निश्चितच स्तुत्य होते, किंबहुणा त्या [illegible] कर्तव्य होते. सुशिक्षित व सुसंस्कृत व राजकीय गतिविधीचे ज्ञान [illegible] हा एकमेव वर्ग होता . सर्व महाराष्ट्रा मध्ये हे चित्र होते. त्यामुळे [illegible]व्दारा किंवा राष्ट्रीय नेत्याव्दारा ज्या ज्या चळवळी उभारल्या गेल्या , [illegible] जनसामान्यापर्यंत पोचविण्याचे महत्वाचे कार्य या वर्गाने केले.

- **जनतेचा अहवाल :-**

जनतेचा प्रत्यक्ष सहभागाचा विचार केला तर सुरवातीला आशादायी चित्र दिसत नाही. अखिल भारतीय स्तरावरच जेथे जनतेच्या [illegible] विचार होत नव्हता, अशा स्थितीत खानदेशात ही गोष्ट घडणे दुरापास्त होते. इ.स.१८९५ नंतर लोकमान्य टिळकांच्या नेतृत्वाचा [illegible] सर्वत्र वाजू लागला , तेव्हापासुन जनतेच्या प्रत्यक्ष सहभागाचा विचार होवू लागला. लोकमान्य टिळकांच्या चळवळी जनताभिमुख [illegible] सर्वप्रथम जनतेला राष्ट्रीय व राजकीयदृष्ट्या जागृत करणे आवश्यक होते. त्यादृष्टीने गणपती-उत्सव व शिवाजी उत्सव सार्वजनिक [illegible] करण्याची कल्पना त्यांनी साकार केली. खानदेशातील स्थानिक नेत्यांनी ही कल्पना उचलून धरली . प्रारंभी धुळे व इतर एकदोन [illegible] उत्सव सुरू झालेले दिसत असले तरी पुढच्या काळात त्याची व्याप्ती वाढली . १८९६ चा दुष्काळ असो किंवा प्लेगची आपत्ती असो- [illegible] निर्देश दिल्याप्रमाणेच खानदेशात काम होत होते. १८९६ च्या दुष्काळात तालुका स्तरावर सभा घेऊन, एजन्ट नेमून पध्दतशीर [illegible] करण्याचा प्रयत्न झाला. सारामाफीच्या प्रश्नावरून दोन-अडीच हजार शेतकऱ्यांचा मोर्चा धुळे येथील कलेक्टरांपुढे नेण्यात आला. [illegible] भेडसावणारे प्रश्न उचलुन धरणारे व त्याची सोडवणुक करण्यासाठी धडपड करणारे नेतृत्व जिल्हास्तरावर, तालुका स्तरावर निर्माण [illegible].

- **नेत्यांची विश्वासनीयता :-**

कोणत्याही चळवळीला जनतेचा प्रतिसाद हा नेत्याच्या विश्वसनीयतेव्दारा प्राप्त होत असतो. अशी विश्वसनीयता निर्माण करण्यात [illegible] इ.स.१८९५ नंतरच्या काळात यश येऊ लागले होते. आपल्या सुखदुःखात सहभागी होणारे , विचारपुस करणारे काही नेते आहेत. [illegible] जनतेत निर्माण झाल्याने जनतेकडुन विविध चळवळींना प्रतिसाद मिळू लागला होता.

- **नेत्यांमधील सामंजस्याची भावना :-**

आधी राजकीय स्वातंत्र्य की सामाजीक सुधारणा या विषयावर बड्या नेत्यांमध्ये जो गदारोळ उडालेला होता त्याचा , अपवाद [illegible], खानदेशातील चळवळी वर परिणाम झालेला दिसत नाही. सरकार दरबारी वजन असलेले गोविंदराव गरूड किंवा धोंडो शामराव



PRINCIPAL
I.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule

गरूड तसेच लो. टिळकांच्या प्रेरणेने खानदेशात चळवळी उभारणारे नेते यांच्यात दुजाभाव आढळत नाही ; किंबहुना सामंजस्य आढळते जो तो आपआपल्या परीने एकमेंकांना सहकार्य करतांनाच आढळतात. न्या. रानडे व गोखले आदि नेत्यांबद्दल आदराची भावना होती. तशी नसती तर पुण्या-मुबंईकडे जी लठ्ठालठ्ठी चाललेली होती तसे चित्र खानदेशातही दिसले असते. तथापि खानदेशात नेमस्त नेतृत्वाचा प्रभाव आढळत नाही. सामाजिक सुधारणे विषयी कळकळ बाळगणारे लोक खानदेशातही होते. धुळ्याचे कोतवाल वकील हे सामाजिक सुधारणा विषयक परिषदेला हजर राहिलेले आढळतात. राजकीय स्वातंत्र्य की सामाजिक सुधारणा या दोन गोष्टींची गल्लत करू नये असाच सुर खानदेशात असावा. सामाजिक सुधारणेची परिषद राष्ट्रीय सभेच्या मंडपात भरवावी की भरवू नये याबद्दल इ.स.१८९४ च्या पुणे येथील राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनप्रसंगी जो वाद छेडला होता. त्या प्रसंगी लो.टिळकांची बाजू उचलून धरणाऱ्यांचाच खानदेशावर प्रभाव होता हे लक्षात येते. लोकमान्य टिळकांकडे वर्गणी पाठविता ती मुंबईला फिरोजशहा मेथा यांचेकडे पाठवावी असा प्रचार करणाऱ्याला खानदेशात प्रतिसाद मिळालेला दिसत नाही. धुळ्याने तर वर्गनिच जमविली नाही. सामाजिक सुधारणेची परीषद राष्ट्रीय सभेच्या मंडपाबाहेर घेण्याचा निर्णय जोपर्यंत होत नाही, तोपर्यंत वर्गणीच पाठवायची नाही असा निर्णय जळगावच्या सभेत घेण्यात आला. लोकमान्य टिळकांच्या राजकारणाचे प्रतिध्वनी खानदेशतही उमटत होते असे लक्षात येते.

- **लो.टिळकांच्या नेतृत्वाचा प्रभाव :-**

जी जी चळवळ लो.टिळकांनी सुरु केली, ती खानदेशने स्वीकारली , जोपासली, नव्हे ती वाढवली. राजद्रोहाच्या आरोपाखाली लोकमान्य टिळकांवर खटला सुरू होताच महाराष्ट्रात डिफेन्स फन्डाला मदतीचा ओघ सुरु झाला. खानदेशचेही योगदान त्यात होते. लो .टिळकांच्या तसविरीची विक्री करून मिळणारा पैसा डिफेन्सफंडाला पाठविण्याचा खटाटोप लो.टिळकांच्या प्रभावी नेतृत्वाचे निदर्शक लो.टिळक स्वत : "लॉ-क्लासेस" चालवीत असत. त्यामुळे अनेक वकील लॉ-क्लासेसमध्ये अभ्यास करुण पुढे आलेले आढळतात. अशा वकील विद्यार्थ्यांच्या मार्फत लो.टिळकांच्या राजकारणाचे प्यादे पुढे सरकले असावे. धुळ्याचे शं.श्री.देव व भुसावळचे वकील गोगटे हे तर लो.टिळकांचे नि:सीम चाहते होते. श्री.गोपाळ रावजी गोगटे, वकील भुसावळ यांनी लो.टिळकांकडे "दि आर्टिक होम इन दि वेदाज" या पुस्तकाचा लेखक म्हणून काम केले. 'ताई महाराज केस' मधील डिफेन्स लो.टिळकांच्या सांगण्यानुसार गो.रा.गोगटे व शं.श्री.देव यांनी तयार केला. ही महिती एवढ्यासाठी नमुद केली आहे की लो.टिळकांच्या प्रभावाखाली असलेले नेतृत्व खानदेशात तयार होत होते. शं.श्री. देवांनी सार्वजनिक सभेचा प्रतिनिधी या नात्याने खानदेशात आपली सेवा सुरू केली होती.

- **जनतेच्या मन:स्थितीचे प्रतिबिंब :-**

इ.स.१८९८ च्या प्लेगच्या धामधुमीत धुळ्यांतील काही लोक गावाबाहेर वस्तीसाठी गेले. त्याप्रसंगी झोपड्यातून गणेशोत्सव साजरे झाल्याचे कवि विनायकाच्या चरित्रात आढळते. १८९६ चा दुष्काळ, प्लेगची आपत्ती, रॅण्ड खुन , टिळकांची शिक्षा, चाफेकरांची फाशी या साऱ्या घटनांमुळे जनमत अस्वस्थ असणे स्वाभाविक होते.

- **राष्ट्रवादी भावनेचा प्रसार :-**

राष्ट्र, राष्ट्रवाद या संकल्पना तर सामान्य जनतेच्या आकलनाबाहेरच्या होत्या. सुशिक्षित पिढीला जाणीव असेल तेवढेच; पण त्याचा अविष्कार सुरवातीला तरी दिसुन येत नाही. इ.स.१८९५ नंतर शिवाजी उत्सव, गणेशोत्सव या सारख्या उत्सवाचे माध्यमातून जनतेत राष्ट्र भावना निर्माण व्हावी असा प्रयत्न झालेला दिसुन येतो.

"रामदासाचे विस्मरण म्हणजे महाराष्ट्राचे मरण" अशी श्रध्दा असणारे शं.श्री.देव जनतेसमोर रामदासाचा आदर्श ठेवतात. 'मराठा तितुका मेळवावा' याचा प्रसार आपल्या भाषणाव्दारे करतात. मनाचे श्लोक, रामरक्षा आदि गोष्टींचे विद्यार्थ्यांनी पठण करावे यासाठी तत्पर असतात. दासबोधावर व्याख्याने देतात. हा सगळा खटाटोप जनतेत राष्ट्रीय भावनेची ज्योत पेटवावी यासाठीच होता.

आंतरराष्ट्रीय स्तरावर घडणाऱ्या घटनांचाही उपयोग राष्ट्रीय भावणा जनतेत वाढीस लागावी यासाठी केला जाई. आशिया खंडातील चिमुकला देश जपान जीवनाच्या सर्व क्षेत्रात परिवर्तन घडवून आणून एक सामर्थ्यशाली सत्ता म्हणून उभा राहतो ही घटनाच चैतन्यदायी होती. राष्ट्रीय भावनेचे बाळकडू पाजणारी होती . शं.श्री.देव यांनी नंदुरबार येथे व धुळे येथे जपान या विषयावर भाषणें दिल्याचे उल्लेख आढळतात.मातृप्रेम व देशी उद्योगधंदाचा विकास याबाबतीत जपानचा आदर्श ठेवावा असा प्रचार ते करीत शं.श्री.देवांनी सत्कार्योत्तेजक सभेमार्फत जपानवर एक पुस्तक छापून प्रसिध्द केले.

रशिया-जपानमध्ये युध्द होणार की नाही हा सुध्दा एक चर्चेचा मुद्दा पुर्ण खानदेशात होता. गोपनीय खात्याच्या अहवालात डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट म्हणतात. "कापसाचे भाव फार तेजीत आहे. अमेरिकन युध्दाच्या वेळेपासून इतके भाव तेजीत कधीच नव्हते. रयत आपल्याजवळील कापसाचा साठा करीत आहे. युध्द झाले तर कापसाचे भाव वाढतील असा त्यांचा विश्वास आहे." जपान व रशिया आपल्यातील मतभे



TSS's Smt.V.U.Patil Arts and Late Dr.B.S.Desale Science Sakri, Dist.Dhule
PRINCIPAL
TSS's Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College,
Sakri, Dist.Dhule

मिटवतील की नाही याबाबतीत गुजराथी व्यापारी व कुणबी यांच्यातील चंडी (Chandi) या गावी झालेल्या संभाषणाचा उल्लेख करतात. अशी चर्चा पूर्व खानदेशात त्याकाळी होत असेल तर ती जनतेच्या जागृतीचेच लक्षण मानावे लागेल.

- **खानदेशातील क्रांतीकार्य :-**

खानदेशातील क्रातीकार्य हे बाल्यावस्थेत होते असेही लक्षात येते. व्यायामविषयक प्रवृत्ती कींवा मित्रमेळा सारख्या गुप्तसंघटनेच्या माध्यमातून तरूणांना क्रांतीकार्यात ओढण्याचे प्रयत्न सुरू झाले होते. त्यातुनचा शिस्तीचे व व्यवस्थित काम करणाऱ्यांची संघटना उभी राहिली. जिल्ह्याचे केंद्र असलेल्या धुळे या शहरी तरूण क्रांतीकारकांनी ते जाहीरनामे लावले , त्यावरून त्याकाळातील तरूणांच्या मनातील विचाराची दिशा कळते, देशासाठी सर्वस्व अर्पण करण्याची तयारी असलेल्या क्रांतीकारकांच्या या धडपडीतून ब्रिटिशविरोधी भावना निर्माण व्हावयास निश्चितच मदतच झाली.

**संदर्भ :-**


१. केसरी , पुणे दि.२ फेब्रुवारी १९०४
२. भारतीय इतिहास मंडळ पुणे , खंड- १ भाग -२ पु.क्र-२२
३. विनायकाची कविता-संग्राहक व संपादक प्रा.भ.से.पंडित पाचवी आवृत्ती १९५९ पु.क्र.-३३
४. पो.अ.इ.१९०२ परिच्छेद-६८७ पु.क्र.-२२१
५. पो.अ.इ.१९०२ परिच्छेद-८५८ पु.क्र.-२६९


T.S.S's. Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S. Desale Science College Sakri, Tal.Sakri,Dist.Dhule

PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule

Volume 8 (Special Issue 04)
January, 2018

ISSN-2230-9578

# Journal of Research and Development

A Multidisciplinary International Level Refereed Journal

COSMOS
IMPACT FACTOR
4.270

## UGC Journal list No. 64768



Editor : Dr. R. V. Bhole

PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

'Ravichandram' Survey No-101/1, Plot No- 23, Mundada Nagar,
Jalgaon(M.S.) 425102
Email – info@jrdrb.com Visit – www.jrdrvb.com

ISSN-2230-9578
COSMOS IMPACT FACTOR 4.270

Journal of Research and Development
**Volume 8 (Special Issue 04) January, 2018**

## INDEX


| अ. क्र. | पेपरचे नांव | लेखकाचे नांव | पेज नंबर |
|---|---|---|---|
| १ | Dr. Babasaheb Ambedkar Views on Agrarian Issues | Dr. Sandesh wagh, Asso. Prof.Dept.History, University of Mumbai, Mumbai | १ |
| २ | भारतीय कृषी सद्य:स्थिती, अव्हाणे व उपाय | डॉ.सुभाष पाटील, एस.एन.डी.टी.महीला विद्यापीठ पुणे | ६ |
| ३ | खानदेशातील प्राचिन, मध्ययुगीन व आधुनिक काळातील कृषी विकासाचा तुलनात्मक अभ्यास | डॉ.पी.एस.सोनवणे, साक्री | १३ |
| ४ | साहित्याची कृषी व ग्रामीण विकासातील भूमिका | प्रा.डॉ.वसुमती पुंडलीकराव पाटील, विमलबाई महाविद्यालय साक्री | १७ |
| ५ | उस पिकांसाठी उसाभोवती सिंचन पध्दती आणि कृषी विकास | प्रा.डॉ.एम.एम.सैंदाणे, सि.गो. पाटील महाविद्यालय साक्री | २० |
| ६ | ग्रामीण विकासात शेतमाल प्रक्रिया उद्योगाची भूमिका | डॉ.सुधाकर एल.जाधव, आदर्श महाविद्यालय निजामपुर | २३ |
| ७ | बहिणाबाई चौधरी यांच्या काव्यातील ग्रामीण व कृषी समाजदर्शन | प्रा.मिलिंद देवरे, आर.डी.देवरे महाविद्यालय म्हसदी | २५ |
| ८ | शेतकरी आत्महत्याची कारण मिमांसा | प्रा.ज्ञानेश्वर काशिनाथ भामरे, कला विज्ञान महाविद्यालय नगांव | ३० |
| ९ | मराठी साहित्यातील ग्रामीण व कृषी संवेदना | डॉ.हेमराज बिरारीस, उ.पा. महाविद्यालय दहिवेल | ३४ |
| १० | गोतावळा: स्वातं«योत्तर काळातील बदलत्या कृषी व ग्रामीण वास्तवाचे चित्र रंगवणारी कादंबरी | डॉ.प्रकाश श्रीराम साळुंके, सि.गो. पाटील महाविद्यालय साक्री. | ३६ |
| ११ | ब्रिटीश कालीन कृषी विषयक धोरण | प्रा.डॉ.संजय यशवंत गवळी, उ. पा. महाविद्यालय दहिवेल | ३८ |


PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

आजच्या काळाच्या संदर्भात विचार केला तर खेडयातील सर्व जनता शोषणाचा शिकार झालेले दिसतात. शोषणामध्ये जातीयता, अंधश्रध्दा, अज्ञान, दारिद्रय, निसर्गाची अवकृपा या सर्व घटकांचा समावेश होतो. अशा या शोषणाला नाकारणे, विरोध करणे हेच खरी कृषी आणि ग्रामीण संस्कृतीच्या साहित्यामागील भूमिका होय. अशा हया साहित्याला गौतमबुध्दांपासून, गाडगे बाबा, म. फुले ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशा पुर्वसुरींच्या तत्वज्ञानाची बैठक लाभलेली आहे. अशा साहित्याची मुल्ये म्हणजे समूहभाव, सत्य विश्वास, निसर्गसहवास होय. १९६० नंतर साहित्य विश्वामध्ये अनेक बदल दिसून येतात. पुढे जागतिकीकरण, खाजगीकरण आणि उदारीकरणामुळे सामाजिक जीवन ढवळून निघाले व ग्रामीण भारतातील ग्रामीण समाज परिवर्तनीय दिसत असला तरी मात्र व्यवस्थेने ग्रासलेला आहे. १९९० नंतरचे साहित्य ग्रामीण जीवनातील प्रश्नांचा उहापोह धांडोळा घेतांना दिसते. कारण बदलत्या सामाजिक, सांस्कृतिक तसेच राजकीय परिस्थितीचा प्रभाव परिणाम त्या-त्या ग्रामीण लेखकांवर झालेला दिसून येतो. जसे की, विकास योजना यांचा खेडयावर होणारा परिणाम, आधुनिकतेमुळे अनेक नविन प्रश्न ग्रामीण जीवनात निर्माण झाले. शेतीचे प्रश्न बाजुला राहिले. नवीनच बदललेले शेतीचे स्वरुप डोळयांसमोर येऊ लागले. शेतकऱ्यांच्या आत्महत्येची मुळं या बदलेल्या स्वरुपात दडलेली आहेत. असे अनेक प्रश्न परिवर्तनामुळे निर्माण झालेले आहे. त्याचे पडसाद साहित्यात उमटलेले आहेत ते म्हणजे झालेल्या परिवर्तनामुळे  ग्रामीण जीवन स्वाभिमान, आत्मभान हिरावून बसलेले आहे. असे भान अवतरते. ते साहित्याच्या विविध प्रकारांमधून मग ती ग्रामीण कथा असो, ग्रामीण कादंबरी असो किंवा ग्रामीण कविता असो. ग्रामीण कादंबरीने कलात्मकतेपेक्षा वास्तववादी होणे आवश्यक आहे. नविन पिढी आत्मभान सभर उभी राहण्यासाठी सामाजिक राष्ट्रीय जाणीव त्यांच्यामध्ये निर्माण होण्यासाठी ग्रामीण कादंबरीने आपली भूमिका पार पाडली पाहिजे. ग्रामीण कथेमध्ये इतर घटकांबरोबरच नातेसंबंध, कौटूंबिक धागे देखील रेखाटले गेले आहे. उदा.- रा.रं. बोराडे यांचा 'नातीगोती' कथासंग्रह होय त्या संदर्भात एकनाथ पगार यांचे मत 'रा.रं. बोराडे यांनी कथांमध्ये ग्रामीण स्त्री, स्त्रीची सोशिकता, मुल्यांवरचा विश्वास, शोषण इ. चित्रण केलेले आहे. नवजागृत स्त्रीपात्रांपेक्षा परंपरागत पुरुषी वर्चस्वांना बळी पडणाऱ्या स्त्रियांकडे बोराडे करुणतेने पाहतात.'  त्याचप्रमाणे आनंद यादव यांच्या कथांमधून देखील मानवी सर्जनशीलतेचा, नैसर्गिक संवेदनाचा विविध पातळयांवर शोध घेतलेला दिसून येतो. आनंद यादव यांच्या झोंबी, नांगरणी, घरभिंती, काचवेल सारख्या आत्मचरित्रात्मक कादंबरीमुळे साहित्य प्रांतात वेगळेपण प्रविष्ठ झाले. त्यानंतर वासुदेव मुलाटे यांची ग्रामीण साहित्यनिर्मिती केली. त्यामध्ये ग्रामीण जीवनातील मुल्यांची घसरण, प्रगती अधोगती, शेतकऱ्यांची दयनीय अवस्था इ. अनेक आशय मांडले त्याचप्रमाणे ग्रामीण कविता ही शोषणाचा निषेध  व्यक्त करते. परंतू त्यापुढे जाऊन ग्रामीण कवितेने त्या शोषणामागील कारणांचा देखील शोध घेतलेला आहे. त्यामधून बाहेर पडण्याचा मार्ग कविता शोधतांना दिसते. व्यापक समाजभान सभर अशी ग्रामीण कविता प्रखर वास्तववादी दिसते. वास्तव रेखाटतांना लोकमानस महत्वपूर्ण असते. कृषिकेंद्रीत समाजरचनेचे निसर्ग सन्मुखत्व एकूण जीवनरचनेलाच आकार देणारे असल्यामुळे ग्रामीण माणसाचे स्वतःचे असे एक लोकमानस तयार होते. अशा या लोक मानसाचे निसर्गाशी असलेले अतूट नाते ग्रामीण कवितांमधून शब्दबध्द होत असते. एकूण ग्रामीण साहित्यामध्ये आविष्कारासाठी भाषा महत्वपूर्ण ठरते. तेव्हा "साहित्याच्या कोणत्याही प्रकारात भाषा  हे माध्यम मोठे वैशिष्टयपूर्ण आहे. ही वैशिष्टपूर्णता ती ज्या समाजात बोलली जाते. ज्या संस्कृतीचा तिला सततचा संदर्भ असतो, ज्या स्त्री-पुरुषांच्या वापरात ती नेहमी असते. त्या सर्वांचे सत्व तिला लाभलेले असते. तसे साहित्यिक जेव्हा तिला वापरु लागतो तेव्हा कलावंताच्या व्यक्तिमत्वाचा संस्कार होतोच परंतू ती भाषा आपले सत्व आणि व्यक्तिमत्व मात्र सोडायला तयार नसते." विशेषतः बदलत्या मानसिकतेचा वेध त्या साहित्यांमधून घेतला जातो. तंत्रज्ञानाने ग्रामीण माणसाच्या मनाचा ताबा घेतला त्या विषयी माधव पुरवाड लिहितात, संध्या शेतकऱ्यांनी नवीन संशोधनाचा, बदलाचा स्वीकार केला तो अपव्यहार्य आहे. अत्यंत महागडी खते, बी-बियाणे (संकरीत) यामुळे उत्पादन वाढले परंतू खर्चाच्या पटीने वाढले नाही. उत्पादन आणि खर्चाची घडी विस्कटली आणि त्यापेक्षा ही धोकादायक म्हणजे जागतिकीकरणाच्या चक्रव्यूहात सापडलेला शेतकरी व्यावसायिकदृष्टया परावलंबी झालेला आहे. "अर्थात ग्रामीण जीवनातील अनेक प्रश्न साहित्याचा विषय होतात."

एकुण व्यवस्थेने ग्रामीण माणसांवर अनेक बाबतीत अन्याय केलेला आहे. साहित्यातून काही ग्रामीण जीवनाचे विनोद, तर काही वेगळया अंगाने चित्र रेखाटलेले गेलेले दिसते. साहित्य प्रकार हा मानवनिर्मित असतो. त्याला एका ठराविक संकल्पना दीर्घकाळ राहत नसते. मानवाच्या विकासाबरोबर, प्रगती बरोबर संकल्पनेतही विकास होत जातो. त्यामध्ये ग्रामीण संवेदनशीलतेचे नवे परिमाण डोकावत असते. ग्रामीण साहित्याची चळवळ समृध्द झाली व त्यातून डोकावणारी  कृषीव्यवस्था ग्रामीण विकास या संदर्भात पुर्वसुरींची परंपरा महत्वपूर्ण आहे. त्या संदर्भात डॉ. कैलास सार्वेकर यांचे मत "ग्रामीण साहित्याची चळवळ कोणाही एका व्यक्तीच्या विचारांची व कार्याची प्रेरणा  स[illegible] नाही. कारण विचार आणि कार्य हे परिवर्तनशील असतात. तथापि [illegible] त्यांनी शेतकरी, कष्टकरी, पिडीत, ग्रामीणांच्या सामाजिक व शैक्षणिक

TSS's Smt. V.U.Patil Arts and Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Dist.Dhule

PRINCIPAL
TSS's Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College,
Sakri, Dist.Dhule PIN-424304

Journal of Research & Development
Vol. 08 (Special Issue 04) January 2018, (ISSN-2230-9578)
UGC Journal List No. 64768, COSMOS IMPACT FACTOR- 4.270

# साहित्याची कृषी व ग्रामीण विकासातील भूमिका

**प्रा.डॉ. वसुमती पुंडलिकराव पाटील,** श्री.यु. पाटील कला व के.डॉ. बी.एस. देसले विज्ञान महाविद्यालय, साक्री, ता.साक्री, जि. धुळे-४२४३०४

**गोषवारा :-** साहित्य आणि समाज परस्परावलंबी असतात. समाजातील वास्तव प्रश्नांची मांडणी साहित्यामध्ये व्यक्त होत असते. समाज वास्तवाची मांडणी करतांना, चित्रण करतांना मग ते समाजचित्रण आदिवासी, ग्रामीण, शहरी, दलित असे कोणते ही असले तरी मात्र त्यातील संवेदना, चढ-उतार, विकास-व्यवस्था यांचा आलेख साहित्यातून व्यक्त होत असतो. कारण खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण या धोरणांचा प्रभाव समाजजीवनावर झालेला दिसून येतो. दुसरीकडे विज्ञान-तंत्रज्ञानाने केलेल्या प्रचंड प्रगतीने गाव माणसांचा चेहरामोहराच बदललेला आहे. मनुष्य जीवन हे गुंतागुंतीचे झाले आहे. अज्ञान, अंधश्रध्दा, शोषण, बेरोजगारी, नैराश्य यांच्यासोबत गावपातळीवरील राजकारण, व्यसनाधीनता, जातीयता, धर्मांधता, वाढती महागाई, सावकारी इ. अनेक बाबींमुळे ग्रामजीवन ढवळून निघालेले आहे. ग्रामजीवनातील महत्वपुर्ण घटक कृषीव्यवस्था होय. ग्रामीण विकासाच्या मागे कृषी व्यवस्था असते. तर त्या ग्रामीण विकास व्यवस्थेचा प्रमुख घटक शेतकरी ठरतो. त्या दृष्टीने ग्रामीण जीवन स्पष्ट करणे हा ग्रामीण साहित्याचा प्रमुख उद्देश दिसून येतो. ग्रामीण विकासामध्ये अर्थात प्रगती, फायदे आणि तोटे दोघांचे वास्तव चित्रण साहित्यामधून अवतरत असते. यापलीकडे असे ही दिसते की, ग्रामीण जीवनाचा काही भाग असा देखील आहे की, त्याचे चित्रण साहित्यामध्ये आढळत नाही जीवनाचा सर्वस्पर्शी चित्रणामुळे साहित्य चिरंतन ठरत असते. साहित्य हे मात्र जीवनाला बळ पुरवित असते. भारत हा कृषि प्रधान देश आहे. अशा वेळी साहित्यातून कृषी-ग्रामजीवन-ग्रामविकास- मानवीमूल्य त्यातील चढ-उतार, व्यवस्था या सर्व घटकांची गोळा बेरीज साहित्यातून प्रतिबिंबित होत असते.

**मुख्य मुद्दे :-** ग्रामीण जीवन - कृषि वास्तव - ग्रामविकास, साहित्याचे आविष्करण व समाज

**संशोधन पध्दती :-** संदर्भग्रंथातील अध्ययन, संकलन, विश्लेषण पध्दतीनुसार विषयाचे विवेचन

आजच्या यंत्रनिष्ठ शहरी संस्कृतीपेक्षा ग्रामीण संस्कृती वेगळी आहे. ग्रामीण जीवन कृषिनिष्ठ आहे. नागर आणि कृषिजन हया जीवन पध्दती वेगवेगळया मूल्यव्यवस्था अंगीकरणाऱ्या आहेत. दोन्ही जीवन पध्दती मात्र परस्परपुरक आहेत. परंतू त्यांची मूल्यदृष्टी भिन्न आहे. कृषि निसर्गासह अवलंबून असल्यामुळे त्यांचे नाते अतूट आहे. ग्रामीण जीवन दर्शन रेखाटणाऱ्या साहित्याचा संबंध थेट महानूभव गद्य किंवा संत परंपरांशी जाऊन भिडतो. त्या संदर्भात डॉ. नागनाथ कोतापल्ले यांचे मत,- "ग्राम व्यवस्थेतील आपल्या स्थानाचा, व्यवसायाचा सर्व संतांनी नीटस् वापर अध्यात्म प्रकटीकरणासाठी केला आहे. येथे अध्यात्म प्रकटन हाच मुख्य हेतू असला तरी ग्रामीण व्यवस्था आणि ग्रामीण वास्तव, तसेच कृषी जीवनातील काही घटक या अनुषंगाने येऊन जातात. अर्थात पुसट का होईना, अजाणता का होइंना ग्रामीणत्वाच्या काही खुणा अभगसृष्टी मध्ये सापडतात."

शहरी संस्कृतीने ग्रामीण संस्कृतीवर एक प्रकारचा वेगळा ठसा उमटविण्याचा प्रयत्न केला. खेडयापाडयातील कृषि परंपरेतील प्रत्येक गोष्ट अज्ञानी, मागासलेली, बुरसटलेली, कोणतेही मूल्ये नसलेली किंवा कमी मूल्यांची आहे असे मानले. परंतू ही बाब योग्य नव्हती कारण कृषिजन व्यवस्थेमध्ये अंधश्रध्दा, दारिद्रय इ. गोष्टींसोबत काही सत्य त्यात महत्वपूर्ण भूमिका पार पाडत होते. त्यामध्ये सर्व प्रथम म्हणजे निसर्गांवर बाराबलुतेदारांसह जगणे हे दिसून येते. एकमेकांशी संबंध जोपासणे. केंद्रभागी मात्र शेतकरीच. अशा या कृषि व्यवस्थेमध्ये प्रत्येक नवीन पिढी बदलानूसार आपल्या अनुभव आणि ज्ञानाची भर घालत गेली. ग्रामीण जन आपल्या मौखिक परंपरा व्यक्त करतात. कीर्तनापासून ते लोककथा, तमाशा, गोंधळ इ. पर्यत अर्थात लोकसाहित्याच्या माध्यमातून ग्रामजीवन परंपरागत व्यक्त झाले. आज ही लोकसाहित्यातील लोकगीतांमध्ये श्रमहारी लोकगीतांचा विचार केला तर कृषि विषयक सर्व कामे करीत असतांना श्रमपरिहारासोबत, आनंद, वेग-उत्साह या सर्व गोष्टी त्यामुळे साध्य होतात असे म्हणता येईल. कृषि व्यवस्थेमध्ये श्रमनिष्ठा, समूहासोबत राहण्याचा आग्रह-भान, निसर्गाची जोपासना, उदारता-विश्वासाने जगणे अशा मुल्यांचा साठा दिसून येतो. शहरी संस्कृती मात्र या सर्व बाबींपेक्षा मुळातच भिन्न असते. जगण्याची मूल्ये-व्यवस्था यांची वेगळीच असते. शहरी संस्कृती ज्ञान सभर, श्रेष्ठ, व्यक्तीकेंद्री अपेक्षापुर्ती साठी सतत धावणारी. अशा संस्कृतीमध्ये साहित्य निर्माण होऊ लागले त्यानंतर खेडयांमध्ये नविन पिढी आपल्या ग्रामीण जीवनाचे चित्रण रेखाटू लागली. परंतू ते लेखन, साहित्य मात्र शहरी वाचकांना आवडेल अशा स्वरुपाचेच येत गेले.

PRINCIPAL
T.S.S's.Smt V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

Journal of Research & Development
Vol. 08 (Special Issue 04) January 2018, (ISSN-2230-9578)
UGC Journal List No. 64768, COSMOS IMPACT FACTOR- 4.270

परिवर्तनाच्या दृष्टीने जे महनीय कार्य केले आहे त्यांचे ऋण मात्र ही चळवळ मान्य करते." याच कारणामुळे असे मांडता येईल की, ग्रामीण साहित्य एककल्ली झाले नाही.

एकंदरीत साहित्य मनुष्याला प्राप्त झालेल्या वाणीच्या शक्तीचा एक आविष्कार असुन ती शक्ती प्रकट करणे साहित्यिकांचे कर्तव्य होय. साहित्य निर्मिती व साहित्यिकाचे व्यक्तीमत्व हे शेवटी जे आविष्कृत करीत असतात. त्याचे दूरवर परिणाम होत असतात. समाजजीवन कोणतेही असो त्यातील व्यवस्था आणि त्याच्या विकासासाठी साहित्याची भूमिका महत्वपूर्ण असते.

---

**संदर्भग्रंथ सुची :-**

- कोत्तापल्ले नागनाथ : 'ग्रामीण साहित्य स्वरुप आणि शोध- स्वरुप प्रकाशन औरंगाबाद, तृतीय आवृत्ती-२००६
- पगार एकनाथ : म.सा.प. खंड-७, भाग-२, पृ.-४५२, २०१०.
- पुरवाड माधव : ग्रामीण साहित्य व समाज दशा आणि दिशा - सर्वधारा संपा. सुखदेव ढाकणे - मार्च २००८.
- यादव आनंद : ग्रामीण साहितय स्वरुप आणि समस्या, पृ.-८४-८५
- सालेकर कैलास : ग्रामीण साहित्य चळवळीची सामाजिक आणि शैक्षणिक पार्श्वभुमी (साहित्य : ग्रामीण आणि दलित संपादक डॉ. ईश्वर नंदपूर, विषय प्रकाशन, नागपूर)

PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

Vidyawarta UGC Jr.No.62759 UGC Approved Refereed Journal

# Vidyawarta®

Issue-21, Vol-10, Jan. to March 2018
International Multilingual Research Journal

Editor
Dr.Bapu G.Gholap

6th Anniversary Celebrations 2018

www.vidyawarta.com

PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

13) INCLUSIVE GROWTH AND SOCIAL DEVELOPMENT IN INDIA
**Dr. Ram Narain Meena—Dr. Rajesh Kumar Jangir, Jaipur** || 66

14) Variety of Internet usage among the youth in Kanpur: A Sociological Study
**Poornima Shukla, Varanasi** || 72

15) Impact of Social media on Indian Youth: A sociological study of college students
**Anurag Singh, Etawah-UP.** || 74

16) The Out Break of the Revolt of 1857 in the Districts of Ambala & Thanesar
**Karan Singh, Chandigarh** || 77

17) Modernization in relation to Values among Graduate students of Tehsil Abohar
**Dr. Susheela Narang, Abohar** || 82

18) India in the K-Economy
**Nitin R. Tatte, Amravati** || 86

19) जागतिकीकरणाचा शेती व उद्योगावरील परिणाम
**प्रा.डॉ.मोहोकार हरिहर शिवदास, मुदखेड जि.नांदेड** || 89

20) माहिती लेखापरीक्षण
प्रा.भगवान रा.डोके, वाळुज, औरंगाबाद. || 92

21) स्त्री सक्षमीकरण आणि लैंगिक समता
डॉ. राजेश्री एन. कडू, ता.नरखेड, जि.नागपूर || 96

22) भारतातील स्त्री गुन्हेगारीचा अभ्यास
**प्रा.भारती शंकरराव कोल्हे, नाशिक** || 99

23) काश्मीर प्रश्न : भारत-पाकिस्तान संघर्षाचा केंद्रबिंदू
**डॉ. गुलाब हरी निकुंभ-प्रा. दिनेश दयाराम माळी** || 100

24) जळगांव जिल्ह्यातील चोपडा शेतकरी सहकारी साखर कारखाना लि. चहार्डी याचे आर्थिक विकासातील योगदान.
**प्रा.गोपाल जगन्नाथ पाटील, ता.चोपडा जि.जळगाव** || 104



www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

T.S.S's.Smt.Y.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

...ा गुन्हेगारीचा कलंक लागतो.

**विघटित कुटुंब :**

स्त्री गुन्हेगारीमध्ये तिची कौटुंबीक पार्श्वभूमी महत्त्वाचे ...ते. आई वडिलांचा घटस्फोट, आईकडून छळ, घरातील संघर्ष ...न मुली स्त्रिया नैसर्गिक प्रेमाला मुकतात व विपणगमनाकडे अथवा ...गारीकडे वळतात.

**लैंगिक-अनैतिक संबंध :**

परपुरूषाशी निर्माण झालेले अनैतिक संबंध, कुमारी माता, ...हत्या, पतीचा खून, चोऱ्या या प्रकारचे गुन्हे करण्यामागे अनैतिक ...ध कारणीभूत ठरतात.

) **कुसंगत :**

चांगल्या संस्कारावर अनेक गोष्टी अवलंबून असतात. ...टुंबीक वातावरण जर दूषित असेल, पत्नीकडे दुर्लक्ष होत असेल, ...ची शारिरीक गरज योग्य त्या मार्गाने पूर्ण होत नसेल तर अशा ...ळी स्त्रिया गुन्हेगारी क्षेत्राकडे पावले टाकतात.

तसेच घटस्फोट, परित्याग, फसवणूक, श्रीमंतीची अभिलाषा ...ा सर्व गोष्टी स्त्री गुन्हेगारीशी संबंधीत आहेत.

...या सर्व गोष्टीतून, गुन्हेगारीतुन स्त्रीला मुक्त करायचे असेल ...र स्त्री शिक्षणाचा विस्तार करणे गरजेचे आहे, कुटुंबात समान दर्जा ...स्थान मिळणे गरजेचे आहे, नोकरीत समान संधी देणे गरजेचे आहे, ...स्त्री जाचक रूढी, परंपरा, हद्पार करणे गरजेचे आहे, आर्थिक क्षेत्रात ...तिला स्वायत्ता देणे गरजेचे आहे, तसेच राजकारणात तिला शोभेचे ...बाहुले न बनवता जीवंत सहभाग असणे गरजेचे आहे.

**संदर्भ सूची**

१) प्रा.वेदप्रकाश, प्रा.घोटे-भारतीय सामाजिक समस्या आणि अपराधशास्त्र

२) स्त्रोत : "क्राईम इन इंडिया" १९९८ पृष्ठ २७१

३) Ghosh Shubhra–Female Criminals in India

❑❑❑



23

# काश्मीर प्रश्न : भारत-पाकिस्तान संघर्षाचा केंद्रबिंदू

**डॉ. गुलाब हरी निकुंभ**
(विभाग प्रमुख-संरक्षण व सामरिक शास्त्र विभाग)
प्रताप महाविद्यालय, अमळनेर, जि. जळगांव

**प्रा. दिनेश दयाराम माळी**
(विभाग प्रमुख - संरक्षण व सामरिक शास्त्र विभाग)
कै.श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व
कै. डॉ. बी. एस. देसले विज्ञान महाविद्यालय, साक्री, जि. धुळे

**प्रस्तावना :-**

भारत आणि पाकिस्तान यांच्या संबंधातील अतिशय ज्वलंत आणि धगधगता संवेदशील मुद्दा म्हणजे काश्मीर होय. संपूर्ण जगाचे लक्ष या मुद्यावर वेळोवेळी केंद्रित झालेले दिसुन येते. भारत-पाकिस्तान संबंधातील कळीचा मुद्दा काश्मीर प्रश्नच राहिलेला आहे. भारतीय स्वातंत्र्य आणि पाकिस्तानची निर्मीती पासुनच काश्मीरचा प्रादेशिक विवाद वाढतच राहिला आहे. विशेष म्हणजे आतापर्यंत अनेक लहान-मोठे संघर्ष व काश्मीर साठी तीन मोठी युध्दे भारत पाकिस्तान दरम्यान झालेली आहेत.

भारतीय संघराज्यातील २८ राज्या पैकी जम्मू आणि काश्मीर हे एक राज्य आहे. "भौगोलिक दृष्ट्या काश्मीरचे तीन विभाग आहेत. १) जम्मू २) काश्मीर खोरे ३) लडाख. जम्मू काश्मीरचे एकूण क्षेत्रफळ २,२२,२३६ चौरस कीलोमीटर आहे."१ प्रशासकीय दृष्ट्या या राज्याचे जम्मू, कठुआ, उधमपूर, डोडा, पुंछ-राजोरी, श्रीनगर, अनंतनाग, बारामूल्ला, लडाख असे विभाग करण्यात आले आहेत. जम्मू काश्मीरच्या तीनही भागातील हवामान भिन्न आहे तसेच सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक भिन्नता दिसून येते.२ विशेष करून हिंदु, मुस्लिम व बौध्द धर्मियांचे वास्तव्य या प्रदेशात अधिक प्रमाणात आहे. सध्या काश्मीरचे खोरे, जम्मूचे क्षेत्र आणि लडाख हे भारतीय अधिपत्याखाली आहे. आदिवासी क्षेत्र पाकिस्तानच्या अधिपत्याखाली आहे. काही

T.S.S's Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule
PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule





पर्वतीय क्षेत्र पाकिस्तान मध्ये तर काही भारतात आहे.३ १९४७ मध्ये आक्रमण करुन जो भाग पाकिस्तानाने ताब्यात घेतला होता त्याला 'पाकव्याप्त काश्मीर' किंवा 'आझाद काश्मीर' असे म्हटले जाते.

भारत आणि पाकीस्तान यांच्या दरम्यान काश्मीर प्रश्नामुळेच आजपर्यंत १९४७-४८, १९६५, १९७१ आणि १९९९ या वर्षामध्ये युद्ध व संघर्ष झालेले दिसून येतात या युद्ध व संघर्षबरोबरच विविध सामंजस्य करार त्यात 'सिमला करार', 'आग्रा शिखर परीषद' त्याचबरोबर इतरही विविध बोलणी आणि चर्चाद्वारे काश्मीर प्रश्नाचे निवारण होऊ शकले नाही. वेळोवेळी भारत आणि पाकीस्तान यांच्यात अप्रत्यक्षरीत्या आणि प्रत्यक्षरीत्याही तिसऱ्या पक्षाने विविध पातळीवर महत्वाची भूमिका निभावली आहे विशेष करून भारत आणि पाकीस्तान या देशांदरम्यान सकारात्मक चर्चा व विश्वास बांधणीसाठी अमेरिकेने अप्रत्यक्ष केलेला हस्तक्षेप व अमेरिकेची भूमिका याबाबत दक्षिण आशियात शीतयुद्धोत्तर कालखंडात बरेचसे बदल झालेले निदर्शनास येतात.

भारत आणि पाकीस्तान यांच्यातील वादाचा मुख्य मुद्दा काश्मीरच आहे. काश्मीरसाठीच आजपर्यंत लहान-मोठी चार युद्धे लढली गेली. त्याचबरोबर दशहतवादालाही वेळोवेळी तोंड द्यावे लागत आहे. अर्थातच देशाच्या आर्थिक आणि सांस्कृतिक विकासाला जेवढा वेळ आणि यंत्रणा लागते तेवढी देणे शक्य होत नाही. याचाच नकारात्मक परिणाम राष्ट्रीय विकासावर होतो या दृष्टीने द्विपक्षीय चर्चेद्वारे अथवा तिसऱ्या पक्षकाराच्या सकारात्मक मध्यस्थीने आणि शांततेच्या मार्गाने काश्मीर प्रश्न सोडविता येईल याचा विचार करणे क्रमप्राप्त झाले आहे. सदर संशोधनातून तिसऱ्या पक्षकाराच्या भूमिकेतून आणि प्राधान्याने अमेरिकेच्या मध्यस्थीने हा प्रश्न कसा सोडविला जाऊ शकतो याचे महत्त्व दर्शविण्याचा प्रयत्न केलेला आहे. कारण अमेरिकेच्या मध्यस्थीने आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक संघर्ष संपल्याचे किंवा कमी झाल्याची अनेक उदाहरणे आहेत.

काश्मीरचे भारतात विलिनीकरण संदर्भात राजा हरिसिंह यांनी भारताचे शेवटचे गव्हर्नर जनरल लॉर्ड माउंटबॅटन यांना पत्र लिहिल्याचे संदर्भ मिळतात. त्या पत्रात त्यांनी म्हटले होते की, "साध्या वेशातील आफ्रिदी (वायव्य सरहद्दीवरील लढाऊ जमात) सैनिकांना अत्याधुनिक शस्त्रास्त्रांसह राज्यात घुसविण्यात आले आहे. त्यामुळे निर्माण झालेली गंभीर परिस्थिती पाहता भारताकडून मदत मागितल्याशिवाय कोणताही अन्य पर्याय मला दिसत नाही. परंतु माझे राज्य भारतीय संघराज्यात विलीन झाल्याखेरीज भारताकडून अशी मदत मिळणार नाही. त्यामुळेच भारतीय संघराज्यात सामील होण्याचा निर्णय मी घेतला असून सामीलनामा या पत्रासोबत जोडला आहे. तो तुमच्या सरकारने स्वीकारावा अशी माझी इच्छा आहे अन्यथा माझे राज्य व तेथील जनतेस आफ्रिदी मारेकऱ्यांच्या तोंडी देणे एवढा एकच पर्याय माझ्यापुढे आहे."४ या पत्रावर लॉर्ड माऊंटबॅटन यांनी त्वरीत उत्तर पाठविले की, पत्रात वर्णन केलेली विशिष्ट परिस्थिती पाहता तुमच्या राज्याचा भारतीय संघराज्यातील विलिनीकरणास मान्यता देण्याचा निर्णय आमच्या सरकारने घेतला आहे. सदर वरील पत्राच्या संदर्भावरून असे दिसते की काश्मीर हा कायदेशीररीत्या व अधिकृतपणे भारतात विलीन झाला आहे. असे असतांना देखील पाकिस्तान वारंवार दहशतवादी कारवायांच्या माध्यमाने, विविध राजनैतिक खेळी खेळून, जनमत चाचणीच्या नावे त्याचबरोबर अमेरिकेसारख्या विकसित व बलाढ्य देशाची चापलूसी करून त्याच्या मदतीने तसेच वेळोवेळी आंतराष्ट्रीय परिषदेत खोटे दावे करून काश्मीरवर अधिकार दाखविण्याचा प्रयत्न सातत्यापूर्ण करीत आलेला आहे.

काश्मीर समस्या ही भारत व पाकिस्तान यांच्यातील संघर्षाचा संबंधातील तणाव व चढ-उतार याचा मुख्य केंद्रबिंदू आहे. खर तर काश्मीर समस्या ही भारत व पाकिस्तान यांच्यातील प्रादेशिक विवादाचा भाग समजली जाते. काश्मीरचा प्रश्न हाच भारत पाकिस्तान संबंधातील महत्वाचा भाग १९४७ पासुन आजपर्यंत आहे. दोन्ही देशांच्या दृष्टीने काश्मीर प्रश्न प्रतिष्ठेचा व प्रादेशिक हिताचा मानला जातो. त्यामुळेच दोन्ही देशात तणावाचे व संघर्षाचे वातावरण कायम राहते. काश्मीर पाकिस्तानात विलिन व्हावा ह्या पाकिस्तानच्या सामील करुन घेण्याच्या घातपाती व आक्रमक प्रयत्नामुळे काश्मीर भारतात विलिन झाला आणि येथूनच खऱ्या अर्थाने काश्मीर समस्या उभी राहिली. "ऑक्टोबर १९४७ मध्ये पाकिस्तानने काश्मीर वर आक्रमण केले, तेव्हा महाराजा हरिसिंह मदतीसाठी भारताकडे धावत आले. भारताने मदतीसाठी विलीनीकरणाची अट घातली."५ पाकिस्तानला दुसऱ्यांदा त्यांच्या घातपाती कारवायामुळे १९७१ साली पराभवाचा सामना करावा लागला. "१९७१ साली आपल्या सैन्याने पाकिस्तानचा निश्चित पराभव करून 'बांग्लादेश' ची निर्मिती केली होती."६

भारताने बांग्लादेशची निर्मिती केली असे वरकरणी वाटत

ले तरी त्यामागे पाकिस्तान ने केलेल्या विविध दहशतवादी ावाया ही त्यास कारणीभूत आहेत कारण तसे पाहायला ीनकरणाच्या वेळेस जुनागढ, हैद्राबाद संस्थानांचा देखील वाद भवला परंतु "काश्मीर आणि जुनागढ व हैद्राबाद या दोन थानातील सर्वात महत्वाचा फरक म्हणजे काश्मीर हा एकमेव त आणि पाकिस्तान यांच्याशी प्रत्यक्ष क्षेत्रीय संपर्कात आहे. त्यामुळे ताच्या एक-राष्ट्र संकल्पेला पाकिस्तान प्रभावीपणे विरोध करत हे. काश्मीर हे एक रणांगण बनले आहे जेथे जुनागढ आणि हैद्राबाद नांना महत्व नाही."७ अर्थात पाकिस्तानने नाहक काश्मीर प्रश्नावरून रताशी हा वाद सतत सुरू ठेवला आहे. त्यामुळे भारताची काश्मीर षयक विचारधारा ही नैतिकतेला धरून आहे.

भारताची काश्मीर विषयक विचारधारा नैतिकतेला धरून सली तरी पाकिस्तानला काश्मीर हवे आहे कारण काश्मीरचे राजकीय व लष्करी दृष्टया विशेष महत्व आहे. काश्मीरच्या उत्तरेस ाराकोरम खिंड, मध्यभागी हिमालय पर्वत तर दक्षिणेस पीरपंजाल वंत असून या पर्वत श्रेणीमध्ये सुपीक व सपाट काश्मीर खोरे आहे. ाश्मीरच्या वायव्येस पाकिस्तान अफगाणिस्तान, सोव्हिएत रशियातून गळे झालेले कझाकस्तान व चीन यांच्या सीमा एकत्र येतात. त्यामुळे ाश्मीरचा भाग अत्यंत संवेदनशील असून जोझिला, खुंजेराब, गिलगीट ा खिंडी आणि नंदादेवी, नंगापर्वत हे लष्करीदृष्टया महत्वाचे आहेत. ाराकोरम व गिलगीट क्षेत्राचे महत्व भारताच्या दृष्टीने अधिक आहे. ाश्मीरचे भूराजकीय व सामरिक महत्व असल्या कारणाने अमेरिका शीतयुध्द काळात सोव्हिएत रशिया, चीन यांनाही आंतरराष्ट्रीय राजकारणासाठी या परिसरात आपले अस्तित्व असावे असे वाटत होते.८

भौगोलिक दृष्टया सियाचीन क्षेत्र व भारत पाकिस्तान दोघांच्या दृष्टीने महत्वाचे आहे. १९८६ पासून हा १०००० चौ.की. मी चा भाग भारताच्या ताब्यात आहे. सियाचीनचा भाग भारताच्या दृष्टीने महत्वाचा व युद्धनैतिक आहे कारण येथून पूर्वेस तिबेट सिकीयांग रस्ता अक्साई चीन मधून जातो. उत्तरेस खुंजेराब खिंडीतून जाणारा काराकोरम महामार्ग ५३७ मैलावर आहे.९ त्या रस्त्याने चीनला हिंदी महासागरा पर्यंत सहज पोहचता येते. एवढेच नव्हे तर या भागावरून सीमालगत असलेल्या विविध देशांवर व त्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवणे सहज सोपे आहे.

भारत व पाकिस्तान यांचे संबंध काश्मीर प्रश्नावर कायमच तणावयुक्त राहिलेले आहेत. असे असले तरी भारताने सातत्यपूर्ण पाकिस्तानशी संबंध सुधारण्याचा प्रयत्न केला आहे. भारताने वेळोवेळी पुढाकार घेतला असला तरी पाकिस्तानने कधीही सकारात्मक प्रतिसाद दिलेला दिसून येत नाही. भारत-पाकिस्तान मध्ये चार वेळा मोठी युध्दे झाली आहेत व चारही वेळा पाकिस्तानला पराभवाचा सामना करावा लागला. असे असले तरी भारत-पाकिस्तान संबंध सुधारण्याच्या दृष्टीने व काश्मीर प्रश्न मार्गी लावण्यासाठी भारत व पाकिस्तान मध्ये वेळोवेळी विविध सामंजस्य करार करण्यात आले. या करारांवर दोन्ही देशाच्या तत्कालीन प्रमुखांनी सह्या केल्या आहेत. हे करार विशेष करुन काश्मीर प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने करण्यात आले आहेत. ते करार खालीलप्रमाणे-

दिल्ली सामंजस्य करार, ताश्कंद करार (१९६६), सिमला करार (१९७२), काश्मीर सामंजस्य करार (१९७५) आणि लाहोर सामंजस्य करार (१९९९) इत्यादी करार हे काश्मीर प्रश्न शांततेच्या मार्गाने सुटावा व पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादी कारवायांना थांबविण्याच्या दृष्टिने केले गेलेले करार होते.

तत्कालीन भारतीय पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू व शेख अब्दुल्ला यांच्यात १४ जुले १९५२ रोजी एक विस्तृत सामंजस्य करार झाला. या करारातील घोषणांना पंडित जवाहरलाल नेहरू यांनी २४ जुले १९५२ ला जम्मू व काश्मीर राज्याच्या संविधान सभेत स्वीकृती प्रदान केली. या करारालाच 'दिल्ली सामंजस्य' करार असे म्हटले जाते.

भारत व पाकिस्तान चे १९६५ मध्ये युध्द झाले. हे युध्द थांबविण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रयत्न केले गेले असले तरी प्रामुख्याने रशियाच्या मध्यस्थीने ३ जानेवारी १९६६ रोजी युद्ध थांबविण्यात येऊन उभय राष्ट्रात चर्चा घडवून आणण्यावर भर देण्यात आला. त्यानुसार भारताचे पंतप्रधान लाल बहादुर शास्त्री आणि पाकिस्तानचे अध्यक्ष अयुबखान यांच्यात ताश्कंद येथे ३ जानेवारी १९६६ ला वाटाघाटी सुरु केल्या. रशियन नेतृत्वाने यामध्ये असे सुचविले की दोन्ही देशांनी ५ ऑगस्ट १९६५ च्या स्थितीत आपापले सैन्य परत घ्यावे. "जवळ-जवळ ६ दिवसांच्या चर्चेअंती १० जानेवारी १९६६ ला भारताचे प्रधानमंत्री श्री. लाल बहादुर शास्त्री व पाकिस्तानचे राष्ट्रप्रमुख यांनी या करारावर सह्या केल्या. तसेच दोघांनी सहमती दर्शविली की दोन्ही पक्षांना युद्ध बिराम आणि युद्धविराम रेषेचा आदर करायला हवा."१०





१९७१ च्या भारत-पाकिस्तान युध्द विरामानंतर युध्दातून निर्माण झालेल्या समस्या सोडविण्यासाठी 'सिमला करार' करण्यात आला. या करारातंगत "उत्तम शेजार, सलोख्याची आवश्यकता, दोन्ही देशांमधील शांततापूर्ण सहअस्तित्व, शाश्वत शांती, क्षेत्रीय एकात्मता, सार्वभौमत्वाबद्दल आदर आणि एकमेकांच्या बाबींमध्ये हस्तक्षेप न करण्याची वचनबद्धता होती."११ तसेच त्यानंतर अमेरिकेने ही मान्य केले की, "काश्मीर हा एक अतिरेकी प्रदेश झाला असून १९७२ साली झालेल्या सिमला करारानुसार भारत व पाकिस्तानने या समस्येचे निराकरण करावे."१२

१९७५ मध्ये तत्कालीन भारतीय पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी व शेख अब्दुल्ला यांच्यात काही अटींवर सहमती दर्शविण्यात आली आणि त्याच आधारावर १९७५ मध्ये शेख अब्दुल्ला काश्मीरचे मुख्यमंत्री बनले. हा करार काश्मीर सामंजस्य करार म्हणून प्रसिद्ध आहे.

भारत व पाकिस्तान या दोन्ही देशांनी लाहोर कराराच्या माध्यमाने आपापसातील संबंध विकसित करण्यावर भर दिला. तसेच विवादांचे निराकरण द्विपक्षीय चर्चेच्या माध्यमाने केले जाईल असे मान्य झाले. भारत व पाकिस्तान संबंधातील सुधारणाविषयक प्रयत्नांच्या बाबतीत 'लाहोर करार' एक महत्वाची ऐतिहासिक घटना मानली जाते. "आज काश्मीर प्रश्न दक्षिण आशियात स्फोटक झालेला आहे. जगाच्या पाठीवर भारत असा एकमेव देश आहे की, त्याच्या सभोवती दोन अण्वस्त्रधारी देश आहेत. त्यामुळे काश्मीर प्रश्न सोडविताना आपल्याला Confidence Building Measures (विश्वासबांधणी) आणि Track-II Diplomacy यांचा वापर करून या प्रश्नाकडे बघावे लागणार आहे."१३

निष्कर्षतः असे स्पष्ट करता येईल की, भारत आणि पाकिस्तान यांच्यात सुरू असलेला काश्मीर प्रश्न हा फक्त काश्मीरच्या विलीनकरणाशीच नव्हे तर अनेक असे घटक आहेत ज्यामुळे तो प्रश्न आजही धगधगत आहे. कारण काश्मीर चे सामरिक व भौगोलिक महत्व अनेक देशांच्या दृष्टीने त्यांच्या हिताचे असल्या कारणाने अनेक देश या विवादात अप्रत्यक्षपणे आपला हस्तक्षेप करत असल्या कारणाने हा विवाद अजुन ही सुटलेला नाही.

संदर्भ ग्रंथ :-

१) www.census२०११.co.in
२) चौधरी ए.पी., चौधरी अर्चना, भारताची अंतर्गत सुरक्षा, प्रशांत पब्लिकेशन्स जळगाव, २००८, पृष्ठ क्र. ३२.
३) पाटील मधुकर डॉ. अमृतकर सुनिल डॉ. समकालीन भारत, अथर्व पब्लिकेशन्स, जळगाव, २००८, पृष्ठ क्र. ७६.
४) बाजमाई संदिप - काश्मीरमधील स्वयंनिर्णयाचा प्रश्न (लेख)- दैनिक महाराष्ट्र टाईम्स, दिनांक २१/०९/१९९४
५) मोरे शेषराव, काश्मीरच्या विलीनीकरणाची शोकांतिका नायक कोण ? खलनायक कोण ? साप्ताहिक सकाळ, २१ ऑक्टोबर १९९५
६) माटे सनत कॅंटन - रिजनल स्टडी सेंटर, पुणे, भारत-पाकिस्तान संबंध : एक दृष्टिकोण केसरी रविवार पुरवणी, २ ऑगस्ट १९८१.
७) Singh Jasjit, Kargil 1999-Pakistans Fourth War for Kashmir, Knowledge World Publication, New Delhi, Pg. 4.
८) जाधव व्ही. वाय., भारताची अंतर्गत सुरक्षा, अथर्व पब्लिकेशन्स, जळगाव, २०१४, पृष्ठ क्र. ७६.
९) जाधव व्ही.वाय., भारताची राष्ट्रीय सुरक्षा, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, २०११, पृष्ठ क्र. २१५.
१०) A. Raju, Third-Generation Indian Perceptions of the Kashmir Issue, Regional Centre for Strategic Studies, Colombo, Srilanka, 2001. Pg. No. 15
११) Sawhney Pravin, The Defence makeover, Pg. No. 135
१२) Grover Verender (Edi.), The Story of Kashmir-Yesterday and Today, Deep and Deep Publication, New Delhi-1995, Pg.No. 664
१३) खरे विजय डॉ., जागतिक राजकारणात भारत, पृ. क्र. १५६

❑❑❑

S.S's. Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S. Desale Science College Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule
PRINCIPAL
S.S's.Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

ISSN 2394-5303

# International Multilingual Research Journal
# Printing Area

Issue-38, Vol-03, February 2018

Editor
Dr.Bapu G.Gholap

www.vidyawarta.com

T.S.S's. Smt. V. U. Patil Arts & Late Dr. B.S. Desale Science College Sakri, Tal. Sakri, Dist. Dhule

PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

14) Quasi Contracts in India : A bird'seye
**Rakesh Soni, Rajasthan** || 67

15) Taslima Nasrin's French Lover: A Kaleidoscopic View in Patriarchy as a...
**Reemani Verma, Central University of Jammu** || 70

16) प्रसिध्द ऐतिहासिक शिवकालीन घराणे-पानसंबळ'
**प्रा.सौ. कापशीकर धनश्री रामचंद्र , जि. सोलापूर** || 72

17) भारत आणि पाकिस्तान यांच्यातील काश्मीर प्रश्नात अमेरिकेची मध्यस्थीची भूमिका
**प्रा. दिनेश दयाराम माळी & श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील, जि. धुळे** || 74

18) किनवट तालुक्यातील आदिवासींची आर्थिक व सामाजिक स्थिती
**प्रा.डॉ.मोहोकार हरिहर शिवदास, जि.नांदेड** || 77

19) भारत आणि आदिवासी आंदोलने — एक ऐतिहासिक आढावा
**प्रा. डॉ. गौतम शंभरकर, चंद्रपूर** || 80

20)खाध्नदेशातील बैलगाडीचा व्यवसाय
**प्रा.डॉ. भामरे धाधाजी दगा, जि.धंदुरबार** || 87

21) धर्माचे बदलते स्वरुप : संक्षिप्त सामाजिक विश्लेषण
**प्रा.डॉ.बी.एन.कावळे, जि.औरंगाबाद** || 90

22) बौद्ध धर्मातील संघ प्रणाली
**प्रा.विष्णू ज. पवार, जि.वर्धा (महाराष्ट्र)** || 92

23) कादंबरीचे वाड:मयीन आकलन
**डॉ.राजेंद्र वडमारे, जि.अहमदनगर** || 95

24) निश्चलनीकरनाचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम
**श्री. विनायक मारोती वागतकर, रायगड** || 108

25) पंडिती साहित्याची वैशिष्टये
**प्रा.डॉ. शिवप्रसाद पंजाबराव वायाळ, ता.जि. वाशीम** || 112

26) निर्मल वर्मा के यात्रा संस्मरण "चीड़ों पर चाँदनी" की समीक्षा
**जय सिंह यादव, गोरखपुर** || 115

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com



T.S.S's Smt. V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

17

# भारत आणि पाकिस्तान यांच्यातील काश्मीर प्रश्नात अमेरिकेची मध्यस्थीची भूमिका

प्रा. दिनेश दयाराम माळी
विभाग प्रमुख - संरक्षण व सामरिक शास्त्र विभाग,

श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील
कला व कै. डॉ. बी. एस. देसले विज्ञान महाविद्यालय,
साक्री जि. धुळे

*************

काश्मीर प्रश्नाचे निवारण करण्यासाठी तिसऱ्या मध्यस्थांची भूमिका शीतयुद्धोत्तर आणि शीतयुद्धाच्या कालखंडात राष्ट्रीय आणि आंतराष्ट्रीय पातळीवर अतिशय महत्वाची मानली जाते. मध्यस्थी ही एखाद्या राष्ट्राची असो किंवा आंतरराष्ट्रीय संघटनेची असो त्याचे परिणाम भौगोलिक, राजनैतिक आणि परिस्थितीकदृष्ट्या वेगवेगळे पाहायला मिळतात. उदा. पश्चिम आशियातील, श्रीलंका आणि युरोपातील काही राष्ट्रांनी संघर्ष निवारण्यासाठी मध्यस्थाच्या भूमिकेद्वारे बरेचसे संघर्ष समाप्त झाल्याचे दिसून येते त्या दृष्टीकोनातून भारत आणि पाकीस्तान यांच्यामधील काश्मीर प्रश्नाचे संघर्ष निवारण करण्यासाठी मध्यस्थाची भूमिका अतिशय मोलाची ठरू शकते असे सर्वच स्तरावर मत व्यक्त होताना दिसत आहे. अशा वेळेस काश्मीर प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने मध्यस्थीची आवश्यकता आहे आणि त्या दृष्टीने भारत आणि पकिस्तान या दोन्ही देशांना हा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने अमेरिका हा देश जवळचा वाटतो.

मध्यस्थी म्हणजेच तिसऱ्या तटस्थ पक्षकाराची भूमिका होय. ज्यावेळी दोन घटकातील विशिष्ट प्रश्न अथवा संघर्ष द्विपक्षीय चर्चेने प्रयत्न करूनही सुटत नाही. त्यावेळेस दोन्ही घटकांच्या मान्यतेने व सहमतीने तिसऱ्या पक्षकारास मध्यस्थी करून संघर्ष सोडविण्याचा मार्ग अवलंबिला जातो. संघर्षरत दोन्ही घटकांना मध्यस्थावर पूर्ण विश्वास ठेवावा लागतो. मध्यस्थ दोन्ही पक्षांचे म्हणणे पूर्णपणे ऐकूण घेतो, पुरावे तपासतो. त्याचबरोबर दोन्ही घटकात सकारात्मक चर्चा घडवून आणतो. फायदे व नुकसान लक्षात आणून देतो. मध्यस्थाने घेतलेला निर्णय दोन्ही घटकांना योग्य वाटला तर मान्य करतात नाही तर अमान्य करतात. मध्यस्थाचा निर्णय दोन्ही घटकांवर बंधनकारक नसतो.

आजपर्यंतच्या भारत पाकिस्तान यांच्यातील द्विपक्षीय चर्चेने आणि शांतता बोलणीने हा प्रश्न मार्गी लागलेला नाही. त्यामुळे तिसऱ्या योग्य मध्यस्थी शिवाय हा प्रश्न सुटू शकत नाही हे समजून घेणे गरजेचे आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक संघर्ष मध्यस्थीने यशस्वीरित्या सोडविण्याची अनेक उदाहरणे आहेत. त्यामुळे तिसऱ्या पक्षकाराची मध्यस्थीस काही हरकत असण्याचे कारण नाही. त्यादृष्टीने प्रस्तुत शोध निबंधामध्ये मध्ये मध्यस्थीच्या विविध पैलूंचा अभ्यास करण्यात आला आहे. तसेच आंतरराष्ट्रीय मध्यस्थीचा ऐतिहासिक आढावा घेण्यात आला आहे. त्याचबरोबर काश्मीर प्रश्नाबाबत आजपर्यंत विविध राष्ट्रांनी केलेली मध्यस्थीची भूमिका विश्लेषित करण्यात आली आहे. तसेच भारत पाकिस्तान यांच्यातील काश्मीर प्रश्नासंदर्भात अमेरिकेच्या भूमिकेवर प्रकाश टाकण्यात आला आहे. काश्मीर प्रश्नासंदर्भात अमेरिकेच्या मध्यस्थीची भूमिका पाहण्याअगोदर जम्मू काश्मीरचे भौगोलिक महत्व पाहणे गरजेचे आहे.

भारतीय संघराज्यातील २८ राज्या पैकी जम्मू आणि काश्मीर हे एक राज्य आहे. "भौगोलिक दृष्ट्या काश्मीरचे तीष्न विभाग आहेत. १) जम्मू २) काश्मीर खोरे ३) लडाख. जम्मू काश्मीरचे एकूण क्षेत्रफळ २,२२,२३६ चौरस कीलोमीटर आहे."[१] प्रशासकीय दृष्ट्या या राज्याचे जम्मू, कठुआ, उधमपूर, डोडा, पूंछ-राजोरी, श्रीनगर, अध्नंतध्नाग, बारामुल्ला, लडाख असे विभाग करण्यात आले आहेत. जम्मू काश्मीरच्या तीष्नही भागातील हवामाध्न भिन्न आहे तसेच सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक भिन्नता दिसुध्न येते.[२] विशेष करुन हिंदू, मुस्लिम व बौध्द धर्मियांचे वास्तव्य या प्रदेशात अधिक प्रमाणात आहे. सध्या काश्मीरचे खोरे, जम्मूचे क्षेत्र आणि लडाख हे भारतीय अधिपत्याखाली आहे. अदिवासो क्षेत्र पाकिस्ता-नच्या अधिपत्याखाली आहे. काही पर्वतीय क्षेत्र पाकिस्ताध्न मध्ये तर काही भारतात आहे.[३] १९४७ मध्ये आक्रमण करुध्न जो भाग पाकिस्ताध्नाने ताब्यात घेतला होता त्याला 'पाकव्याप्त काश्मीर' किंवा 'आझाद काश्मीर' असे म्हटले जाते.

पाकिस्तान ने आतापर्यंत भारताचा किती भाग गिळंकृत केला याविषयी राज्यसभेत श्री. बी. सत्यनारायण रेड्डी यांनी प्रश्न केला होता की, आतापर्यंत किती भूभाग पाकिस्तान ने आणि चीन ने गिळंकृत केला आहे आणि तसेच पाकिस्तान ने किती भाग चीन ला देऊन टाकला आहे. या प्रश्नावर उत्तर देतांना विदेश मंत्री श्री. नटवर सिंह





यांनी सांगितले की, "आतापर्यंत ३८,००० वर्ग किलोमीटर क्षेत्र चीनकडे गैर मार्गाने आहे तसेच ७८,००० वर्ग किलोमीटर पाकिस्तानच्या ताब्यात आहे जे जम्मू-काश्मीरचे क्षेत्र आहे. तसेच पाकिस्तानने १९६३ ला चीन-पाकिस्तान बोलणी अंतर्गत चीनला पाकिस्तान अधिकृत काश्मीरचा जवळ-जवळ ८,१२० वर्ग किलोमीटर चा भाग असंवैधानीकरित्या देऊन टाकला आहे."[४]

जम्मू काश्मीरमध्ये एकूण तीष्न विभाग मिळूध्न २२ जिल्हे आहे. यात जम्मू विभागात १० जिल्हे, काश्मीर विभागात १० जिल्हे आणि लडाख विभागात दोध्न जिल्हे आहेत. भारत पाकिस्ताध्न संघर्षाचे मूळ कारण काश्मीर खोरे आहे. जम्मू आणि लडाखशी या समस्येचा तसा संबंध येत ध्नाही. सध्या भारताच्या अधिपत्याखाली जम्मू काश्मीरचे १,०१,३८७ चौरस कि.मी.क्षेत्र आहे तर पाकीस्ताध्च्या अधिपत्याखाली ७८,११४ चौरस कि.मी. क्षेत्र आहे.[५]

शीतयुद्धोत्तर कालखंडात भारत अमेरिका संबंध सातत्याने सुधारतांना दिसत आहेत. भारत आणि अमेरिकेत विविध संरक्षण, सहकार्य आणि आर्थिक करार झालेले आहेत. त्याचबरोबर दहशतवादाशी लढा देण्यासाठी अमेरिकेने भारताला पूर्ण समर्थन दिलेले आहे. या सर्व गोष्टींचा विचार करता सध्यस्थितीत काश्मीर प्रश्नाबाबत मध्यस्थी केल्यास भारताला नुकसान होईल असे वाटत नाही. भारत आणि अमेरिकेतील संबंधात नियमित चढ उतार पाहावयास मिळतात. त्यादृष्टीने काश्मीर प्रश्नाबाबत अमेरिकेच्या मध्यस्थीचा विचार करता काही मुद्दयांचा विचार करणे क्रमप्राप्त आहे या मुद्दयांचा आधारभूत विचार केला तर अमेरिकेच्या काश्मीर प्रश्नाबाबतच्या मध्यस्थीच्या भूमिकेचा अंदाज घेता येऊ शकतो.

वर्तमान परिस्थितीत भारताला अमेरिकेविषयी काय वाटते याचा विचार करणे आवश्यक आहे. सोव्हिएत संघाच्या विभाजनानंतर विश्वातील एक प्रमुख महासत्ता म्हणून अमेरिकेची ओळख आहे जागतिक महासत्ता या नात्याने भारतासाठी अमेरिकेची मैत्री अत्यंत फायदेशीर ठरणार आहे. भारतात मोठ्या प्रमाणावर बेरोजगारी आहे. याचे कारण भारतात गुंतवणुकीचे प्रमाण कमी आहे. भारताला आज आंतरराष्ट्रीय गुंतवणुकीची अत्यंत गरज आहे अमेरिका एक अतिश्रीमंत देश आहे. अमेरिकेनेत भारतात मोठी गुंतवणुक करावी यावर भारताचे लक्ष केंद्रीत आहे. भारताच्या मते भारत अमेरिका संबंध अधिक सुधारल्यास अशी गुंतवणुक अमेरिका करू शकते. अमेरिका औद्योगिक तंत्रज्ञानाची भूमी मानली जाते. औद्योगिक तंत्रज्ञानात प्रशिक्षित असलेल्या लोकांच्या माध्यमाने भारत अमेरिकेकडून विविध औद्योगिक व व्यावसायिक तंत्रज्ञान प्राप्त करू शकतो. अमेरिका एक असे राष्ट्र आहे जे व्यापारापासून ते ज्ञान विज्ञान व तंत्रज्ञान या सर्वच क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध आहेत. भारत या संधीचा उपयोग करु इच्छित आहे. अमेरिका एक धर्मनिरपेक्ष बहुराष्ट्रीय आणि लोकतांत्रिक देश आहे जे भारतासाठी अत्यंत उपयुक्त आहे कारण भारतही अशीच समाजव्यवस्था असलेला देश आहे. भारत आणि अमेरिकेत हे समान मुल्यात्मक गुणधर्म आहे. भारत आणि अमेरिका यांचे सामरिक आणि रणनितिक हित परस्पर एक दुसऱ्यांसारखेच आहेत. अमेरिकेत लाखो भारतीय वास्तव्य करुन आहेत. अर्थातच भारत सरकारवर अमेरिकेशी संबंध सुधारण्यासाठी हा मोठा गट भारतावर अप्रत्यक्ष दबाव टाकतो. दहशतवादाविरुद्ध लढण्यासाठी जेवढा संघर्ष भारताला करावा लागत आहे जवळपास तेवढयाच अडचणींचा सामना अमेरिकेलाही करावा लागत आहे. आंतरराष्ट्रीय दहशतवादाविरुद्ध लढण्याची विचारधारा व उद्देश दोन्ही देशांचे सारखेच आहेत. भारताच्या मते अमेरिकेच्या समर्थन व सहकार्यामुळेच पाकिस्तान भारताला महत्व देत नाही. त्या दृष्टीने पाकिस्तानला कमजोर करायचे असेल व एकटे पाडायचे असेल तर भारताला अमेरिकेची मैत्री वाढविणे आवश्यक आहे. अमेरिकेची जीवनशैली भारताच्या मध्यम वर्गाला निरंतर प्रभावित करत आहे. भारताच्या मते, अमेरिकेशी मैत्रीचे संबंध वाढल्यास अमेरिका पाकिस्तानपासून दूर जाईल आणि त्यामुळे अमेरिकेने जरी काश्मिर प्रश्नात मध्यस्थी केली तरी अमेरिकेची झुकती बाजू भारताकडे राहील याचा फायदा भारताला होईल.[६]

वर्तमान परिस्थितीत अमेरिकेचा दृष्टीकोन भारताविषयी कसा आहे यावरून अमेरिकेच्या भूमिकेचे विश्लेषण करता येईल. भारत एक जागतिक बाजारपेठ असलेला देश आहे. भारतात सर्वाधिक लोकसंख्या आहे. त्यामुळे भारताची उपभोक्ता क्षमता जगात सर्वाधिक मानली जाते. निश्चितच उपभोक्ता सामग्रीची खपत भारतीय बाजारात विनाअडचण आणि जलद गतीने होवू शकते. चीन च्या तुलनेने भारताची बाजारपेठ अमेरिकेसाठी जास्त उपयुक्त ठरेल. अण्वस्त्र शक्ती असल्यामुळे जगाच्या नकाशावर भारताने आपले जीवन अस्तित्व सिद्ध केले आहे. भारताने अण्वस्त्राविषयी निश्चित केलेली 'प्रथम वापर करावयाचा नाही आणि पुढे अण्वस्त्र चाचणी करायची नाही' (No first Use & No Further Test) ही भूमिका अमेरिकेला आवडली आहे. यामुळे अमेरिकेची भारताविषयी सहानुभूती वाढली आहे. अमेरिकेत मुळ भारतीयांची संख्या लाखात आहे. हा समाज भविष्यात नक्कीच अमेरिकन समाजावर आणि राजकारणावर प्रभाव टाकेल एवढया क्षमतेत असेल. खूप मोठी लोकसंख्या असलेला देश असला तरी भारतात तंत्रज्ञान व उद्योग आधारीत विकासाच्या शक्यता मोठ्या प्रमाणावर आहेत. अमेरिका भारताला आपली अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित व्यवसायाची व उद्योगाची उपयुक्त बाजारपेठ मानतो.



PRINCIPAL
Smt. V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

भारतात अत्यंत कमी किमतीवर प्राप्त होवू शकते यात अमेरिकेला मोठ्या प्रमाणावर आर्थिक फायदा होण्याबरोबर औद्योगिक विकास व स्थिरता प्राप्त करता येवू शकते. याची जाणीव अमेरिकेला आहे. भारताची धर्मनिरपेक्षतावादी धोरण आणि अपेक्षाकृत स्थिर लोकतांत्रिक राजनिती अमेरिकेला आवडते. सामाजिक व सांस्कृतिक संघर्षाचे वातावरण न दिसता अमेरिकेला भारतात विविधतेत एकता आणि सामाजिक व सांस्कृतिक सामंजस्य दिसून येते. दक्षिण आशियातील एक शक्तीशाली आणि मोठी बाजारपेठ असलेला देश म्हणून भारताची ओळख आहे. अमेरिकेला दक्षिण आशियात आपले पाय घट्ट रोवायचे असतील तर भारत याबाबतीत अमेरिकेला मदत करू शकतो. अमेरिका आणि भारताचे सामरिक आणि रणनितीक हित परस्परांशी मिळते जुळते आहेत. बहुभाषिक आणि बहुधार्मिक भारतीय समाज अमेरिकन लोकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू बनला आहे. भारतातील १५ ते २० करोड इंग्रजी बोलणाऱ्या मध्यमवर्गीय समाजाला अमेरिकन जनता आपला मित्र समजते. रशियाची सद्यपरिस्थिती अत्यंत खराब आहे. यामुळे भविष्यात चीन अतिशक्तीशाली तथा महाशक्ती बनू शकतो. अर्थातच शक्ती संतुलनासाठी अमेरिकेला भारताशी मैत्री करणे गरजेचे आहे. अमेरिका एक असा देश आहे ज्याची कोणतीही प्राचिन परंपरा नाही आहे. याउलट भारत अतिप्राचीन संस्कृती व परंपरा असलेला महत्वपूर्ण देश आहे. यामुळे अमेरिकेसारखे नवीन राष्ट्र भारतासारख्या प्राचीन सभ्यता असलेल्या देशाशी समन्वय साधण्याचा नक्कीच प्रयत्न करेल.[७]

वरील दृष्टीकोनावरून हे स्पष्ट होते की, सर्व दृष्टीने भारत हा अमेरिकेसाठी पाकिस्तान पेक्षा अधिक उपयोगी देश आहे यामुळे अमेरिका कोणत्याही कारणास्तव भारताशी संबंध तोडू शकत नाही अथवा संबंधात तणाव निर्माण होईल असे वागणार नाही याचा फायदा काश्मिर प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने भारताला करता येवू शकतो अमेरिकेच्या लक्षात हे आणून देणे गरजेचे आहे की, काश्मिर भारतात नियमानुसार विलीन झाला आहे व काश्मीर भारताचा अविभाज्य घटक आहे. त्याचबरोबर पाकिस्तानचे आंतरराष्ट्रीय दहशतवादाला असलेले समर्थन, काश्मीरमधील बेकायदेशीर घुसखोरी आणि काश्मीर मधील पाकिस्तान करत असलेला हिंसाचार इत्यादी बाबी अमेरिकेला भारताने पटवून देणे गरजेचे आहे. असे झाले तर अमेरिकने काश्मीर प्रश्नात मध्यस्थी केली तरी फायदा भारतालाच होईल.

भारताबरोबर सहकार्य आणि मैत्री वाढविण्यात अमेरिकाचा आणखी एक हेतू आहे आणि तो म्हणजे भारत, रशिया आणि चीन यांच्या भविष्यातील संभाव्य युतीला तडा देणे. या तीन राष्ट्रांची जर युती झाली तर आशिया खंडात अमेरिकेच्या आर्थिक, व्यापारी आणि राजकीय हितसंबंधाना धोका पोहचवू शकतो. भारताबरोबर घनिष्ठ संबंध प्रस्थापित केल्यास अशी युती निर्माण होण्याची शक्यता खुप कमी होईल असे अमेरिकेला वाटते.[८]

निष्कर्षत:

असे सांगता येईल की अमेरिकेच्या काश्मीर प्रश्नातील मध्यस्थीबाबतच्या स्वरूपाचा विविध अंगांनी विचार करता एकंदरीत असे दिसून येते की, अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणात घडून आलेले सध्याच्या काळातील भारताविषयीचे महत्वाचे बदल लक्षात घेता भारताने जरी अमेरिकेची मध्यस्थी काश्मीर प्रश्नात मान्य केली तरी त्याचा तोटा भारताला होणार नाही, कारण अमेरिका भारतासारख्या आर्थिक आणि संरक्षण क्षेत्रातील सहकाऱ्याला दुखवून पाकिस्तानच्या बाजूने निर्णय घेईल याची शक्यता फार कमी आहे. कारण जोपर्यंत पाकिस्तान आपले हट्टी आडमुठे धोरण सोडत नाही तोपर्यंत भविष्यातील चर्चाही अपयशी ठरतील. पाकिस्तानला आपली हट्टी भूमिका सोडणे भाग पाडण्यासाठी अमेरिकेचा दबाव उपयुक्त ठरू शकतो. यासाठी अमेरिकेची मध्यस्थीची भूमिका काश्मीर प्रश्न सोडविण्यासाठी मान्य करण्यास काहीही हरकत नसावी अशी आजची परिस्थिती आहे. अमेरिका आणि भारताचे मैत्रीचे संबंध पाहता ही मध्यस्थी भारतासाठी फायद्याचीच ठरेल. त्या दृष्टीने भारताने आपले धोरण ठरविणे अत्यंत गरजेचे आहे.

संदर्भ ग्रंथ :-


१) शुक्ल कृष्णानंद - शांति, सुरक्षा और विकास की समस्याएँ, राधा पब्लिकेशन्स, नई दिल्ली, प्र. सं. २००१, पृ. क्रं. १८२

२) Indurthy Rathnam - The Turns and Shifts in the U.S. Role in the Kashmir Conflict since १९४७ : Todays Propitious Times for a Facilitator to resolve it, Taylor & Francis-Assian Affiars, Pg. No. २०१

३) दिवाण चंद्रशेखर (डॉ.) - भारताची विदेश नीती, विद्या प्रकाशन, नागपूर, प्र. सं. १९९२, पृ. क्रं. ९३

४) उपरोक्त - पृ. क्रं. ९३

५) जोशी लक्ष्मणशास्त्री (तर्कतीर्थ) - मराठी विश्वकोश, खंड - ९, पृ. १९८.

६) द्विवेदी आशुतोष (डॉ.) - भारत पाक संबंध और काश्मीर समस्या, ओमेगा पब्लिकेशन्स, नई दिल्ली, प्र. सं. - २०१३, पृ. क्रं. १६४

७) देवळाणकर शैलेंद्र (डॉ.) - भारताचे परराष्ट्र धोरण सातत्य आणि स्थित्यांतर, सकाळ प्रकाशन, पुणे २०१६ (सुधारित तिसरी आवृत्ती), पृ. क्रं. २७९

८) Banerjee Dipankar (Major General), Security in South Asia (२०००), Manas Publication, New Delhi, Pg. No. १६०






18

# किनवट तालुक्यातील आदिवासींची आर्थिक व सामाजिक स्थिती


**प्रा.डॉ.मोहोकार हरिहर शिवदास**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड जि.नांदेड


*************

**प्रस्तावना :**

भारतीय समाजव्यवस्थेतील एक महत्वाचा घटक म्हणून आदिवासी समाजाकडे बघीतले जाते. त्यामुळे आर्थिक व सामाजिक विकासाच्या प्रक्रियेत या घटकाकडे दुर्लक्ष करुन चालनार नाही. तर त्यांना आर्थिक व सामाजिक विकासाच्या प्रक्रियेत सामावुन घेऊन त्यांचा सर्वांगीन विकास करणे आवश्यक ठरते. त्या अनुषंगाने ब्रिटीश राजवटीपासून आदिवासींच्या विकासाच्या दृष्टीने प्रयत्न झाले. त्याचाच परिणाम म्हणून वर्तमानकाळात आदिवासींच्या आर्थिक व सामाजिक जीवनात बदल होतांना आढळून येत आहे. महाराष्ट्रात आदिवासींच्या विकासासाठी केंद्रवर्ती अर्थ संकल्पीय योजना, केंद्र अनुदान योजना व उपयोजना राबविल्या जात आहे. ह्या योजना राबविण्यासाठी १९७३ पर्यंत आदिवासी कल्याण विभाग हा विभाग समाजकल्याण विभागाअंतर्गत कार्यरत होता. सन १९७३ पासुन आदिवासी कल्याण विभाग या नावाने स्वतंत्र करण्यात आला. या विभागाच्या माध्यमातून योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आदिवासी संचालनालयाची स्थापना करण्यात आली. वर्तमानकाळात हे संचालनालय नाशिक येथे कार्यरत आहे. आदिवासींचा क्षेत्रनिहाय विकास साध्य करण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रात २४ एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प निर्माण करण्यात आले. त्यापैकी एक प्रकल्प किनवट भागातील आदिवासींचा विकास करण्यासाठी किनवट येथे कार्यरत आहे.

नांदेड जिल्ह्यातील किनवट हा एक आदिवासी तालुका आहे. या तालुक्यात २०११ च्या जनगणनेनुसार १७.१९ टक्के आदिवासी लोकसंख्या असुन गोंड, आंध, परधान, भिल्ल आणि कोलाम ह्या आदिवासी जमाती आढळून येते. या आदिवासींच्या आर्थिक, सामाजिक, [illegible], सांस्कृतिक, धार्मिक इत्यादी सारख्या अनेक समस्या आहेत. प्रस्तुत संशोधनात आदिवासींच्या आर्थिक व सामाजिक [illegible] भर दिलेला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टये :**

१. आदिवासी विभागामार्फत ज्या विविध योजना राबविल्या जाते त्या योजनांमुळे आदिवासींच्या आर्थिक व सामाजिक स्थितीत काय बदल झाला याचा अभ्यास करणे.

२. आदिवासी विकासाच्या दृष्टिकोनातून आर्थिक व सामाजिक घटकांचा मागोवा घेणे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत संशोधनात प्राथमिक आधार सामुग्री आणि दुय्यम आधार सामुग्री अशा दोन्ही प्रकारच्या सामग्रीचा आधार घेण्यात आला आहे. आदिवासींच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास करण्यासाठी आदिवासींच्या मुलाखती घेण्यात आल्या. तसेच त्यांच्याकडून प्रश्नावली भरून घेण्यात आली. आदिवासींची निवड करण्यासाठी यादृच्छिक नमुना निवड पध्दतीचा वापर करण्यात आला. तसेच प्रस्तुत संशोधनासाठी आवश्यक असणारी द्वितीय सामुग्री मासिके, वर्तमानपत्रे, शासकीय अहवाल आणि इंटरनेटच्या माध्यमातून प्राप्त करण्यात आली.

**अध्ययन विश्लेषण :**

किनवट तालुक्यातील पाच सर्कल मधील प्रत्येकी २ गावे या प्रमाणे १० गावाची निवड करुन त्या गावातील आदिवासी विकास योजनांचा लाभ घेतलेल्या एकूण लाभार्थी पैकी ५ टक्के प्रमाणे ११० लाभार्थ्यांची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी निवड केली आहे.

**१. आदिवासी विकास योजना निहाय लाभार्थी**

किनवट तालुक्यातील आदिवासींसाठी राज्य व केंद्र शासनाकडून अनेक योजना चालतात त्यापैकी प्रस्तुत अध्ययनासाठी केंद्र अनुदान योजना, केंद्रवर्ती योजना व उपयोजना घेतल्या आहेत.

तक्ता क्र.०१

| अ.क्र. | तपशिल | योजना लाभार्थी संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | केंद्र अनुदान योजना | ३० | २७.२७ |
| २ | केंद्रवर्ती योजना | १७ | १५.४६ |
| ३ | उपयोजना | ६३ | ५७.२७ |
| एकुण | | ११० | १००.०० |

स्त्रोत : प्रत्यक्ष सर्वेक्षणावर आधारीत

तक्ता क्र.०१ मध्ये किनवट तालुक्यातील आदिवासींनी लाभ [illegible] योजनांची माहिती दिली आहे. एकून नमुना लाभार्थ्यांपैकी [illegible] ५७% (६३) लाभार्थ्यांनी उपयोजनेचा लाभ घेतला



PRINCIPAL
Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : [illegible]
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 8 | MAY - 2018

# भारतातील बौध्द तत्वज्ञान [illegible]



प्रा.डॉ.व्ही.एस.देसले[1], प्रा.व्ही.के.देसले[2]
[1] [illegible] मारवड, ता. अमळनेर.
[2] [illegible] कला विज्ञान [illegible]

प्रस्तावना

पृथ्वी तलावर मानवाची उत्पत्ती निर्माण झाल्यापासून अनेक स्थित्यंतरातून मानवाचा इतिहास बदलत गेला, त्या मानवाने आपल्या बुध्दीच्या जोरावर व निसर्गाच्या नैतिक मुल्यांचा आदर व संगोपनाला महत्व देवून आपले जीवन व्यत केले.. जसा बदलत गेला काळ तसे दवदेवता बदलत गेल्या त्याच प्रमाणे वृक्षदेवताही बदलत गेल्या. वृक्षाचे व पशुदेवता महत्व वाढत गेले. आज सुध्दा आपल्याला इतिहासाकडे वळून बघण्याची आवश्यकता वाटत आहे. निसर्गाचा समतो ठेवणे हा नेहमीच माणसापुढे यक्ष प्रश्न राहिलला आहे. आज आपल्याला विज्ञान निसर्गाचे बदल व होणारे परिणाम यांच माहिती देत असते. मात्र प्राचिन काळापासून अनेक वैज्ञानी भारतात झाले ज्यांनी वृक्षांचे व प्राण्यांचे महत्व आपल्या सांगितले त्यात गौतम बुध्द व वर्धमान महाविर हे मणुष्याला जगण्याचा नवा मार्ग सांगुन गेले आहेत.

स्थित्यंतर इतिहासाची [illegible]

प्राचीन भारताच्या इतिहासावर आपण जर नजर टाकली तर आपल्याला, सिंधु संस्कृती, ऋग्वेद काळ, उत वैदिक काळ यांच्यात मोठया प्रमाणात स्थित्यंतरे झालेली दिसतात. ऋग्वेद काळात समाज हा समान होता त्या चातुर्व पध्दत अस्तीत्वात नव्हती आणि जरी थोडया प्रमाणावर निर्माण झाली ती सौम्य स्वरुपाची होती. म्णजे पठण करणा ब्राम्हणाला जर पठण येत नसेल तर तो खालच्या वर्गात मोडला जात असे आणि खालच्या वर्गाच्या व्यक्ती किंवा स्त्री पठ करण्यास योग्य असले तर तीला किंवा त्याला वरचा वर्णात संबोधले जात होते. म्हणजे ऋग्वेद काळातील वर्णव्यवस्था बदलल्या स्वरुपाची होती. थोडक्यात विश्वामित्र क्षत्रिय असुन ब्राम्हणाचे कार्य करीत होते. तर पांडवांचे व कौरवांचे द्रोणाचार्य ब्राम्हण असुन क्षत्रियतेचे कार्य करीत होते. थोडक्या ऋग्वेद कालीन समाज जीवन सर्व समावेशक होते.

मात्र उत्तर वैदिक काळात वर्णव्यवस्था ताठर स्वरुपाची झाली. श्रेष्ठ व कनिष्ठ भाव निर्माण झाला. ज्ञानी ब्राम्ह होवू लागले असे नाही. तर ब्राम्हणाचा मुलगा अपात्र असतांनाही ब्राम्हणच गणला जाऊ लागला. व शुद्राचा मुलगा ज्ञा असुनही शुद्र गणला जावू लागला




T.S.S's. Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule
PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

[illegible] वाढता होते अत्यंत झाले म्हणून शिक्षणापासुन वंचित [illegible] गेले तर कालांतराने [illegible] त्यांच्यापासुन लांब गेली, तर वैश्यांपासुन लांब गेल्यामुळे अर्थसत्ता [illegible]

[illegible] निर्माण झाला. काळाच्या बदलत्या स्वरुपाला [illegible] राजा सिध्दार्थ [illegible] मार्गदर्श करण्यासाठी पुढे सरसावले.

[illegible] लागल्या होत्या.

1. [illegible] कशी होईल ?
2. अविद्येच्या अंधकारात [illegible] प्रज्ञाचक्षुची प्राप्ती कशी होईल?
3. [illegible] दिसु लागेल ?
4. 'पुरपि जननं पुनरपि मरणं' [illegible] फेरीतून कायमची मुक्ती देणारा असा प्रज्ञातृप्ती करणारा धर्म कसा [illegible]

[illegible] नव्या धर्माचा मार्ग दाखविला. [illegible] सिध्दार्थ यांना [illegible] उत्पन्न करुन [illegible] सत्ता आणि धन या तिन्ही गोष्टींचा विचारपूर्वक आणि योग्य रीतीने [illegible] असा उपदेश केला. त्यावर सिध्दार्थ म्हणाले,राजा, तू उदार [illegible] म्हणजे [illegible] नाही खरी: पण तृष्णा ही मर्यादित राहणारी नाही. सत्ता म्हटली सर्वांपेक्षा पवित्र [illegible] राज्याधिकार स्वर्गवास, फार काय पण त्रिभुवनावरील स्वामित्व या विषाचे सेवन मी [illegible] करावे? पाण्यातल्या माशाने आमिषाला, किंवा स्वतंत्रपणाने आणि स्वच्छंदाने उडणाऱ्या जनावरानं जाऊन [illegible] माझ्यासाठी विनाकारण हळहळू नका.राज्यवैभव संपत्ती यांची प्राप्ती व्हावी ज्यांच्या अंगावर अहोरात्र चिंतेचा भार [illegible] पडला आहे, अशांसाठी हळहळा. माझे मन या ऐहिक गोष्टींना विटले आहे. त्यात त्याला आता [illegible] यामुळे मी स्वत: राजभूषणांचा त्याग केला. मी आता ज्ञात्यांना शरण जाऊन धर्मसाधना करण्याचा निश्चय केला आहे. दुःखापासून मुक्ती मिळविण्याचा मार्ग शोधणे हा माझा आता जिवनाचा उद्देश आहे. हे सांगुन सिध्दार्थ वनात तपश्चर्या करण्यासाठी निघुन गेला. घोर तपश्चर्यमुळे शरीर शुष्क होऊन सिध्दार्थ मुर्च्छित होऊन पडला असता, जवळच्या [illegible] गवळ्याची नंदा नावाची मुलगी वनदेवतांना नैवेदय दाखविण्यासाठी दुधाची खीर घेऊन आली. आंबाराईखाली सिध्दार्थ पडलेला पाहुन वनदेवतेने आज प्रत्यक्ष आपणांस दर्शन दिले असे तिला वाटले आणि तिने वंदन केले आणलेल्या खिरीचे सेवन करण्याची सिध्दार्थला तिने विनंती केली. सिध्दार्थला काही खायला पाहिजे होते. ते आयते पुढे आलेले पाहून त्याला [illegible] संतोष झाला व त्याने सगळी खीर पिऊन टाकली. तेव्हा पासुन सिध्दार्थ [illegible] हे कळून चुकले की, मोक्ष प्राप्तीसाठी [illegible] करणे अवश्यक नाही. तेव्हा पासुन सिध्दार्थ अन्नग्रहण करु लागला.

'मला संप्रदाय, नाही [illegible] भेद न ठेवता अखिल मानव जातीच्या दु:खांचा नाश करण्याचा मार्ग मी शोधुन काढला आहे.' [illegible] समाजाला सांगण्यासाठी गौतम बौध्द वेगवेगळ्या प्रांतात हिंडून भिक्षा मागुन व त्याच ठिकाणी आपली प्रवचनं देवून समाजाला मोक्ष प्राप्तीचा मार्ग सांगु लागले, त्यात सत्य, अहिंसा,अस्तेय, अपरीग्रह, आणि ब्रम्हचर्य याचे पालन करण्याचे सांगु लागले. त्याच बरोबर राज्या-राज्यामधील तंटे सोडवू लागले. तसेच या मध्यम मार्गा खेरीज निर्वाणप्राप्तीचा दुसरा उपाय नाही हा मध्यम मार्ग म्हणजे सम्यक दृष्टी,सम्यक संकल्प, सम्यक वाक्, सम्यक कर्मान्त, सम्यक आजीव, सम्यक व्यायाम, सम्यक स्मृती व सम्यक समाधी यांनी युक्त असा आर्य अष्टांगिक मार्ग हा होय. [illegible] जीवनाचा [illegible] समाजाला सांगु लागले. वृक्षांचे महत्व, पशुंचे महत्व ते सर्वत्र [illegible] थोडक्यात महात्मा गांधीजींनी [illegible] ग्रामस्वराज्य या आजच्या सुधारकांप्रमाणे बौध्दांनी समाजासाठी [illegible] सांगुन टाकला.

[illegible] आजही प्रतीत झालेला दिसतो. तो महान [illegible] भारतीय विचारवंतांना, समाजसुधारकांना [illegible]

" His Humidity is toching and recalls to one's mind the humnity of the Buddha and Jesus."

PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri,Tal.Sakri,Dist.Dhule

*"sush a nightmarish world, as ours, can be made a tolerable abode of living if man, according to Gandhi, remembers God an follows Satya, ahinsa and brahmacharya the tragedy of modern man is that h scorns spiritual values and worships Mommon."*

निष्कर्ष:-

महात्मा गौतम बुध्दांनी सांगितलेला धर्माचा अवलंब फक्त बोध्द धर्माबाबत नसुन मनुष्याने जगत असतांना त्या सांगीतलेल्या सदाचाराचे अवलोकन करणे होय. हीच शिकवण भारतीयांना नवा मार्ग दाखविणारी आहे. बौध्दांच विचारांनी संपुर्ण भारत भारावला होता. त्यांनी पशु हत्या करु नका, पर्यावरणाचे रक्षण करा, वृक्षांचे रक्षण हे मानव जाती रक्षण आहे. हे ते त्यांच्या प्रवचनातुन सांगुन गेले. त्यांच्या या प्रवचनांचे चित्र प्रतिकात्मक रुपात सांची स्तुपावर रेखाटले आहे. त्यांचे हे तत्वज्ञानाचे अनुकरण आजतागायत होत आलेले आहे. महात्मा गांधी, विनोबा भावे, व डॉ. भिमरा आंबेडकर आदिंनी त्यांचे पालन केले आहे. आणि भविष्यात आदर्श जीवनासाठी गौतम बुध्दांचे विचार मणुष्या मनुष्याप्रमाणे जगण्यास पुरक ठरतील.

संदर्भ सूची :-

१) कोसंबी डी. डी., प्राचीन भारतीय संस्कृती व सभ्यता.
२) आचार्य ... बौध्द ...
३) भार्गीकर मदन., प्राचीन भारताचा इतिहास
४) शहा पी. बी., प्राचीन भारताचा राजकीय आणि सांस्कृतिक इतिहास.
5) *Dr. Prubhi R. K. and Dr. Chaturvedi Archana., Social Philosophy of Mahatma Gandhi. P-B. 287.*







T.S.S's. Smt. V.U. Patil Arts & Late Dr. B.S. Desale Science College Sakri, Tal. Sakri, Dist. Dhule

PRINCIPAL
T.S.S's. Smt. V.U. Patil Arts &
Late Dr. B.S. Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist. Dhule



# CONTEMPORARY INDIAN LITERATURES AND LANGUAGES

Dr. Ashok Khairnar | Dr. Vijay Bachchhao
Dr. Kishor Patil | Dr. Pravin Borse

T.S.S's Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S. Desale Science College Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule

PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule

59 Use of ICT Tools in Teaching English in Big Classes. ........................................................ 143
Prof. A. D. Patil.

60 "Conflict between Exploiters and Exploited in Mahasweta Devis 'Arjun'" .............................. 145
Prof. Sadashiv Ramchandra Rane

61 Exploration of Inner Space: Anita Desai's Cry, the Peacock and Margaret Drabble's The Needle's Eye ............................................................ 147
Dr Sarjerao Sagre
Ms. Neeta Jadhav

62 "A Study of Social Realism in Manju Kapur's 'The Immigrant' and Shashi Deshpande's 'A Matter of Time'" ............................................................ 149
Jahagirdar Z. Salunkhe

63 Voice of Violence in Vijay Tendulkar's 'Silence! The court is in session' ............................................ 151
Madhavi Prakash. Sapkale.

64 Images of Father in Cocoon .............................. 154
Savita Prakash Sapkale

65 Reflection of contemporary Indian Social life in Nissim Ezekiel's Poetry ...................................... 157
Mr. Vijay Krishnarao Shinde

66 Objectives of Teaching and Learning English in India ............................................................ 159
Dr. S. D. Sindkhedkar

67 The Immigrants Experience and Cultural Displacement in Jhumpa Lahiri's Work .......................... 161
Prof. P.D.Sonar

68 Post Colonial Elements in Kiran Desai's The Inher itance of Loss ............................................ 163
Prof. Dr. P. B. Sonawane
Prof. S. C. Patil

69 Dalit Literature: A Journey to Literature......... 165
Prof. Dr. Pradip. G Sonawane

70 Technology and English Language Teaching ... 167
Prof. Manisha Y. Sonawane

T.S.S's Smt. V. U. Patil Arts & Late Dr. B.S. Desale Science College Sakri, Dist. Dhule

PRINCIPAL
T.S.S's Smt. V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

# "A Study of Social Realism in Manju Kapur's 'The Immigrant' and Shashi Deshpande's 'A Matter of Time'"

**Jahagirdar Z. Salunkhe**
Smt.V.U.Patil Art's & Late Dr. B. S. Desale Sci. College, Sakri
**Smt. Suvarna T. Shinde**
Art's and Commerce Mahila Coll. Vidyanagari, Deopur, Dhule

Manju Kapur's 'The Immigrant 'and Shashi Deshpande's 'A Matter of Time'.deal with man-woman relationship, gender discrimination, human desires, rebellion and protest. Manju Kapur and Shashi Deshpande are considered as feminist writers. These novels deal with women's issues. Through their novels, they have given voice to neglected section of the society such as women in male dominated society. Quest for identity is one of the major themes of their novels.

This research paper studies social realism in Manju Kapur's novel 'The Immigrant', and Shashi Deshpande's novel 'A Matter of Time'

The emergence of new women in the realm of social, economic, cultural and racial aspects are also explored in the novels of Manju Kapur. Manju Kapur, being a novelist is primarily concerned with the problems of the newly emerging urban middle class.

Nina is a thirty-year-old English lecturer in New Delhi, living with her widowed mother and frustrated by how little life has to offer. Ananda has recently immigrated to Halifax, Canada, he searches for something to complete his new life. When an arranged marriage is proposed, Nina is uncertain: can she really give up her home and her country to build a new life with a husband. The consequences of change are far greater than she could have imagined.

'A Matter of Time', is one of Shashi Deshpande's novels, published in 1996. Women's problems have been consuming themes of most of Deshpande's work. The novel explores the intricate relationships encompassing three generations of men and women. In the novel, eighteen-years-old Aru is struggling to understand her father's desertion' and her mother's 'indifference'. Sumi, the main character of the novel is different from the women protagonists of Shashi Deshpande's earlier novels. Sumi is emancipating herself as a new and independent woman with patriarchal pressure and family responsibilities. Gopal's desertion makes her experience the trauma of a deserted wife. When Gopal walks out for reasons, Sumi returns with her three daughters, Aru, Charu and Seema, to the shelter of the Big House, where her parents, Kalyani and Shripati live in a strange silence: they have not spoken to each other in the last thirty-five years. The lives of three generations of women living in their family home, 'The Big House.' Deshpande crafts a suspenseful story about why Kalyani

PRINCIPAL
S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

was forced into an arranged marriage with her maternal uncle Shripati, and about the tragedy that led Shripati to desert his wife.

Shashi Deshpande's novel 'A Matter of Time', explores a woman's psyche. In the novel, Sumi's husband Gopal walks out of her life, in quite unpredictable way, for reasons even he cannot express. Gopal unburdens himself from all family responsibilities. Sumi then realizes the situation and burden which is thrust on her by her husband, leaving everything and Sumi in a shocking stage.

Without any fault of Sumi, Gopal deserts her even without giving any reason. Sumi returns with her daughters Aru, Charu and Seema to the big house 'Vishwas' where her parents Kalyani and Shripati live in a strangely oppressive silence. They have not spoken to each other for thirty-five years because Shripati held her responsible for the loss of their four-year old mentally retarded son. Shripati also never openly explained his reasons for abandoning his wife Kalyani. On the other side for Sumi and her daughters, Gopal's desertion brings all disgrace, shame and humiliation. Both the male members shatter the life of their family.

Manju Kapur and Shashi Deshpande seem aware of the fact that the women of India have indeed achieved their success in sixty years of independence, but if there is to be a true female independence, too much remain to be done. We see the emergence of new women in Manju Kapur and Shashi Deshpande's protagonists, who do not want to be rubber dolls for others to move as they will. They want to shoulder responsibilities that go beyond a husband and children. They are not silent rebels but are bold, outspoken, determined and action oriented. All protagonists know they cannot depend on others to sort out the domestic situation. In spite of getting education and freedom the women protagonists of Manju Kapur and Shashi Deshpande's novels do not blossom into new woman in the real sense.

## Work cited:


Kapur, Manju. " The Immigrant" New Delhi: Random House, 2009.

Deshpande, Shashi. "A Matter of Time" . New Delhi: Penguin Books , 1996.

Beauvoir, Simonde,. "The Second Sex" Tran H.M. Parshley Harmondsworth 1971. p.38 London: Pan Books, 1988.

Beauvoir, Simone de. Selden, p.534. London: Pan Books, 1988.

Darker, Rani. "Marriage as Purdah: Fictional Rendering of a Social Reality" p.50. New Delhi: Sterling Publications, 1995.

Nafisa, Hatimi. "Conflict and Voilence in Shashi Deshpande's 'The Intrusion and Bharati Mukherjee's 'A Wife's Story'" p.196. New Delhi: Rawat Publication, 2002.

Nityanandan, Indira. "Three Gr[illegible]



PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

**Volume 8** (Issue 05)
April, 2018

ISSN-2230-9578

# Journal of Research and Development

- A Multidisciplinary International Level Refereed Journal

COSMOS
IMPACT FACTOR
4.270

**UGC Journal list No. 64768**

## Editor
## Dr. R. V. Bhole

'Ravichandram' Survey No-101/1, Plot No-23, Mundada Nagar, Jalgaon (M.S.)
425102

Email- rbhole1965@gmail.com     Visit-www.jrdrvb.com

T.S.S's. Smt. V. U. Patil Arts & Late Dr. B.S. Desale Science College Sakri, Tal. Sakri, Dist. Dhule

PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

ISSN-2230-9578

**Journal of Research and Development**
**Volume 8 (Issue 05), April, 2018**

सम्पादक –

प्रा. डॉ. आर. व्ही. भोळे

संपादकीय कार्यालय

Journal of Research and Development
C/o 'Ravichandram' Survey No-101/1, Plot No-23,
Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102

१) सम्पादन – प्रकाशन एवं संचालन अवैतनिक

२) कला साहित्य संस्कृती समाज इतिहास राजनिती एवं आर्थिक विषयों पर केंद्रीत शोधपत्र आमंत्रित है।

३) जर्नल ऑफ रिसर्च ॲन्ड डेव्हलपमेंट में प्रकाशित शोध/विचार पत्रों में व्यक्त चिन्तन एवं दृष्टीकोन सम्बधित लेखकों के है। उससें जर्नल का सहमत होना आवश्यक नही है।

४) सदस्यता फार्म एवं नियमावली अंक के अंतिम पृष्ट पर देखे।

५) जर्नल ऑफ रिसर्च ॲन्ड डेव्हलपमेंट का प्रकाशन प्राध्यापकों को प्राध्यापकों के द्वारा, प्राध्यापकों के लिए एक अव्यावसायिक सहयोगी प्रयास।

६) सदस्यता शुल्क का भुगतान नगद मनी ऑर्डर व्दारा जर्नल ऑफ रिसर्च ॲन्ड डेव्हलपमेंट जलगांव के पतेपर भिजवाए।

७) मराठी भाषाके शोध पत्र प्रकाशित किए जाएगे।

